CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ

झाणं हवे सव्वं। ध्यान ही सबकुछ है।। नियमसार गाथांक ११९

श्री आचार्य मानतुंग विरचित

निजात्मप्रभूचे
भक्तामर स्तोत्र

मराठी अध्यात्मानुवाद

परमअध्यात्मयोगी मुनिवर १०८

श्री वीरसागरजी महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

115

4696

भक्तामर-प्रणत-मौली-मणीप्रभाणाम्



परमपुज्य मानतुंगाचार्य
भक्तामर स्तोत्र लिहीत असताना

सेवा में -
श्री गणेशवर्णी दिगम्बर जैन शोध संस्थान -
वाराणसी. शोधकार्य के लिये →

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ

खोज, शोध, संशोधन, परीक्षा, निष्कर्ष, सिद्धि आदि का प्रमुख और अनिवार्य विषय तो यही है, जिसके द्वारा सम्यक् आनन्द की प्राप्ति, और दुःख से मुक्ति हो, सम्यक्त्व की उत्पत्ति किस तरह होती है, शुद्धात्मानुभव कैसे और किसके द्वारा हो सकता है, इसके उपाय और पुरुषार्थ स्वाधीन हो। नियम से अवि-नाभाव से प्राप्त हो, स्वसंवेदनमयी सम्यक् स्वानंद हो।

निज ध्रुव शुद्ध ज्ञान दर्शन आनन्दात्म द्रव्य यह अपने ज्ञान का विषय है, अपना मतिश्रुत प्रमाण ज्ञान स्व-पर-प्रकाशी साधकतम साधन है, अन्य साधन नहीं है— इस ज्ञान से अभी इसी समय प्रत्यक्ष, प्रामाण्य सहित जानो।

यहाँ जानना निर्विकल्प ज्ञान है, निर्विकल्प समाधि है, अतीन्द्रिय है, शुद्धात्मानुभव है, सम्यक्ज्ञान है, निज शुद्धात्मा संबंधी अज्ञान का नाश है, उपेक्षारूप समता भाव है, बुद्धिपूर्वक मोह राग द्वेष नहीं है याने वीतराग है, सम्यक् आनन्द है याने लेषमात्र भी दुःख नहीं है।

यहाँ ज्ञान का विषय और साधकतम साधन भी स्वाधीन और नित्य है। साधन स्व-पर प्रकाशी होने से स्वानन्द वीतरागता यह फल सुनिश्चितरूप से स्वयं को जाना जाता है।

यह सिद्धान्त भक्तामर स्तोत्र रचना में है, इसके मराठी हिन्दी अनुवाद में है, इस ग्रन्थ में यत्र तत्र है।

इस सिद्धान्त का ही पक्ष-विपक्ष सापेक्ष साधक बाधक रूप से सत्य शोध और परीक्षा होने हेतु यह "निजात्मप्रभु चे भक्तामर स्तोत्र" 'निजात्म प्रभु के भक्तामर स्तोत्र' आपके शोध-संस्था को सम्यक् प्रणम्य सादर भेंट है।

केवल ग्रन्थीय शोध सिद्धि न होकर, जब त्याह तब, वह प्रयोग सापेक्ष भी निष्पन्न हो तो धन्य है धन्य है धन्य है।

सम्पादक.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ

श्री आचार्य मानतुंग विरचित

निजात्मप्रभुचे
भक्तामर स्तोत्र

स्तोत्राचा मूल गर्भित अर्थ अध्यात्मानुवाद
मराठी
परमअध्यात्मयोगी मुनिवर १०८

श्री वीरसागरजी महाराज

नियमसल्लेखना श्री कुंथलगिरी दि. १०/३/१९९३)

सम्पादक

पं. नाभिराज नारकर, जैन
सोलापूर (महा) ४१३००२

आजीवन सदस्य:
अखिल भारतवर्षीय दि. जैन विद्वत् परिषद-दिल्ली,

वीर निर्वाण २५२५ श्रुतपमंचमी दि. १८/६/१९९९ इ.

की ओरसे 'सम्यक्प्रणम्य' के साथ उपहार।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकाशक :-
श्री सुनय नाभिराज नारकर
सौ. वृषाली सुनय नारकर सौ. अनाली उर्फ
श्रुति अपार्टमेंट, चंडक बगीचा, बाळीवेस
सोलापूर ४१३००२.
फोन (०२१७) ३२५७६७

प्रथम आवृत्ती :-
प्रती ४०००

प्रकाशन स्थळ व प्राप्ती स्थान प्रकाशकाकडे
पोस्टेज खर्च पाठविल्यास विनामुल्य.
स्वेच्छेने देणगी पाठविल्यास स्विकारली जाईल.
© सर्व हक्क प्रकाशकाधीन.

खर्च मुल्य :-
रू. ५० / १९९९इ.

ग्रन्थ मूल्य :-
निजशुद्धात्मानुभव करणे किंवा प्रयत्न करणे.

मुद्रक :-
विनंद ऑफसेट प्रिंटर्स,
१०८ शुक्रवार पेठ, सोलापूर-४१३००२.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिनांक १८/६/९९
वीरनिर्वाण २५२५
श्रुतपंचमी

श्रुतपंचमी पूजा

करा श्रुतपंचमी पूजा ।
श्रुतामधि पंचमगति शोधा,
करा श्रुतपंचमी पूजा ॥ धृ.॥
महावीर प्रभु श्रुतनिर्माते
गणधर श्रुतसंग्रह करिती ते
देती श्रुतधर आचार्या ते
त्यांच्या पासुनि श्रुत समजा ।
करा श्रुतपंचमी पूजा ॥१॥
श्रुतधर धरसेनाचार्यांनी
पुष्पदन्त अन् भूतबलींनी
करुणेने श्रुतलेखन करूनी
षट्खंडागम ते निर्मुनी
केल्या उपकारास भजा ।
करा श्रुत पंचमी पूजा ॥२॥
कुंदकुंद आचार्या प्रवर्तक
अध्यात्म प्रणालीचे जनक
समयसार आदिक उपकारक
त्यातुनि शुद्धात्मा शोधा ।
करा श्रुत पंचमी पूजा ॥३॥
चारहि अनुयोगांचा आगम
बारा अंगांचा परमागम
दाखवी वीतराग विज्ञान
त्या स्वीकारुनि शिव साधा ।
करा श्रुत पंचमी पूजा ॥४॥
आगम श्रुत स्वाध्याय करू या
खरे देव गुरु शास्त्र समजु या
त्यापासुनि निज आत्मा शिकुया
व्हाया आपण शिवराजा ।
करा श्रुत पंचमी पूजा ॥५॥

पं. मनोहरजी मारवडकर



श्री अनादि-सरस्वति

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



श्री श्रुत स्कंध मंडल रचना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ



श्रुतवाणी परम्परा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

णमोकार मंत्र

णमोकार मंत्राचा द्रव्यदृष्टीने अर्थ		णमोकार मंत्राचा पर्यायदृष्टीने अर्थ
ज्ञान दर्शन आनंद वीर्य	अर्हन्त	अनन्तज्ञान, अनन्तदर्शन, अनन्त अतीन्द्रिय आनंद व अनन्तवीर्य असणारे, चार घातिकर्मरहित
अविनाशी अशरीरी ध्रुवसिद्ध	सिद्ध	आठ गुणांच्या पूर्ण शुद्ध अवस्था असणारे आठ कर्मरहित असतात
आचरण करण्यायोग्य	आचार्य	२८ मूलगुण व ३६ गुण पाळणारे शिक्षा दीक्षा देणारे असतात.
उपाधिरहित उत्कृष्ट	उपाध्याय	२८ मूलगणु व २५ गुण (११ अंग व १४ पूर्व = २५ गुण) पाळणारे, स्वतः शिकणारे व दुसऱ्यास शिकविणारे असतात.
मंगल	साधु	२८ मूलगुण पाळणारे असतात.
असा माझा ध्रुवशुद्धात्मा आहे.		असे हे पांच परमेष्ठी आहेत. त्यांना नमस्कार

धर्म्यध्यान :- ज्ञान दर्शन आनंद वीर्य अविनाशी अशरीरी ध्रुवसिद्ध आचरण करण्योग्य उपाधिरहित उत्कृष्ट मंगल असा मी ध्रुवशुद्धात्मा आहे.

अद्वैतनमस्कार :- प्रवचनसार गाथा १ ते ५ ची जयसेनाचार्य यांची टीका.
मोक्ष पाहुड गाथा ४.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



ध्यान मग्न

परम आत्मान्यायाचार्य परमअध्यात्मयोगी

प.पू. १०८ श्री वीरसागरजी महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोकाकाश

जैन भूगोल



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

4696

मङ्गलाचरण

मंगलमय मंगलकरण वीतराग विज्ञान
नमौं ताहि जातैं भये अर्हन्तदि महान ।
करि मंगल करिहौं महा निर्ग्रन्थकरनको काज
जातैं मिलैं समाज सब पावे निजपद राज ॥

मंगलमय

ग्रन्थकार्याच्या अगोदरच काय? कोणत्याही शुभकार्याच्या अगोदर मंगलाचरण म्हणजे मनाभावे साक्षात मंगलभावना केली जाते / करावी. चांगले असते. सद्विचारपूर्वक कार्य केल्याचे श्रेय / फल मिळते.

मंग म्हणजे शुद्ध, पवित्र, कल्याण, प्रशस्त भद्र, क्षेम, शुभ, पुण्यमय, सुखप्रद इत्यादि भावार्थ आहेत. हा माझा जीव / आत्मा (प्रत्येकसंसारी जीव) रागद्वेषाच्या कारणाने पर्यायात अशुद्ध, मलीन झालेला आहे. म्हणजे पर्यायात शुद्धतेपासून दूर गेलेला आहे. म्हणून आता मूळ शुद्धता, पावित्र्यता आणावयाची आहे. 'ल' म्हणजे आणते. ही शुद्धता पवित्रता जी आणते, त्यास मंगल, म्हणतात. हिन्दीमध्ये 'लाना' म्हणतात. अर्थात ज्याच्याने शुद्धता आल्यामुळे खरे स्वभावसुख निराबाधसुख मिळते, प्रशस्त रहाते, क्षेम कुशल ठेवते इ.ते मंगलमय होय.

मंगलचा दुसरा अर्थ. मन् म्हणजे मल. आत्म्यावरील द्रव्यकर्मरूपी मल, अशुद्धता, पाप, कषाय. गल म्हणजे गळून जाते. शब्दार्थाप्रमाणे ज्या भावनेमुळे मल आदि गळून जाते ती भावना मंगल होय. अर्थात मंगलाचरण करणे म्हणजे शुद्धता पावित्र्य आदि आणणे. याच्यानेच मल पाप आदि आपोआप गळून जातात. प्रकाश आला असता अंधकार आपोआप जातो त्याप्रमाणे. अंधकार जाण्यासाठी अन्य काही श्रम करावे लागत नाहीत. म्हणून शुद्धाची प्राप्ती होईल अशी भावना करण्याच्या उद्देशाने मंगलाचरण केले जाते. लौकिक म्हणजे सांसारिक लाभाचे उद्दिष्टासाठी मंगलाचरण केल्यास ते प्रयोजनाचे कार्यकारी नाही आणि हानीकारक मात्र आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मंगलकरण

शुद्धात्मप्राप्तीसाठी मंगलाचरण करून शुद्धात्मप्राप्तीची माहिती घेत राहिलात तर ते इष्टच आहे. ही माहिती घेऊन व अभ्यास करून त्या अभ्यासाने शुद्धात्मप्राप्ती करून घेतली तर ते मंगलाचरण मंगलकरण ठरले, मंगल झाले. अशा तऱ्हेने मंगलाचरणाची मंगल भावना घडल्याचे आपले आपणास स्पष्ट समजते. अन्य कोणास विचारण्याची गरज पडत नाही. अशा प्रकारे मंगलाचरण करीत असताना शुद्धात्मप्राप्तीचा हेतू ठेवत असल्यामुळे उच्च दर्जाचे पुण्य/शुभ आपोआप घडते. ऐहिक सुखाची प्राप्ती आपोआप सहज घडते.

विज्ञान

विज्ञान म्हणजे वस्तुमधील परिवर्तन/बदल/रुपांतर/अवस्था/ पर्याय आदि विषयीचे विशेषज्ञान होय.

अवस्था/परिवर्तन/बदल/पर्याय आदि एवढा शब्द जरी विचारात आला तरी भाव निर्माण होतो की, जी पूर्वी एखादी वस्तू होती तीच वस्तू आता काही अवस्था बदलून समोर आलेली आहे. तीच पूर्वीचीच वस्तू आणखी कायमच राहून आणखी बदल होत राहणार आहे. झाडावर हिरव्या आणि घट्ट कठीण अवस्थेत असणारीच वस्तू आता पिवळया मऊ रसाळ अवस्थेत खाण्यासाठी समोर आलेली वस्तू आंबाच आहे. पुर्वी समुद्रातील पाण्यातून संशोधन केलेलीच वस्तू आता युरेनियम म्हणून समोर आहे. याचाच पुढे स्फोटक म्हणून उपयोग होणार आहे. पुर्वी लहान तान्हुल्या अवस्थेत घरात होता तोच जीव आज लग्नासाठी उभा आहे. इत्यादि इत्यादि. तात्पर्य मूळ एखादी शाश्वत वस्तूच तिचे मूळ गुण कायम ठेवून असल्याशिवाय तिचे आता परिवर्तन झाले असे म्हणता येत नाही. या अवस्थांतराचीच विशेषता म्हणजे विज्ञान/वस्तुविज्ञान होय. मूळवस्तूचा कधी नाश होत नसतो. आणि तिचे मूळगुण शाश्वत ठेवूनच वस्तू शाश्वत रहाते. अशी ती वस्तु शाश्वत राहूनच तिचे परिवर्तन/अवस्थांतर होत असते. मूळ वस्तू शाश्वत नसल्यास आता आपण पहात असलेली अन्य अवस्थेतील वस्तू ही निराळीच वस्तू असल्याचे ठरते/असते.

अशा निश्चित निर्दोषपणे परिवर्तनें होत असताना मूळ शाश्वतवस्तू तिचे अनेक/अनंतगुण/अनंत गुणधर्म शाश्वत आस्तित्व रहाण्याच्या प्रक्रियेसच वस्तुव्यवस्थेसच, निसर्ग नियमासच विज्ञान आणि त्याच्या विशेष ज्ञानाला परिज्ञान म्हणतात. या आत्मा/जीव वस्तू नामक शाश्वत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आस्तित्व असणाऱ्या वस्तूमधील ज्ञान नामक गुणधर्माच्या विविध अवस्था/विविध संदर्भाने विविध छटांची नावे प्राप्त होतात.

उदाहरणार्थ :-

उपयोग, चेतनोपयोग, दर्शनोपयोग, ज्ञानोपयोग, अवग्रह, इहा, अवाय, धारणा, मतिज्ञान श्रुतज्ञान, अवधिज्ञान, मनःपर्ययज्ञान केवलज्ञान, स्मृतिज्ञान प्रत्यभिज्ञान, तर्कज्ञान, अनुमानज्ञान, अज्ञान, अल्पज्ञ, सर्वज्ञ, मिथ्याज्ञान, सम्यकज्ञान, व्यवहारज्ञान, निश्चयज्ञान, निक्षेपज्ञान, नयज्ञान, प्रमाणज्ञान, स्पष्टज्ञान, अस्पष्टज्ञान, परोक्षज्ञान, प्रत्यक्षज्ञान, प्रज्ञा, प्रज्ञाछन्नी, विवेक, ज्ञेय, विषय, हेयज्ञान, उपादेयज्ञान, प्रयोजनभूतज्ञान, अप्रयोजनभूत ज्ञान, भेदज्ञान, अभेदज्ञान, प्रक्रियाज्ञान, विज्ञान, परिज्ञान, सामान्यज्ञान, विशेषज्ञान, क्षयोपशमज्ञान, क्षायिकज्ञान, विचार, चिंतन, मनन, ध्यान, शुद्धध्यान, अशुद्धध्यान, धर्म्यध्यान, शुक्लध्यान, केवलज्ञान, जाण, जाणीव, नेणीव समज उमज, कल्प, विकल्प, संकल्प, सविकल्प, निर्विकल्प.

असेच अनेक गुणधर्माच्या संदर्भात प्रत्येकाचे अनेक प्रकार आहेत/समजावे. इत्यादि इत्यादि.

शुद्धाची प्राप्ती करून देणारे स्तोत्र

आत्मवस्तूच्या ज्ञानगुणाच्या एकार्थवाची नाना विषयाच्या संदर्भाने नाना अवस्थेच्या संदर्भाने अनेक शब्द आहेत. आणि म्हणूनच त्या प्रत्येक शब्दांना वेगवेगळ्या छटा आहेत. तरीही त्या विविध छटा धारण करणारा गुण एकच एक ज्ञान. शाश्वत अविनाशी गुणधर्म ज्ञान आणि ज्ञानगुणधारी शाश्वत अविनाशी नित्यशुद्ध एकच एक तो आत्मा, प्रत्येकाचा स्वतंत्र अस्तित्ववाला आत्मा, माझाही तितकाच शक्तिवाला गुणवान स्वतंत्र आत्मा, शाश्वत आविनाशी निजात्मा, शाश्वत अविनाशी अनंतगुणधारी आत्मा, स्व-स्वभावधारी आत्मा, स्व-स्वभावाशिवाय इतर कांहीही मिसळलेले नसलेला नित्यआत्मा होय. इतर कांहीही मिसळलेले नसणे यासच तर शुद्ध म्हणतात. म्हणून या कारणास्तव हा आत्मा नित्यशुद्ध आहे. या ध्रुव आत्म्यावर कशासाचाच प्रभाव पडू शकत नाही. या ध्रुवात्म्यावर अस्तित्व नष्ट होण्यासंबंधि वा किंवा अनित्यता संबंधि किंवा विकृत संबंधि किंवा अन्य कोणत्याही प्रकारे पर्यायाचा प्रभाव पडू शकत नाही. जर प्रभाव पडला तर ध्रुवात्म्याचाच पर्यायावर पडू शकणार. कारण पर्याय ध्रुवात्म्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आधारावर आहे. ध्रुवात्मा पर्यायावर आधारित नाही. म्हणून हा आत्माच परमात्मा आहे. हा परमात्माच नित्यशुद्ध आहे. हा परमात्मा नित्यशुद्ध असल्यामुळे याच्या आधारावर पर्याय शुद्ध होऊ शकते. नित्यशुद्ध म्हणजे अनादिकाळापासून शुद्ध, पुढे भविष्यकाळातही शुद्ध. तसेच प्रत्येक वर्तमानकाळातही हे मूळद्रव्य ध्रुवात्मा शुद्धच आहे. पुढे कधीतरी आत्मा शुद्ध होणार आहे असे समजणे चूक. चूक चूक चूक. पुढे कधीतरी आत्मा शुद्ध होणार आहे हे पर्यायअपेक्षेने बरोबर आहे. द्रव्य अपेक्षेने निजध्रुवात्मा अनादि अनंतच्यामुळे प्रत्येक वर्तमान काळात शुद्धच आहे, प्रगट अस्तित्वान आहे. त्यास अशुद्ध आणि सुप्त (केवळ शक्ति अपेक्षेने) आहे असे समजणे त्रिवार चूक. द्रव्यार्थिक अपेक्षेने हा नित्यशुद्ध आत्माच भगवान आहे. या भगवान निजध्रुवात्म्याची पर्यायभक्तानें भक्ति केली तर हा भक्त परमशुद्ध होऊन अमर निश्चितच होईल ! ही वास्तवता आहे, तो भक्त निश्चितच अमर होतो !

हे सायन्स आहे, हे विज्ञान आहे, हे निसर्गदत्त वस्तुविज्ञान आहे. निजध्रुवशुद्धज्ञानदर्शनआनन्दआत्मा हा शाश्वत अस्तित्ववाला अविनाशी अमर नित्यशुद्धवाला निजभगवान परमात्मा मूलवस्तुद्रव्य आहे. म्हणून याच्या अस्तित्वाच्या आधारावर या वस्तूची पर्याय निजपद मिळवू शकते, ध्रुवपदावर आरूढ होऊ शकते, अमर होते, शुद्ध-परमशुद्ध होते, ज्ञानमय- केवलज्ञानमय होते, केवलदर्शनमय होते, अनन्तआनन्दमय होते, परमात्मा होते, भगवान होते, हा भक्त वास्तवपर्यायात अमर होतो-या विज्ञानाचे मानतुंगाचार्य प्रखर ज्ञानी होते. हेच निजवस्तुविज्ञानशास्त्र चिन्तन म्हणजेच आत्मगुणस्तवन. आत्मगुणस्तवन म्हणजेच निजप्रभुभक्ति. निजभक्ति म्हणजेच जिनभक्ति, जिनभक्ति म्हणजेच जिनेन्द्र बनणे, जे जे जिनेन्द्र अर्हन्त तीर्थंकर सिद्ध झालेले आहेत ते सर्व या निजप्रभु निजजिन भक्तिनेच. म्हणून प्रथम प्राधान्यतेचे जिनेन्द्र म्हणजे निजजिन होय. म्हणून, भक्तामर-प्रथम श्लोकातील ' प्रथमं जिनेन्द्रं' चा अर्थ 'निजजिन 'निजजिनेन्द' ' निजत्मप्रभु' आहे. प्रथम प्राधान्यतेचे जिनेन्द्र म्हणजे प्रथम तीर्थंकर आदिनाथ नव्हे. भक्तामर स्तोत्र हे भ. 'आदिनाथ स्तोत्र' नव्हे. तर भक्तामर स्तोत्र हे निजभक्तास अमर बनविणारे निजात्मप्रभुचे स्तोत्र आहे. शाश्वतशुद्धात्मप्राप्ती घडविणाऱ्या तत्त्वाचे शास्त्र आहे.

भक्तिमहिमा

निजपर्यायभक्ताचा प्रभाव जर निजात्मप्रभुवर पडू शकत नाही. तर अन्य वस्तूपर्यायांचा वा अन्यवस्तूंचा प्रभाव निजात्मप्रभुवर कसा पडू शकेल? अर्थात संसारातील कोणत्याही शक्तीचा प्रभाव होणे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शक्यच नाही, अर्थात नाहीच. म्हणून संसार आणि संसारसंकट हे कर्मोदयावर अवलंबून आहे. जर निजात्मप्रभूची साक्षातभक्ति झाली (अर्थात निजात्मानुभव प्रत्यक्ष प्रामाण्यसहित झाला तर) आणि कर्मनिर्जरा झाली तर कर्मोदय नाही आणि कर्मोदय नाही तर संसार संकट नाही. संकटनिवारणाचे हे आहे विज्ञान.

जर संकट/संकटे असतील तर कर्मनिर्जरा होताच संकट निर्जरा होणारच. जसे केवलज्ञान होते वेळी पार्श्वनाथाचे कमठाकरवीचे संकट संपलेले होते. वस्तुविज्ञान आधारीत महिमावर्णन सह आत्मगुण स्तवन योग्य आहे, खरे आहे आणि वास्तवच आहे. तरीसुद्धा येथे संसार संकटाचे महत्त्व प्राधान्य नसून शुद्धात्मगुणवंत निजशुद्धत्मानुभव हे प्रधानतेने महत्त्वाचे आहे.

स्तोत्र-धर्म-महिमा

शुद्धात्म गुणवंत ध्रुवात्म्याचे अनुभवन हा खरा धर्म आहे. प्रत्येकास हे सहज शक्य आहे. याच धर्माने संकटेहरण होतात हे मानतुंगाचार्यांना स्तोत्रातून सांगावयाचे आहे. हा खराधर्म न करता अन्य औपचारिक धर्मक्रियेने संकटे औपचारिकपणेच निघून (?) जातात. हा आचार्यांचा अभिप्राय लक्षात न घेता भक्तामरस्तोत्राची औपचारिक भक्ति दाखविली तर धर्म घडण्याची प्रक्रिया होणे शक्य नाही. मानतुंगाचार्य स्वतः सुद्धा केवळ भक्तामर पठनाने खरी धर्मक्रिया घडवू शकत नाहीत असेच सांगतात. एवढेच काय अनेक तीर्थंकर जर एकत्रित येऊन असे कांही घडवू असे म्हणतील तर त्यांनासुद्धा असे शक्य नाही. स्वाभाविक निसर्गानियमामध्ये वस्तुविज्ञानापुढे कोणाचेही कांहीही चालू शकत नाही. जैन तत्त्वदर्शन हेच सांगते. याचे आधीन राहूनच मानतुंगाचार्यांनी स्तोत्ररचना केली आणि साक्षात धर्मक्रियेचे विज्ञान स्तोत्ररुपानें सांगीतले. म्हणून हा ख़राधर्म साक्षात अनुचरणाने [illegible] आनंदाची आजच प्राप्ती होऊन आपण भक्त शाश्वत सुखी अमर [illegible] हे भक्तामर स्तोत्राचे साक्षात फल आहे.

सर्व सम्यग्दृष्टींचा हाच अभिप्राय राहणार. त्यानुसार मानतुंगाचार्यांचा हाच खराखुरा अध्यात्मअर्थ समजून त्याचा अनुवाद परमअध्यात्मयोगी श्री वीरसागरजी मुनिवर यांनी केला असून त्याचेच प्रथम प्रकाशन येथे होत आहे.

भक्तामरास आपल्या पापास्रवाचे कारण बनवू नये !

एक आत्मा आणि त्याचा एक गुण ज्ञान. या ज्ञानाच्या विविध अनेक अनेक छटा आपण पाहिल्या आहेत. या प्रत्येक छटाचा नीट

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अर्थ करून घेणे ही जबाबदारी वक्त्याची/लेखकाची नसून वाचकांची आहे. हे करून घेणे वाचकाचे काम आहे. ही जबाबदारी नीट सांभाळली नाही तर त्या छटांचा वाचक ज्ञानगुणवान आत्मा नीट समजला जाणार नाही आणि नीट समजला नाही तर त्याची प्राप्ती होणार नाही आणि फलस्वरुप संकटे दूर होणार नाहीत.

ज्ञानगुण हे एक उदाहरण आहे. याप्रमाणेच अनेक गुणांचे नाना पर्यायाच्या संदर्भाने, नाना विषयांच्या संदर्भाने, नाना संयोग संबंधियांच्या संदर्भाने नाना छटा असणारच. याचा योग्य वापर करण्याचा अधिकार वक्त्याचा आहे आणि त्यावरून त्यांना दोष देता येणार नाही. ज्ञानी वक्त्यांनी / पूर्वाचार्यांनी तसा योग्य तऱ्हेने वापर केलेला असतो. कांही वाचकांचे विकल्प असतात की आचार्यांनी सांगताना नीट स्पष्ट सांगितले नाही; आचार्यांनी सांगतांना अवाजवी कानडघाडणी केली; आचार्यांनी सांगतांना सांगण्यास संकोच केला; आचार्यांनी रहस्य कायम ठेवले; आचार्यांनी उगीचच व्यवहार आणि निश्चय असे घोटाळ्याचे सांगितले; आचार्यांचा अभिप्राय आम्हीच नीट समजलो आहोत असा दर्प; व्यवहारनय-कथन नसेल तर धर्म बुडेल वगैरे वगैरें. तर असे आचार्यविषयी कुतर्क करू नये. असे कुतर्ककरणे म्हणजे त्यांच्या खऱ्या ज्ञानाची पारख आपणास नाही हे उघड करणे होय. म्हणून आचार्यांचा अभिप्राय समजण्याचे तारतम्यज्ञान राखले पाहिजे. तरच तर्कसह सुसंगता येते. वाचकाने/भक्ताने तरतमता राखली नाही तर आपल्या चुकीच्या अभिप्रयाने आपण घोटाळे, वादविवाद भांडणे, तंटे, बखेडे, अनर्थ, पांडित्याचे व धर्मवानत्वाचे ओंगळ प्रदर्शन करून पुण्यप्रक्रिया ऐवजी पापास्त्रवाचीच प्रक्रिया आपण घडवितो.

हे सर्व धर्मवक्त्याचा अभिप्राय कसे नीट न सजल्यामुळे घडते. आपले अभिप्राय चुकीचे आहेत हे नीट न तपासल्यामुळे घडते. परिणामतः अंधदृष्टी आणि अंधश्रद्धा बळावते. अंधश्रद्धेमुळे अनंत पापे घडतात. त्यामुळे पुण्य आणि पाप यातील फरक न कळण्यापर्यंत अज्ञानाची ग्लीनी चढते, ज्ञान मिळविण्याची इच्छा दुरावते. या ग्लानीमध्ये स्वतःचेच स्वार्थपोषक कषायपोषक तत्त्वज्ञान तयार करतो, अशांची बहुसंख्या जास्त असल्यामुळे असलेच असत्संग घडतो, असलेच गुरु भेटतात, कित्येक वेळी हे गुरु धर्मवेषधारी वा जिनलिंगधारीही असू शकतात, म्हणून गुरु आणि कुगुरु यांची पारख

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करण्याचे शिकण्यास उपदेश आगमात आहे. तत्त्वज्ञानही म्हणजे शास्त्र व कुशास्त्र याची पारख करण्यास शिकण्याबाबत अर्हन्त व आचार्य यांचा उपदेश आहे. ही पारख शिकण्याचा एकच उपाय आहे.

तो उपाय म्हणजे ही विश्वरचना, विश्वाची भौगोलिक आणि तेथील जीवांच्या अवस्थांची रचना विश्वातील सहा जातीच्या पदार्थांची माहिती, यावरून जीव/आत्मा नामक आपणवस्तूच असल्याची जाण, त्यातून आत्मोन्नतीच्या प्रक्रियेसंबंधीची सात तत्त्वे, त्यामध्ये आपले स्वतःचे स्थान, यातून आपल्या हीताचे प्रयोजनभूत ज्ञानाची उपज वगैरे वगैरे हे सर्व आहे वस्तुव्यवस्थेचे विज्ञान-शास्त्र, शास्त्र म्हणजे कुतर्क नव्हे हे भूलभूलाईचे धर्मवेडे पण नव्हे. म्हणून हे ज्ञान मिळविण्यासाठी ग्लानी आळस सोडला पाहिजे. याची व्यवस्थित माहीती घेतल्यास सर्व तऱ्हेची पारख करण्याची बुद्धी/विवेक/भेदज्ञानाची उपज होते. याच्यानेच अज्ञान आपोआप जाते. अज्ञान गेल्यामुळे अंधश्रद्धा गळून जाते. अंधश्रद्धा गेल्यामुळे पाप-पुण्य, शुभ अशुभ यातील फरक कळतो. एवढेच नव्हे तर अशुद्ध शुद्ध याचीही पारख येते.

या ज्ञानाच्या अभावी आज सामान्य श्रावकामध्ये आणि कांही सामान्य अस्वाध्यायी त्यागीजनामध्येही ही भक्तामर स्तोत्र हा अंधश्रद्धेचा विषय बनलेला आहे. णमोकार मंत्रसुद्धा अंधश्रद्धेचा विषय बनत चालला आहे. बारा अनुप्रेक्षा हा सुद्धा निर्विकल्प शुद्ध ध्यानाचा विषय असतांना सविकल्पध्यानाचा विषय बनला आहे. सर्व प्राणीमात्रास हीतकारी असणारा समयसार सारखा शुद्ध प्रणालीचा विषय गृहस्थापासून उडविला जात असून कांही त्यागीजनामध्ये समयसार विषयी अश्रद्धा असल्यामुळे त्यागीजनामधूनही उडला जात आहे. समयसार विषयी विपरितता पसरविली जात आहे. अज्ञानापायी काय होणार नाही? याची पारख निजात्म उन्नति करणारास नको काय?

ज्याप्रमाणे कायद्याची माहिती नसल्यामुळे अपराध घडला तरीही तो अपराध शिक्षेस पात्र आहे, दंडनीयच आहे. अपघातासंबंधी असल्यास अपघाती दुःख भोगणे क्रमप्राप्तच आहे. थोडासा कायदा माहीत आहे, तेवढ्यावरच आमचे भागते असे म्हणून चालत नाही. उदा. रहदारीच्या कायद्यापैकी डाव्या बाजूने चालावे एवढेच समजून चालत नाही. तर ओव्हरटेक व रोडसिग्नल, साईन बोर्डची माहिती नसेल तर पश्चातापाची पाळी येणार. दुसऱ्यास अपघात घडविण्यास

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कारणीभूत होणार. म्हणून कमी प्रतीचे ध्येय ठेवणे, अल्प ज्ञान राखणेची वृत्ती हा स्वभावतःच अपराध आहे. Low aim is crime हे समजून घेतले पाहिजे.

त्याचप्रमाणे धर्मशास्त्रा संबंधीही समजावे. धर्मशास्त्र म्हणजे ही विश्वरचना आणि त्यामधील आपली जबाबदारी व हक्क आणि निजपदस्थान समजण्याचे शास्त्र. अर्थात विश्वातील सर्व वस्तु, मूर्त अमूर्त वस्तु, नेत्रेंद्रियास दिसणारे न दिसणाऱ्या वस्तु यांची त्यांच्या गुणधर्मासह माहितीचे वस्तुव्यवस्था वस्तुविज्ञान शास्त्र. याची माहिती साक्षर निरक्षर, स्त्री पुरुष, पदवीधर उच्च पदवीधर, उंद्योगपती नोकर सगळ्यानाच जरुरीची आहे.

वास्तुशास्त्र हा तर निव्वळ अंधश्रद्धेचा विषय झाला आहे. वास्तुपुरुष ही योनीच जैनशास्त्रामध्ये नाही. योनीच नाही तर त्याचे अस्तित्वच नाही. जर त्याचे अस्तित्वच नाही. तर त्याने अपराध्यास दंड शिक्षा फल देण्याचा प्रश्नच येत नाही. फक्त संयोग संबंध जेथे होऊ शकतात, केवल तेथेच दंड शिक्षा फल देण्याचा अधिकार द्रव्यकर्मास आहे. हे अधिकार पापफल व पुण्यफल असे दोन प्रकारचे आहेत. हा द्रव्यकर्माचा अधिकार निराबाधपणे अनादिकाळापासून चालत आलेला असून अनंतकाळापर्यंत चालणार आहे. या अधिकारात वास्तुपुरुषाचे अतिक्रमण अधिकार समजणे निव्वळ अंधक्षद्धेचे आहे. ही अंधश्रद्धा विश्ववस्तुविज्ञानशास्त्राचे अज्ञान जनक आहे. तर मग वास्तुपुरुष अंधश्रद्धाकरणारीं सरकारी पदवीधर महान इंजिनियर असले तरी अडाणी आहेत. उलट स्थापत्य शास्त्राचे पदवीधर असूनही त्या पदवीशास्त्राचा अविश्वास करणारे आहेत. त्याचप्रमाणे शाश्वत अस्तिवनित्यशुद्धवान निजध्रुवात्म्यावर द्रव्यकर्म संयोगितकर्मफळ लादू शकत नाही. हा सिद्धान्तसुद्धा विश्ववस्तु विज्ञानशास्त्राच्या नियमानुसारच आहे. म्हणून मी/प्रत्येकाचा आत्मा निजध्रुवात्म्याच्या आश्रयानेच संयोगसंबंधि दुःखामधून मुक्त होणार हे या विज्ञानाचे परिज्ञान आहे. वैज्ञानिक प्रक्रियाच आहे. सायन्सच्या पदवीधरांनी येथे अवश्य विचार करावा.

तत्त्वार्यसूत्र अध्याय ६ सूत्र १३ मध्ये म्हटले आहे कि,-

केवलि भगवान, श्रुतशास्त्र, मुनिसंघ, जैन तत्त्वज्ञान धर्म आणि वीतरागी हितोपदेशी सर्वज्ञदेव यांच्या विषयीचा अवर्णवाद करणे हे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दर्शनमोहनीय कर्मांचा आस्त्रव करून घेण्यास कारण आहे.

दर्शनमोहनीय म्हणजे अत्यंत तीव्र पाप. या विश्वातील उत्कृष्ट महान पाप. हे पाप अंधश्रद्धा दृढ-दृढतर करण्यास कारण आहे. गुणवान थोर पुरुषामध्ये जो दोष नाही तो दोष त्यांच्यामध्ये आहे असे समजणे/ सांगणे अवर्णवाद आहे. (पहा सर्वार्थसिद्धि ६/१३/३३१/ १३. राजवार्तिक पान ५२४... जैनन्द्र सिद्धान्त कोश भाग १ पान २०० ब आणि २०१ अ.)

उपरोक्त संदर्भ श्रुतशास्त्र अवर्णवादसंबंधि खालीलप्रमाणे पहाता येईल.

भक्तामर स्तोत्र हे श्रुतशास्त्र आहे. म्हणून या विषयी अवर्णवाद करू नये. उदा. भक्तामर स्तोत्रातील विशिष्ट एकाद्या श्लोकाचा विशिष्ट मनोवांछित लौकिक कौटुंबिक निजस्वार्थी संसारपोषक कार्य सिद्धिसाठी मंत्र आहे असे समजून वापर करण्याचा प्रयत्न करणे; त्याचे जपजाप्य करणे. भक्तामर मधील तत्त्वज्ञान, विज्ञान, परिज्ञान न समजून घेता सुद्धा दररोज पठन केले तर संसार सुखकारक होईल असे समजणे अवर्णवादच आहे. आज आम्हास भक्तामर पठण एवढेच पुरे, एवढ्यानेच जेवढे कल्याण होईल तेवढेचपुरे हा सुद्धा अवर्णवाद आहे. यामध्ये कमीप्रतीचे ध्येय, अल्पध्येय ठेवण्याचा अपराध आहे. यामुळेही पापास्त्रव पक्काच. वीतरागी देवाचे गुण-महात्म्य विसरून/गौण करून सरागी देव-देवता ची स्थापना-भक्ति करणे यामध्येही तोच अपराध आहे. अशीच भक्ति-श्रद्धा स्थापित मूर्ति व अतिशयक्षेत्र मंदिरात नवस-यात्रा करणे हा पापास्त्रव घडविणारा अपराध आहे. आगमशास्त्रात हे सर्व स्पष्ट आहे. तरीसुद्धा त्याच्याकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष करणे हा मोठा अपराध नव्हे तर काय आहे? याच्याने दुर्गति होणार नाही तर काय होईल?

खऱ्या मोक्षमार्गाला दुषित ठरविणे आणि असत्य/अवैज्ञानिक मार्गाला खरे असल्याचे समजणे/सांगणे/अनुमोदन करणे हे दर्शनमोहनीय कर्मास्त्रवाचे/दृढ अंधश्रद्धाचे कारण असल्याचे तत्त्वार्थसार ४.२८ येथे म्हटले आहे. असे उल्लेख सर्वत्र आहेत. पण लक्षात घेतो कोण ?

सर्वार्थसिद्धी ८/९/७४९ मध्ये म्हटले आहे की सर्वज्ञप्रणित मार्गापासून विन्मुख होऊन तत्त्वार्थ श्रद्धान करण्यामध्ये निरुत्साही आहे. म्हणजे आत्महीताच्या दृष्टीने जसे तत्त्व (सृष्टीरचना) आहे तसे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अर्थ ग्रहण करून (निजध्रुवशुद्धात्म्याचे स्थान महत्व) श्रद्धान करण्याचे (तत्त्वनिर्णय करण्याचे) वैचारिक/बौद्धिक कष्ट घेत नाही, निरुत्साही रहातो, बहाना करीत राहतो तो दर्शनमोहाची पुष्टी करतो.

तर मग असा जीव लहान थोर असो, स्त्री पुरुष असो अशिक्षित सुशिक्षित असो पदवीधर, उच्च पदवीधर असो, लौकिक प्रतिष्ठित असो, गरीब असो वा धनाढ्य असो, समाज कार्यकर्ता असो जैन समाज कार्यकर्ता असो श्रोता असो वा बलाढ्य वक्ता असो, श्रावक असो वा त्यागी असो तो या प्रयोजन बुद्धीच्या अपेक्षेने मागासलेलाच आहे. दर्शनमोहाची पुष्टी म्हणजे टकटक पहाणाऱ्या ज्ञानहीन पशुप्रमाणे असल्याचे आगमात म्हटले आहे. इतका ज्ञानहीन आहे की स्त्रीस मुक्ती आहे की नाही अशा वादात अडकतो, समयसार गृहस्था (स्त्री वा पुरुष) साठी आहे की नाही असा वाद करण्यात बुद्धी खर्च करतो, जैनतत्त्वज्ञान तर अखिल जीवमात्रास पतितास पावन करणारा (कषायग्रस्तास अथवा मंदकषायीस) आहे हे विसरतो, प्रत्येक जीवात्मा केवलज्ञानस्वभावी नित्यशुद्ध (सुद्धप्पं) असल्याचे जैनदर्शन शास्त्र सांगते. स्त्री वा पुरुष गृहस्थीस, स्त्री वा पुरुष त्यागीस, (परसमय) मोक्षं होत नसून (सागारणगारधम्मदो भिण्णो) ध्रुवशुद्धात्मा (सुद्धप्पं) (स्वसमयद्रव्य) पर्यायामध्ये अनादि संसारी असल्यामुळे पर्यायामध्ये केवलज्ञान प्रगट करण्याची क्रान्तिकारी तपश्चर्चा करून (सुद्धप्पं चिंतए णिच्चं) मोक्ष (स्वसमयपर्याय) मिळवितो.

(पहा बारसणुवेक्खा धम्मणुवेक्खा गाथा ८२
णिच्छयणएण जीवो सागारणगारधम्मदो भिण्णो ।
मज्झत्थभावणाए सुद्धप्पं चिंतए णिच्चं ॥८२॥)

ही तपश्चर्या म्हणजे तरी काय आहे? सहा द्रव्ये, सातत्त्वेचे, उत्पाद-व्यय-ध्रुव निश्चयनय-व्यवहारनय इत्यादि सृष्टीरचनेतील वस्तुव्यवस्थेचा/वस्तुविज्ञानाचा मुलभूत पाया समजून तत्त्वास (तत्‌रुपास) तो तो रुपाने असणाऱ्या अन्वयरूप ध्रुवास जाणले (शुद्धोपयोग) अतीन्द्रिय आनन्दस्वरुपास अनुभवले (शुद्धोपयोग) तर शुद्धध्यान/सत्‌ध्यान/धर्म्यध्यान/ सम्यग्दर्शन सहजच प्रगटते. हा द्रव्यानुयोगचा सार आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प.पू.श्री वीरसागरजी मुनिवर यांच्या शब्दात :-

वस्तुमधील अविनाशी अंश आणि क्षणिक अंश जाणून घेऊन 'माझा जीव अविनाशी ज्ञानानन्दमय आहे' असा विचार केला तर रोजच्या जीवनात आत्ता सम्यक् (खरा, परनिरपेक्ष) आनन्द मिळतो, समाधान, समता व शान्तता मिळते आणि सर्व दुःख नष्ट होते.

प.पू. वीरसागरजी 'शुद्धोऽहं' डायरी पान १७ ओळ १९,२० येथे म्हणतात. " मग वीतरागते शिवाय इतराची पूजा (पूजनीयतेचा भाव) करावयास सांगणे हा अवर्णवाद आहे".

हे एवढे वाचल्यानंतर हे सर्व तत्वज्ञान समजण्यासाठी फार मोठी बुद्धी लागत असेल असे विचार येऊ शकतील. पण तसे कांही नाही. कारण मन इन्द्रिय असलेले पशुपक्षी हे सुद्धा उपरोक्त तत्त्वज्ञानाचे शब्द कांहीही न जाणता हे बाह्यरुपातील जग म्हणजे भूख, तहान, शरीर वेदना, शरीर पोषणाचा उपद्व्याप, या उपद्व्यापपोटी क्रोधमान, मायालोभ शोकभय जगुसा हास्य रति अरति स्त्रीवेद पुरुषवेद नपुसकवेदच्या भावना शब्दाविना हे बाह्य स्वरुपाचे जग माझे नव्हे मी नव्हे मी शाश्वत परनिरपेक्ष आहे अशी भेदज्ञानपूर्वक जाण, जाणीव, नेणीव, उमज स्वयंप्रेरणेने शब्दाविना करून (प्रमाणज्ञान) शुद्धात्मानुभव करतात. तसेच छोटे मोठे व्रत धारण करतात. अशाव्रतधारी मानवाची संख्या तेरा कोटी या जगतामध्ये आहे. तर अशा व्रतधारी पशुपक्षांची संख्या तेरा कोटी पेक्षा जास्त आहे. यावरून बोध घ्यावा की भद्रपरिणामी प्रयोजनभूत स्व-पर-विवेक भेदज्ञानाची अल्पस्वल्प बुद्धी येथे कार्यकारी आहे.

एकंदरीत स्वाध्याय महत्त्वाचा आहे. ग्रन्थ वाचाल स्वाध्याय कराल तर वाचाल, अन्यथा....। आजकाल स्वयंवाचन-स्वाध्याय करण्यापेक्षा सत्संग करून स्वाध्याय करणे चांगले. प.पू. वीरसागरजी शुद्धोऽहं डायरी पान २६ वर म्हणतात-

"तत्त्व समजून घेताना थोडे थोडे लोक एकमेकांशी चर्चा करतील तेंव्हा ती जास्त परिणामकारक ठरेल असे वाटते. पुष्कळ गर्दीत प्रवचन झाले तर ते कांही दिशा देईल असे वाटले. तरी सुद्धा मुख्य परिणाम थोड्या थोड्या लोकांनी मिळून चर्चा केली तर बरे होते. कारण त्यांच्या शंका ज्या उत्पन्न होतात त्या त्या गोष्टीला त्यांच्याच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परिभाषेत व त्यांच्याच उदाहरणातून समजाऊन देणे किंवा घेणे होऊ शकते. त्याचप्रमाणे त्यागी जनांना समजाऊन देणे किंवा घेणे असेल तर जिज्ञासा वृत्तीने होणे आवश्यक आहे. वीतरागता निर्माण होण्यासाठी क्रमाक्रमाने पुस्तकवाचत बदल होण्याची शक्यता आहे. कारण आचार्यांच्या शब्दाला दोष दिला जात नाही. त्यावेळी चक्षूसमोर शास्त्र व कानांनी शब्द ऐकणे या दोन गोष्टी जवळ जवळ चालतात. त्यामुळे परिणाम छान घडतो''.

या थोड्या थोड्या लोकांच्या चर्चा शैलीस पं. टोडरमलजी जयपुर यांच्या काळात ''सैली'' असे म्हणत असत. या पद्धतीनुसार त्यावेळी अनेक गावांतून स्वाध्याय झाल्यामुळे बराच मोठ्या संख्येने श्रावक सुजाण झाले होते.

परमअध्यात्मयोगी श्री वीरसागरजी आणि भक्तामर, अध्यात्मानुवाद

मुनिदीक्षापूर्व गृहस्थीचे नांव श्री चंद्रकान्त गुलाबचंद दोशी, अकलुज. जि.सोलापूर, महाराष्ट्र. लहानपणापासूनच चिंतनशील प्रकृति, तसे लहानपणीच चारित्रचक्रवर्ती आचार्य शांतिसागरजी यांच्या सल्लेखना अखेरीस स्वप्नदृष्टांत मिळाला होता की, 'हा कंदील घेऊन पुढे जा', तरीसुद्धा कॉलेज प्रवेश वेळेपर्यंत जैनधर्माची पुसटशी सुद्धा ओळख झालेली नव्हती. हीच मनी डाचणी असल्यामुळे जैनधर्मशिक्षण कोठे व कसे मिळेल या प्रश्नचक्रचिंतनेतून विचार आला की जीवात्म्याचे शिक्षण जीवशास्त्र विषय असलेल्या वैद्यकीय एम.बी.बी.एस. पदवी शिक्षणातून मिळू शकेल काय? याचे उत्तर शोधण्यासाठी एम.बी.बी.एस. शिक्षण सुरु करून पूर्ण केले. पण प्रश्न समाधान झाले नाही. म्हणून डॉक्टरी पेशा परभणी येथे (१९६७ इसवी) सुरु करून जैनधर्माविषयीची सर्व प्रकारची पुस्तके खरेदी करून पोतीच्या पोती पुस्तकांचा स्वाध्याय सुरु केला.

त्या स्वाध्यायमधून निजजीवात्मा मिळून फलित निजध्रुवद्धात्मानुभवानन्द चाखत राहीले. हे सर्व दवाखाना करीत करीतच. ते सुद्धा इन्कम टॅक्स भरण्याइतपत चांगला चाललेला व्यवसाय करीत करीत. अपरिहार्य फलित गृहस्थीवैराग्य आले. दिक्षाक्रमवारीचे रुढ संकेत झुगारून एकदम क्रांन्तिकारक नग्नदिगम्बर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दीक्षा अक्षयतृतीया दिनांक १४/५/१९७५ अकलुज येथे घेऊन प्रत्येक अंतर्मूहूर्तानंतर निजशुद्धात्मविहार सुरु केला. क्षेत्रविहार प्रामुख्याने सोलापूर जिल्ह्यातच झाला.

या दीक्षा कालावधीमध्ये तर मूळप्राचीन आचार्य ग्रन्थाचे संस्कृत प्राकृत भाषा व्याकरण सह प्रचंड पठन पाठन करून प्राचीन आचार्यांच्या समान जीवनक्रम चालू ठेवला. यातूनच ग्रन्थनिर्मिती अनुवादटीका रुपाने सुरु झाली. प्रवचन, ग्रन्थनिर्मिती, दैनंदिन विहारचर्या यामध्ये प्राचीन आचार्य समानच प्रामाण्य संपूर्ण दीक्षाकालात सतत अंतिम यमसंलेखना संपेपर्यंत राहीले.

यातच एक सुयोग समवशरणातील राजा श्रेणिकचे पुण्य घेऊन दि. ८/८/१९९२ रोजी कोल्हापूरचे स्वातंत्र्य सैनिक पंडीतजी गणपतराव सन्नप्पा गिरजे अण्णा यांचे प.पू. वीरसागरजी महाराज यांचे सभेमध्ये सोलापूर येथे शुभागमन झाले. श्री मिरजे आण्णा हे भक्तामर स्तोत्राविषयी कांही त्यागीजन आणि भक्तगण यांच्या प्रचलित अंधश्रद्धेविषयी पेटून उठलेल्या व्यक्तिमत्वाचे होते. म्हणून श्री मिरजे अण्णा यांच्या पुण्योदयाने परमअध्यात्मयोगी मुनिवर वीरसागरजी यांनी अनादिकाळाच्या तीर्थंकरप्रणितवाणीच्या अधिकाराने निजध्रुवशुद्धात्मानुभूतीच्या बळाने प.पू. श्री मानतुंगाचार्यांशी एकरूप संवाद करून त्यांची रचना भक्तामर स्तोत्राचा अध्यात्मानुवाद अर्थात मुळ भावानुवाद मराठीतून केला. तो मी (नाभिराज नारकर) श्री मिरजे यांच्यातर्फे मिरजे आण्णा त्यांचे समक्ष दिनांक ९/८/९२ ते १५/८/९२ पर्यंत प.पू. वीरसागरजी जसे सांगतील तसा लिहून घेतला. महाराष्ट्रीय मराठीजनांचे दिव्य भाग्यच हे ! वाचकांनी हे दिव्य भाग्य आत्मसात करावे ही भावना.

निर्ग्रन्थकरण

हे दिव्यभाग्य आत्मसात करण्यासाठी मिथ्यात्वग्रन्थीचे/कठीण गाठीचे निर्ग्रन्थकरण होणे आवश्यक आहे. या मिथ्यात्वग्रन्थी/गाठी जिनसिद्धान्ततत्त्वाच्या अज्ञानामुळे नसानसामधून कठीण होऊन बसलेल्या असतात. त्यामुळे स्वाभाविक निरपेक्ष निर्भेळ आनंद प्रवाह नसातून नीट प्रवाहीत होऊ शकत नाही. ग्रन्थी विरून जाण्यासाठी जिनसिद्धान्ततत्त्वनिर्णय हे एकच एकमेव औषध उपाय आहे. ज्यांना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाटत असेल की, आपला तत्त्वनिर्णय झालेला आहे म्हणून आपल्या ग्रन्थी नष्ट झालेल्या आहेत. त्यांनी सुद्धा लक्षात घ्यावे की ही केवळ प्रायोग्यलाब्धि दिसते. म्हणजे अद्याप सूक्ष्मग्रन्थी (सूक्ष्मपरसमयपणा) अटकाव करीत आहेत. कारण अद्याप निजध्रुवशुद्धज्ञानदर्शन आनन्दानुभव झालेला नाही याची जाणीव आहे. वारंवार प्रयोगाचे प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत. अन्यथा अंधश्रद्धा पोषक कोणतेही लोभस युक्तिवादाने फसून, अपथ्य घडून ग्रन्थी पुन्हा कठीण होऊन बसतील. ज्यांच्या अनंतानुबन्धिच्या ग्रन्थी गेलेल्या आहेत. त्यांनी सुद्धा अप्रत्याख्यान, प्रत्याख्यानाच्या ग्रन्थी मृदु समजून बाळगणे योग्य नाही. प्रत्यक्ष प्रामाण्य सहित निजध्रुवशुद्धात्मानुभवाच्या सातत्याच्या बळाने व्रताचरण निर्दोष करून पूर्ण निर्ग्रन्थीकरण म्हणजे पूर्णवीतरागतेचे विज्ञानीकरण चालू ठेवावे. याच औषधोपचाराची मलाही गरज आहे.

वीतराग मधील अर्थ समजून घेणे प्रेरणात्मकच आहे. वि+इत+राग=विशेष रीतीने + जाणे/गेलेला + राग – क्रोधमान माया लोभ. क्रोधमानमायालोभादिकषाय ज्यांचे विशेष तऱ्हेने गेलेले आहेत ते वीतरागी होय. (ऱ्हस्व वि+ऱ्हस्व+इत = दीर्घ वीत असे वीतरागाची वेलांटी दीर्घ असते.)

येथे सामान्यपणे कषाय जाणे इतकाच भाव घेतला जातो. पण खास लक्षात घेण्याचे आहे की, 'विशेष तऱ्हेने' राग जाणे यातील 'विशेष तऱ्हा' म्हणजे ''निजध्रुवशुद्धात्मानुभव प्रत्यक्ष व प्रामाण्यसहित'' हे आहे. याचे भान/ध्यान असावे.

लोकानुप्रेक्षा

भक्तामर स्तोत्राचा असलेला संबंध शेवटी स्पष्ट होईलच. 'संबंध' प्रत्येकाचा प्रत्येकाशी असल्याचे लोकाकाशातील महास्कंधाची रचना पहाता लक्षात येण्यासारखे आहे. फक्त लोकाकाशामध्येच सर्व पदार्थांचा मिळून लोकाकाशाच्या आकाराचा एक महास्कंध बनलेला आहे. यामुळे महास्कंध म्हणताच संपूर्ण विश्वातील प्रत्येक वस्तूचा अन्य प्रत्येक वस्तूशी व्यवहार नव्याने असलेला घनिष्ट व घनीभूत संबंध लक्षात येतो.

निश्चयनयाने कांहीही संबंध नाही असे सुद्धा म्हणता येणार नाही हे मी निश्चनयाने सांगतो. ज्याप्रमाणे धवलामध्ये पुद्गलद्रव्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्मसंबंधाने असलेला करणानुयोग आहे असे स्थूल मानाने समजले जाते. पण त्याच धवलामध्ये वाक्य आहे की हा ग्रंथ निश्चयनयाने सांगितलेला आहे.

अशा या करणानुयोगमध्ये आत्मा ध्रुवात्मा ध्रुवशुद्धात्मा नाही आणि केवळ गहन विचारवंत पंडितासाठी/पंडितबुद्धीच्या मुनिसाठी आहे, गृहस्थानी पाहू नये असा विचार सनातनीपणाने चालू असतांना मध्ये आत्मा, खाली आत्मा, वर आत्मा, आजूने आत्मा, बाजूने आत्मा चोहोबाजूने आत्मा, आसमंतातून आत्मा असा आत्मा षटखंडागमतूंन धवलातून श्रीमान डॉ. चंद्रकान्त गुलाबचन्द दोशी परभणी यांना सापडल्याचे ते साधारण १९७२ मध्ये सांगत होते. आणखी असे ही म्हणत होते की जैन आगम शास्त्रात या विश्वातील अमुक हा विषय नाही असे होणे कदापि शक्य नाही. अशी प्रचिती त्यांना आलेली असल्याचे ते सांगत होते. त्यांना ही माहिती जिज्ञासेने पत्र व्यवहार केला असतांना सिद्धान्तशास्त्री पं. फुलचंद शास्त्री यांचेकडून मिळाली असल्याचे ते डॉक्टर सदगृहस्थ म्हणत होते. जैन दर्शन शास्त्र जैन अध्यात्म क्षेत्रात ते नवीनच सद्गृहस्थ आलेले असून डॉक्टर यांच्या पत्राचारावरून विचाराची प्रश्नाची बैठक फार चांगली असल्याचे माझे गुरु पंडीत नरेंद्र दादा ज. भिसीकर हे जीवराज ग्रंथमाला सोलापुर येथे सांगत होते. यास माझे मित्रवर्य श्री लालचंद हरिश्चंद जैन परभणकर मानवत यांनी दुजोरा दिलेला आहे. असा शुद्धात्माचा आणि षटखंडागम धवलाचा धनिष्ट संबंध आहे. आणि तो प्रत्यक्ष प्रामाण्यसहित अनुभवला असल्याचे डॉ. सद्गृहस्थांनी सांगितले.

ज्याप्रमाणे सर्व जैन समाज समजतो कि सिद्धालयातील सिद्धामध्ये एकाही सिद्धामध्ये राग-अनुराग, राग-द्वेष, क्रोधमानमायालोभ कषायाचा अतिसूक्ष्म अणुमात्र सुद्धा संबंध नाही. या कषाय मोहादि नांव ही सोडून दिले तरी या अफाट ब्रम्हांडातील लोक आलोकातील विश्वातील घनीभूतसंबंधाच्या महास्कन्धामधील एकाही अणूचा संबंध सिद्धाना नाही, एवढेच काय आकाश द्रव्याच्या अतिसूक्ष्म भाग असलेला एक प्रदेश याचाही संबंध सिद्धाना नाही असे जैन समाज़ समजतो. पण याच जैन समाजामध्ये उमज अशी आहे की, प्रत्येक़ सिद्धाच्या ज्ञानामध्ये विश्वातील सर्व अणू रेणूच काय, त्या अणूरेणूशी वेणू घेऊन खेळत असलेला प्रत्येकन् प्रत्येक जीव आणि या अणू रेणू जीव यांचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संपूर्ण भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळातील संपूर्ण खेळ स्पष्टपणे सिद्ध जाणत आहेत. याप्रमाणे प्रत्येक सिद्धामध्ये संपूर्ण विश्व झळाळलेले आहे. सामावलेले आहे. प्रत्येक सिद्धामध्ये त्यांच्या निर्मळ ज्ञानगुणामुळे आणि प्रत्येक द्रव्याच्या प्रमेयत्व गुणामुळे संपूर्ण विश्वच समाविष्ट प्रविष्ट आहे. असे सिद्ध आणि विश्व यांचे व्यवहाराने घनिष्ट संबंध आहे.

असे घनिष्ट किंवा प्रविष्ट संबंध आकाश द्रव्याचे अणुपरमाणुच यांचेशीच काय, संपूर्ण विश्वाशी संबंध नाही, संपूर्ण विश्वाला आकाशाने धारण करून सुद्धा. म्हणून अतिस्वच्छ निर्मळ, अतिनिर्लेपचे पूर्ण निरपेक्षतेचे जर उदाहरण द्यावयाचे असल्यास आचार्य सिद्धापेक्षा अधिक आकाश द्रव्याचेच देतात. आकाशाने आपल्याशी संबंध ठेवला नसला तरी आपला त्याच्याशी संबंध आहे. म्हणून संपूर्ण विश्वांच्या आकाराला धारण करून सुद्धा आकाशद्रव्य लोकाकाश अलोकाकाश आकाशद्रव्याचा अतिसूक्ष्म पण आकाशद्रव्याशी अविभाज्य असणारा प्रदेश भाग तसेच त्या सूक्ष्म प्रदेशाचा पुन्हा सूक्ष्म भाग पडू शकणार नाही असा अविभाज्य प्रदेश निर्लेप कसा असू शकतो याची माहिती आपणास असणे आवश्यक आहे.

या माहितीतून आपणास आपले दुःख गाळून टाकून अत्यंत अचल निश्चल स्थीर राहण्याचा बोध सहज मिळू शकतो.

आधुनिकजग या ब्रम्हांडालाच काय, ब्रम्हांडाच्या अगदी सूक्ष्म भागालासुद्धा यथार्थपणे जाणू शकला नाही. संपूर्ण सृष्टी निर्मितींचे कर्तृत्व घेणाऱ्या विश्वव्यापी आणि सर्वज्ञशास्त्र म्हणविणाऱ्या विशालगहन अशा जैनेतर दर्शनशास्त्रासुद्धा अजून विश्वाचा आकारसुद्धा नीट सांगता आलेला नाही. अशा परिस्थितीत हा तथाकथित वैज्ञानिक क्षूद्रमानव पृथ्वीगोलच्या बाहेर खगोल म्हणून अन्तराळगोलास आपल्या हाताने गवसणी घालून स्वतः गोल होत आहे याचे भान नाही. सर्वज्ञप्रणेता म्हणविणाऱ्या दर्शनशास्त्रकाराना स्वतःची रचना नीट माहीत नाही, पण सृष्टी रचनेस आवाहन देऊन प्रति सृष्टी रचना करण्याचा दर्प करतो. ह्या प्रतिसृष्टी निर्मात्यास ही आकाशद्रव्य नि आकाशाचा आकार, घनीभूत सृष्टीचा आकार आणि त्यामध्ये स्वतःचे स्थान विषयी पूर्ण अज्ञान, मात्र पूर्ण दर्प आहे. दर्शनशास्त्र व ते सुद्धा एकीकडे 'विश्वदर्शन' चे कौतुक करतील, पण एकीकडे समाजातील अंधश्रद्धा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि कुरुढी बाबत तोंड उघडू शकत नाहीत. उदा. निर्व्याज स्त्री 'सती' म्हणून ढकलून दिले जात असतांना तिची प्राणहिंसा टाळण्यासाठी शास्त्राधार देऊ शकत नाही. ज्ञानेश्वराच्या मातापित्यास आणि स्वतः ज्ञानेश्वर भावंडास समाजात राहण्यासाठी शास्त्राधार मिळाला नाही.

हे सर्व या विशाल विश्वाची स्थीरता आणि त्यामध्ये आपले स्वतःच्या स्थानासंबंधीची स्थीरता न समजल्यामुळे घडते. कधी स्वतः विश्वव्यापण्याची गोष्ट करतो तर कधी स्वतःस शून्य समजून बसतो. या सगळ्यामध्ये तत्त्वरुपाने मेळ नाही. म्हणून प्रथम येथे या विश्वाची अंतराळरुप कल्पना म्हणजे बोगस कल्पनामधून बाहेर पडण्यासाठी जैनदर्शन शास्त्राने लोकाकाश आणि त्यामधील सुनिश्चित भूरचना असलेल्या विश्वाकाराची फक्त एकच आकृति येथे दिली आहे. विस्तारभय आणि विषयांतर कल्पनेमुळे अनेक अनेक सुनिश्चिततेच्या आकृत्या आणि त्याचा तपशील येथे देता येणे शक्य नाही.

पण त्यांच्यातून घेण्याच्या बोधाची निश्चित अल्प कल्पना यावी म्हणून स्वल्पशी चर्चा येथे पाहू या.

बाह्य लोकाकार तसा एकदम चौकोनाकार नसला तरी त्यामधील वक्राकृतिमध्ये आणि त्यामधील प्रमुख अधोलोक, मध्यलोक आणि उर्ध्वलोक या तिन्ही लोकांच्या आकृति भूभाग रचनेमध्ये अनादि अनंत अबाधित निश्चल असे स्थैर्य आहे. ही स्थैर्यता त्यांच्या भाग-विभाग अनुभाग मधील रचनेतही पूर्णतेने आहे. हे कथन नरकाचे ७ भाग मध्यलोकातील सूर्यचंद्रासह असंख्यात द्वीप, स्वर्ग मोक्षाचे ६३+१ भाग, वातवलयांची जागा यासंबंधी आहे. यांच्यामध्ये किंचितही बदल स्थलांतर कधीही नाही. या संपूर्ण भागातील जीवात्म्याच्या आयुमर्यादेमध्ये एक समयाचासुद्धा फरक होत नाही. विकल्प आहे फक्त तो मध्यलोकातील भोगभूमिसुद्धा सोडून राहिलेल्या कर्मभूमीतील जीवांच्या आयुमर्यादेसंबंधि, म्हणजे अकाल मृत्युसंबंधि, बाकी सर्व ठिकाणी म्हणजे अधोलोक, मध्यलोकातील कर्मभूमि सोडून सर्व भाग, आणि संपूर्ण स्वर्गलोक येथील जीवांचे आयुकाल संपण्याच्या एक समयसुद्धा अगोदर मरण येत नाही इतक्या मोठ्या भागात इतके सुनिश्चित जीवनकाळ आहे. तर मग फक्त कर्मभूमीतील मानवानी घाबरण्याचे काय कारण? सृष्टीरचनाच तशी मजबूत आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यातूनही समजा एखादी इमारत अचानक कोसळली तर त्यास म्हणतो की जूनी होण्याच्या आत म्हणजे ठरलेल्या कालाच्या आतच अकालीच कोसळली हानी झाली, पण इमारतच्या ज्या भागामुळे कोसळण्याचा प्रसंग ओढवला तो भाग बांधतानाच त्याठिकाणी कमजोर बांधला गेला होता. म्हणजे बांधते वेळीच त्याची कालमार्यादा तशी कमीच होती. पण इतर भागाच्या मोहापोटी तो भागही अकालीसदृश होता, म्हणून इमारत अकाली कोसळली असे म्हणता येत नाही. त्याच प्रमाणे आयुकर्मरचने संबंधातील स्थितीकाल व अनुभागकाल यांच्या संरचनेच्या वेळीच कांही विशिष्ट तऱ्हेचे संबंध निर्माण झालेले असतात. म्हणून अकाली मृत्यु वा अपघाती मृत्यु उगीचच भासतो. वास्तविक सर्व कांही व्यवस्थित सुनिश्चितच कार्य चालू आहे. अशा अकारण विकल्पातून आपली आपणच सुटका करून घेतली पाहिजे. कोण्या एका जीवाचा बळी घेऊन कोणास सक्तीने सती करून, कोणा व्यक्तिस अथवा कोण्या व्यक्तीसमूहास समाजातून उठवून देण्याची वृत्ती इच्छा करणे चुकीचे असल्याचे सिद्ध होते. तर कोणास जगातून नष्ट करण्याची शक्ति आपल्यात आहे. असे समजणे किती अडाणी आहे याची कल्पनाच करवत नाही. असेच स्वतःच्या आत्महत्येसंबंधीही समजावे. या संपूर्ण विश्वात कोणतीही वस्तू नवीन उत्पन्न होत नाही. आणि असलेली कोणतीही वस्त नष्ट होत नाही असा दर्शनशास्त्रांचा सिद्धान्त असून असाच आधुनिक विज्ञान शास्त्रांचासुद्धा आहे. मग कोणाचा जीवात्मा तुम्ही कसा नष्ट करणार? आणि अफाट विश्वात त्यास नष्ट करण्यासाठी त्याचा पाठलाग कुठे कुठे तुम्ही करणार? तो तुमच्या भोवती कोणत्या रुपात असेल हे कळणार आहे काय? अर्थात असला अडाणीपणा सोडला पाहिजे. असा आहे आपला आणि विश्वाचा संबंध !

विश्व-विंश्वाकार -विश्वातील अणुपरमाणु आदि मूर्त व अमूर्त पदार्थांचे अस्तित्व त्यांचे आकार-अवकाश-गति-स्थिरता संबंधीची वस्तुव्यवस्था सूक्ष्म वा स्थूल वस्तूंची परिणमनशीलतेसंबंध उत्पाद-व्यय-ध्रौव्यरुप प्रक्रियांची वस्तुव्यवस्था या संबंधी ज्ञान नसेल तर ती व्यक्ति स्वतःस शास्त्रज्ञ किंवा विद्वान कसे म्हणवू शकते?

भोपाळमधील भारत हेवी इलेक्ट्रिकल लि.-भेलमधील माजी परमाणु अभियंता (न्युक्लियर इंजिनियर) पं. हेमचंद जैन देवळाली हे अगदी उत्तम तऱ्हेने सांगतात कि उच्च कोटीचे शास्त्रज्ञानी या विश्वातील

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सहा प्रकारच्या पदार्थांचे अस्तित्व कसे व कोणाच्या शब्दात मान्य केलेले आहे. १) पुद्गल मॅटर २) जीव= जाणण्याची शक्ति असलेली कांहीतरी वस्तु. (spirit) शास्त्रज्ञांच्या मते पंचमहाभूतासारख्या पदार्थांतून ज्ञानगुणसंपन्न गुणधर्म किंवा वस्तु निर्माण होऊ शकणार नाही. ३) धर्मद्रव्य वस्तु = ईथर = गतिमानतेसाठी सहायक ४) अधर्मद्रव्य = अँटीईथर = गतिमानतेतून स्थिरतेसाठी सहाय्यक ५) कालद्रव्य = टाईम ६) आकाशद्रव्य=स्पेस. या सहा प्रकारच्या जातीच्या वस्तु शिवाय सृष्टी असू शकत नाही हे श्री हेमचंद चागंल्या तऱ्हेने विश्लेषण करून सहा पदार्थांच्या अस्तित्वाची सिद्धि करतात हे त्यांच्याकडून ऐकण्यासारखे आहे.

या सहा जातीच्या द्रव्यांची स्वतंत्र स्वयंपूर्ण वस्तूंची संख्या अनंत आहे. त्यामध्ये खरोखरीच विश्वव्यापी अशी एकच एक वस्तू असून ती म्हणजे आकाशद्रव्य होय. सगळ्याचेच विश्वव्यववहार पहाता अधिकरण असलेली एकमेव म्हणजे आकाशद्रव्य होय. त्याचप्रमाणे त्या अनंत वस्तूमधील प्रत्येक वस्तू अगदी आकाशद्रव्य धरून षट्कारक शक्तीने स्वयंपूर्ण परिपूर्ण स्वावलंबी स्वयंभू आहे. षटकारक साधन शक्ति १) कर्ता साधन = प्रथमा विभक्ति २) कर्म साधन = द्वितीया विभक्ति ३) करण साधन = तृतीयाविभक्ति ४) सम्प्रदान साधन - चतुर्थ विभक्ति ५) अपादान साधन = पंचमी विभक्ति आणि ६) अधिकरण साधन = सप्तमी विभक्ति अशा षटकारक शक्तिने हे विश्व परिपूर्ण स्वयंपूर्ण स्वतंत्र स्वयंभू सार्वभौम आहे. यांप्रमाणे पायाभूत अंग असणारे कर्मक्रियाकार्य करणारे हे सर्वच सार्वभौम असल्यामुळे संपूर्ण विश्व सुनिश्चित सुनियंत्रित आहे. हे सर्व द्रव्यांचे परस्पर व्यवहार संबंध पहाता हे सहा व्यवहारकारक शक्तिने विश्व हा एक सुनियंत्रित महास्कंघ असून त्या दृष्टीने पाहून आचार्य म्हणाले -

परस्परोपग्रहो जीवनाम् ॥ फक्त जीवच काय सर्वद्रव्यच विश्व एकमेकास पूरक सहउपकारक आहेत. हे झाले व्यवहार षटकारक.

याचप्रमाणे द्रव्य-क्षेत्र-काल-भाव ने निज- षटकारक शक्तिच्या मर्यादेत प्रत्येक द्रव्य तर रहात आहेच. हे ज्ञान करून घेतल्यास अज्ञान जाते आणि हा जीव निजज्ञानोपयोगाने निजद्रव्यातच राहीला तर अज्ञानाने होत असलेल्या दुःखाचा परिहार होऊन हा जीव शाश्वत मुक्त होतो. हे आहे निश्चयषट्कारक.

अशी ही षटकारक प्रवृत्ति फक्त प्रत्येक द्रव्यातच आहे असे नसून द्रव्यातील अनंतगुणापैकी प्रत्येक गुणामध्ये स्वयंपूर्णतेने आहे. याचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर्णन करण्याची ज्यावेळी पाळी येते त्यावेळी भाषानिर्मिती षट्कारक युक्त होते. भाषानिर्मितीचे अवयव म्हणून सहा विभक्तिचा आश्रय करावा लागतो. या विषयांचे सुसंगतेचे विश्लेषण प.पु. वीरसागरजी यांचेकडूनच ऐकण्यासारखे आहे. या विषयावरील त्यांचे प्रवचन उपदेश ऐकण्यास मिळणे एक महद्भाग्ययोगच. या षटकारकाचे भान ठेवून विभक्तींचा वापर केला तरच ते शास्त्र होय. असे योग्य शास्त्राने विश्वदर्शन म्हणजे दर्शनशास्त्र तत्त्वज्ञानदर्शनशास्त्र होय. या षटकारकचे योग्य भान न ठेवता लिहिलेल्या शास्त्राने-विपरित तत्त्वज्ञानाने अज्ञान अंधश्रद्धा दुःखपरंपरा होते. म्हणून शास्त्र आणि कुशास्त्र याची पारख करावी लागते अशी खरी पारख करणारे सर्वच आचार्य होते. म्हणून आचार्य मानतुंग यांचेशी प.पु. वीरसागरजी हे एकभाव एकरूप साधू शकतात. म्हणून प्रस्तूत प.पु. वीरसागरजी कृत अनुवाद खरा निश्चय अनुवाद आहे. अर्थात भक्तामर स्तोत्रास वैभाविक (विकृत अर्थाचे) मंत्र शास्त्र समजल्यास अज्ञान वाढून फलित म्हणून दुःख परम्परा संकट परम्परा येणारच येणार. हे कांहीही असो संपूर्ण विश्वरचना आणि स्वयंद्रव्यरचना पहाता कोणत्याही रूपाने शून्यवाद येऊ शकत नाही. वीरवृत्ती ठेवल्यास निराशा कधी येणे शक्यच नाही. कशाचेही भय बाळगण्याचे हताश होण्याचे पराधीन गुलामी वृत्ती ठेवण्याची अजिबात कारण नाही. अखेर पराधीन गुलमगिरी वृत्ती ठेवावी कि स्वाधीनवीरवृत्ती ठेवावी याचे स्वतांत्र्यसुद्धा अबाधितपणे ज्याचे त्यास स्वयंभू आहे.

ॐ च्या संदर्भातूनही अनेक चर्चा आहेत. वैदिक दर्शन शास्त्रानेही विश्वाकार व विश्वरचना सांगितली आहे. येथे फक्त ओम (अ+उ+म्) च्या संदर्भाने थोडेसे

जैनेंद्रसिद्धान्त कोश भाग १ पान ४७० येथील उल्लेख येथे देत आहे.

अ-अधोलोक उ-उर्ध्वलोक और म-मध्यलोक । इस प्रकारकी व्याख्या के द्वारा वैदिक साहित्य में इसे (ॐ) तीन लोकका प्रतीक माना गया है।

जैन आम्नाय के अनुसार भी ओम्कार त्रिलोकाकार घटित होता है । जैनागम मे तीन लोक का आकारचित्र जैसा है, अर्थात तीन वाताकलयोंसे वेष्टित पुरुषाकार, जिसके ललाटपर अर्ध्दचन्द्राकार मे विन्दुरुप सिद्धलोक शोभित होता है । यदि उसी आकारको जल्दी से लिखने मे आवे (भराभर वळणाने हस्तलेखन) तो 'ॐ' ऐसा लिखा जाता है । यह त्रिलोक का प्रतिनिधी स्वंय सिद्ध हो जाता है । यही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कारण है कि भेदभावसे रहित भारत के सर्व ही धर्म इसको समान रूपसे उपास्य मानते है ।

आचार्यांनी गणितसंख्याशास्त्राच्या आधारे सर्व तत्त्वांची सिद्धि केलेलीच आहे. तसेच अंक-विकल्प-विलास ही केलेला आहे. शुद्ध परमाणु पुद्गल अति लहान अवस्थेत असताना त्याचा जो सूक्ष्म आकारव्याप्ती आहे. त्यास अखंड आकाश द्रव्याचा एक प्रदेश (भाग) म्हटला जातो. याच्या मोजमापाने अनेक परिमाण (युनिट) तयार झाले आहेत. त्यातील आति मोठा परिमाण राजू मध्ये मोजला जातो. असे विश्वाचे मोजमाप लांबी X रुंदी X जाडी असे धनाकार लोकाकाशाचे घनफळ ३४३ घनराजू इतके आहे. याच्यामध्ये कोणत्याही भागाचे मोजमाप शिल्लक राहीलेले नाही. प्रत्येक अंकाची बेरीज ३+४+३=१० येते या अंकातून पुढीलप्रमाणे तत्वबोध होतो.

अत्यन्त स्वाभाविक अशा अनंत गुणधर्मसंपन्न (निजसम्पत्ति-इस्टेट) अशा निजात्मद्रव्यातच एकत्वविभक्त समयसारमध्ये निजमतिश्रुतप्रमाणज्ञानोपयोग ठेवला तर ते शुद्ध पर्यायसहित एक अखंड द्रव्य झाले. हीच खरी सुख संपन्नता आहे. हे असे स्व समयसारमध्ये राहिल्यास बाकी संपूर्ण विश्व शून्यवत् (शून्य नव्हे) आहे. हे आहे ३४३ च्या बेरेजून येणाऱ्या १० चे आणि एक व शून्य या अंकाचे मर्म.

कुन्दकुन्द आचार्य लोकानुप्रेक्षामध्ये तात्पर्य सांगतात.

सुद्धेण लहइ सिद्धिं एवं लोयं विचिंतिज्जो ॥४२॥

शुद्धोपयोगाने मुक्ति सिद्ध होते. लोकाकाश आणि महास्कंधाची माहिती घेऊनही निज एक अखंड शुद्ध आत्मद्रव्याकडे निजमतिश्रुत ज्ञानोपयोगाच्या साधनाने ध्यान करावे. तर संपूर्ण विश्व शून्यवत झाल्यामुळे निराबाध सुख आनंद मिळतो. हा लोकानुप्रेक्षाचा बोध आ. नेमके हेच तत्त्वज्ञान भक्तामर स्तोत्रामध्ये आहे. ते म्हणजे निजशुद्धात्म्याचे स्तवन करीत ध्यान झाल्यास विश्वातील मोठ मोठी सर्व संकटे शून्वयत् होतात, निष्प्रभ होतात. ही लोकानुप्रेक्षा चिंतन करण्यास मला प्रवृत्त करणाऱ्या सन्मित्रास हार्दिक धन्यवाद !

मंगलाचरणातील 'पावे निजपद राज'

येणेप्रमाणे मंगलाचरणाच्या माध्यमातून भक्तामर स्तोत्र संबंधी सुद्धा चर्चा झाली. प्रत्येकाच्या निजपद पावण्याच्या/प्राप्तीचे राज म्हणजे गुपित

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रहस्य प्रत्येकालाच उलगडावे आणि विश्वात श्रेष्ठ अशा निजपदावर राज्य करावे हीच मंगलभावना. ही मंगल भावना इतकी महत्त्वाची आहे की, आजपावेतो जे अरिहन्त, केवलि, तीर्थंकर, सिद्ध झालेले आहेत ते आणि पुढेही होतील ते याच निर्ग्रन्थीकरण वीतराग विज्ञानानेच. म्हणून ही रीत हा विधि आत्मसात केली तर निश्चितपणे गॅरंटीने आपलेही मंगलमय मंगलकरण होणारच !

यांप्रमाणे भक्तामर स्तोत्र हे मंगलमय मंगलकरणाचे वीतराग विज्ञान आहे !! *एवढेच काय हे खरोखर स्व-समयसार स्तोत्र आहे !!!*

अशा तत्त्वज्ञानाचे विशेष स्पष्टीकरण प.पु. वीरसागरजींनी वेळोवेळी विविध चार्ट्सच्या माध्यमातून केलेले आहेत. आजपावेतो प्रसिद्ध झालेले चार्ट्स हे एका पर्यायासाठी एक चौकट या पद्धतीचे आहेत. त्याप्रमाणे एक घनिभूत आत्मा असे समजण्यासाठी एक घनिभूत चेंडूप्रमाणे वर्तूळ या पद्धतीनेही प.पु. महाराजांनी आकृत्या/चार्ट्स काढून उपदेश केलेला आहे. पण हे वर्तुळाकार चार्ट्स अद्याप प्रसिद्ध झालेले नाहीत. प्रस्तूत मुख्यविषय भक्तामराचा अध्यात्मानुवाद हा सहसा वाचकांना कठीण होण्याची शक्यता वाटल्यामुळे येथे अधिक स्पष्टीकरणासाठी प.पु. महाराजांच्याच वर्तूळाकार आकृत्या/चार्ट्सच्याद्वारे आणखी चिंतन प्रसृत करावे या भावनेने प.पु. महराजांचाच चार्ट क्र. ५ च्या पाच लब्धिच्या आधारावर वर्तुळाकृति चार्ट्सचे शब्दांकन 'ज्ञानसाधना हीच मोक्ष साधना' या नावाने संपादकांनी केलेले विशेषचिंतन यापुढे सादर केले आहे.

तसेच उत्तरभारतातील उच्च कोटीचे विद्वान पण्डित श्री मन्नूलालजी जैन, वकील रा. सागर (मध्यप्रदेश) हे सुयोगाने सोलापुर जिल्हा स्वाध्याय मंडळामध्ये दाखल झाले आहेत. त्यांना उत्सुकतेने व श्रद्धेने प.पु. महाराजाचा अनुवाद दाखविला असता त्यांनी अतिशय आनंदाने, सर्वांगीण विद्वत्तापूर्ण, खऱ्या खुऱ्या अध्यात्म रसिकतेने 'दो-शब्द' ही प्रस्तावना लिहून दिली. ती यापुढे जोडली आहे.

शेष शुभ सभी । अशेष आत्मा अभी ॥

नाभिराज नारकर

सोलापूर दि. ८/५/९९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दो शब्द

जैन समाज मे सर्वाधिक प्रचलित सर्वमान्य स्तोत्र श्री भक्तामर स्तोत्र है । यह कृति श्री आचार्य मानतुंग की है । इसका परिचय सम्पूर्ण दिगम्बर एवं श्वेताम्बर समाज को भलिभान्ति है । शुभभावों और शुभ आचाररूप शुभक्रियाओ मे इस स्तोत्र के पाठ को सर्वप्रथम स्थान प्राप्त है ।

आज तक इस स्तोत्र के अनेक पद्यानुवाद और गद्यानुवाद विभिन्न विद्वानोद्वारा किये जा चुके है, जिनकी संख्या का अनुमान करना भी एक शोध का विषय है ।

सोलापूर जिला में महाराष्ट्र मे बहुत समय तक रहनेवाले मुनिवर श्री वीरसागर जी ने भी भक्तामर स्तोत्र का अर्थ किया है जो उनके कुछ शिष्यो के पास है । श्री नाभिराय आदिनाथजी नारकर के पास भी उस अनुवाद की एक फोटो कापी उनके ही हस्ताक्षर की है जिसके आधार से यह अनुवाद आप के करकमलो मे प्रस्तुत किया गया है । श्री नारकरजी की बहुत दिनों से भावना थी की यथाशिघ्र यह कृति जैन समाज के हाथों में पुहुंचे, और सभी लोग श्री वीरसागर जी मुनिराज के द्वारा व्यक्त इस स्तोत्र का अभिप्राय ग्रहण करें तो स्तोत्र को और अधिक महत्व प्राप्त हो । किन्तु योग अब बन पा रहा है कि यह कृति जब आपके हाथोमे पहुंची ।

श्री वीरसागरजी मुनिराज ने दि. १४/५/१९७५ अक्षयतृतीया को अकलुज में श्री आदिसागर मुनिराज से गृहस्थ अवस्था त्यांग कर निर्वस्त्र दिगम्बर मुनिदीक्षा अंगिकार की थी । उन्होने विरागी हो कर, समस्त परिग्रह का त्याग करके, शुद्धोपयोगरूप मुनिधर्म अंगिकार कर के, अपने को अंतरंग मे शुद्धोपयोग द्वारा आपरूप अनुभव का प्रचुर स्वसंवेदन प्रारंभ कर दिया था। वे अपने ज्ञानादि स्वभाव गुणों को ही अपना मानते थे और उन्ही गुणों की एकदेश शुद्ध पर्यायों की वृद्धि का पुरुषार्थ करते रहते थे । अन्य जीवों मे भी धर्म प्रगट करने की अत्यंत बलवती भावना होने से ध्यान और अध्ययन ही शेष आयुपर्यन्त दि. १०/३/१९९३ यम सल्लेखना तक यह कार्य चलता रहा ।

श्री वीरसागरजी मुनिवर ने कभी भी परद्रव्योंमे व परभावों मे एकत्व और ममत्व, कर्तृत्व और भोकृत्व बुद्धि नहीं धारण की । किसी भी संस्था की स्थापना, स्थलो का निर्माण, विधान व पंचकल्याण को के कार्य, शिष्यो का संघ बढाना, ख्याति-पूजा-लाभ आदि चाहना, उपाधियाँ ग्रहण करना, दान या चन्दा की सहायता आदि कार्योसे एकदम दूर रह कर अपने शुद्धोपयोग को स्खलित या मलिन नही होने दिया । उनके मुनिजीवन की दैनिक चर्या पूर्णतः शुद्ध आम्नाय के अनुसार अनुकूल और अनुकरणीय थी । समाधिमरण का पूर्वाभ्यास और

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यमसल्लेखना अप्रतिम थी । शरीर पर सभी प्रकार के स्निग्ध पदार्थो व स्नानादि क्रियाओं का पूर्णतः अभाव था । केशलोंच और आहारादि की क्रियाओ में कोई दिखावा, प्रचार, विज्ञापन समारोह आदि नही होता था । ३५ वर्ष की वय से ५३ वर्ष की वयतक कभी भी पेटभर भार नही दिखाई दिया ।

श्रावकों-श्रोताओंको तत्त्वज्ञानकी सूक्ष्म वाते समझाने और सिद्धान्त शास्त्रोंका ज्ञान कराने की भावना से किसी किसी स्थान पर आग्रह किये जाने पर, अधिक समय तक भी रहे और ध्यान की पद्धती द्वारा अधिकसे अधिक लोगों को प्रगट पर्याय में शुद्धात्मानुभव करना सिखलाया ।

निजध्रुवशुध्धात्मानुभव, समयसार टीका श्री जयसेनाचार्य, अध्यात्म न्यायदीपिका, युक्ति अनुशासन, भक्तामर स्तोत्र, सूक्ष्म परसमय, तथा अनेक ग्रन्थों के आधार से अनेक चार्ट लिखकर श्री वीरसागरजी मुनिवर ने न केवल अपनी सूक्ष्म तत्त्व की पकड और वैद्धिक प्रतिभा का परिचय दिया बल्कि इस युग मे विवेक का प्रयोग करने की कला और ध्यान की कला का विकास किया है ।

इस भौतिक चकाचौंध के भोगवादी युग मे श्री वीरसागर जी मुनिवर ने अध्यात्मिक जीवन और परमानन्द की दिव्य कला जानने की और सहस्त्राधिक लोगों को प्रेरित किया।

इस भक्तामर स्तोत्र का अर्थ पूर्व परिपाटी से बंधकर ही प्रायः सभी लोगो ने आजतक जाना और माना है । किन्तु श्री वीरसागर जी मुनिवर ने इस स्तोत्र के सभी ४८ काव्यों मे से न्यायशास्त्र में वर्णित युक्तियों के आधारपर अध्यात्मिक अर्थ निकालकर अनुपन कार्य किया है । सभी काव्यों मे से निजध्रुवशुद्धात्मा का प्रत्यक्ष प्रामाण्यसहित मतिश्रुतज्ञान के द्वारा अनुभव करने की पावन प्रेरणा दी है, ली है, बताई है, समझाई है, ग्रहण कराई है। निजध्रुशुद्धात्मा का अनुभव करना एक सफल और सन्दल प्रयोग है, जो सभी जीवों को इस जीवन मे अवश्य ही करना चाहिये ।

इस भक्तामर स्तोत्र के सभी विशिष्ट शब्दों के अर्थ निजध्रुवज्ञायकस्वभाव. उसके ज्ञान-दर्शन-चरित्र-सुखादि अनंत गुणों और उसके आश्रय से प्रकट होनेवाली शुद्ध पर्यायो पर घटित कर के किये हैं । यद्यपि कुछ लोगों को श्री वीरसागरजी मुनिवर का यह अर्थ नया तथा लोक से हटकर दिखाई देगा किन्तु उससे प्राप्त निजध्रुवशुद्धात्म तत्त्वरूप कारणपरमात्मा की प्राप्ति में मार्गदर्शक दीपक का कार्य करेगा । यह कार्य सिखलानेवाले अत्यन्त विरले है ।

इस स्तोत्रमेंसे अध्यात्मिक अर्थ निकालने के लिये उनके द्वारा दिये गये प्रमाण धवला, समयसार, प्रवचनसार, नियमसार, पंचास्तिकाय, लघुतत्त्वस्फोट आदि है जिससे कोई पाठक यह न समझे कि इसमें किये गये अर्थ काल्पनिक और अप्रमाणिक हैं । उदाहरण के लिये काव्य संख्या ४ और काव्य संख्या १३ का अर्थ आपके समक्ष प्रस्तुत करते हैं :-

काव्य ४ का अर्थ :- कोई अल्पज्ञ जीव अल्प सम्यग्ज्ञान होने से (सम्पूर्ण वर्णन करने में) समर्थ नही । मै अल्प सम्यग्ज्ञानी हूं, तेरा सम्पूर्ण वर्णन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करने के लिये केवलज्ञानी के समान समर्थ नहीं हूं, तो भी आगमभाषा से निश्चयनय द्वारा और व्यवहारनय द्वारा (इन दो भुजा ओं द्वारा) जानकर निजध्रुवात्मा का शुद्धात्मानुभव करते रहने से आश्रय किया है । इस लिये मैं कथंचित (वर्णन करने के लिये) समर्थ हूं ।

काव्य १३ का अर्थ :- निजध्रुवात्मा के सामने सादि अनंत कार्यसिद्धपर्याय और सर्वज्ञपर्याय भी फीकी होती हैं । इसलिये वे भी अनुभव का, शुद्धात्माभुभूति का विषय नहीं हो सकती । तथा निजअशुद्धपर्याय अशुद्धपर्याय भी शुद्धात्मानुभूति का विपय नही हो सकती और परद्रव्य भी शुद्धात्मानुभिति का विषय नही हो सकते । देखिये प्रवचनसार गाथा १८१ की दोनों टीकाएं तथा नियमसार गाथा ३८.

इस प्रकार हमारे लिये भक्तामर स्तोत्र में भरा हुआ अध्यात्म निकाल कर श्री वीरसागरजी मुनिवर ने अनुपम और अप्रत्याक्षित कार्य किया है जो आजतक कोई भी उपाधिधारी विद्वान नही कर पाया । ऐसाही अनुपम कार्य उन्होंने जैनेन्द्र व्याकरण पढाते समय भी किया है । जैनेन्द्र व्याकरण के प्रथम सूत्रों 'सिद्धिऽर्नेकान्तात' और 'सस्थान क्रियं स्वम्' मे भी उन्होने अपूर्व अध्यात्म निकाल कर दिखाया है । व्याकरण के अ इ उ ण' से लेकर 'हल्' तक १४ सूत्रोपर पांच परमेष्ठी और नव पदार्थ घटाकर अपूर्व रीती से अध्यात्म निकालकर विषय को हृदयग्राही और मनोरंजक बना दिया है ।

श्री वीरसागरजी मुनिवर के द्वारा न्याय ग्रन्थो के स्वाध्याय से अध्यात्म-द्रव्यानुयोग तथा करणानुयोग का पठन पाठन वहुत ही सरस और रुचिकर बना दिया गया है । न्याय शास्त्र के सिद्धान्तों का परिपूर्ण ज्ञानरहित पाठकों को न तो धवलाद्ग्रिन्थों के स्वाध्याय में रस आता है और न ही द्रव्यानुयोग उनके कण्ठ के नीचे उतर पाता है । सिर्फ क्षयोपशमज्ञान की शुष्कता से वाणी का विषय बनकर ही पण्डिताई का पोषण करता हुआ ज्ञानाभिमान से दग्ध करता रहता हैं ।

इस भक्तामर स्तोत्र के इस नवीन अर्थ के माध्यम से यदि विज्ञ पाठक तत्त्वज्ञान करने का अभ्यास करते हुअे ध्यान पद्धति को अपना कर प्रत्यक्ष प्रामाण्यसहित मतिश्रुतज्ञानसाधन द्वारा निजध्रुवशुद्धात्मा को विषय बनावेंगे तो उन्हे अपने जीवन में पवित्र अतीन्द्रिय आनन्द की महक अवश्यक प्राप्त होगी ।

सभी पाठक शुद्धात्मानुभवसहित निश्चयसम्यग्दर्शन प्राप्त कर यह प्राप्त मनुष्य पर्याय सार्थक करें इसी भावना के साथ ।

विशेषु अलम् ।

स्थळ :- महावीर सांस्कृतिक भवन — मन्नूलाल जैन

सोलापूर ४१३००७ — वकील

दिनांक १/७/१९९७ — सागर (मध्यप्रदेश)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तत्त्वसिद्धान्त संबंधि संदर्भ ग्रंथ अल्पसुची

◎ मोक्षपाहुड गाथा १०४॥ असंयतसम्यक्त्वीस (अव्रतिगृहस्थास धर्म्यध्यान आहे.) धर्म्यध्यान आहे.

= धवला पुस्तक १३ पान ७४ असंजदसम्मादिट्ठी धम्मज्झाणस्स पवुत्ति होदित्ति जिणोव एसादो ।

◎ दर्शनमोहरहित गृहस्थी हा दर्शनमोहसहित असलेल्या मुनिपेक्षा श्रेष्ठ आहे.
= रत्नकरंड श्रावकाचार श्लोक ३३

◎ नरकादी चारही गतिवंध झालेला असला तरीही सम्यग्यदर्शनाची शुद्धात्मानुभवाने प्राप्ती करू शकतो.
= धवला पु.१ पान ३२८ श्लोक १६९

◎ एकाग्रध्यान हे व्यग्रध्यानाची निवृत्ति करते म्हणून एकाग्रध्यानाने चिन्तानिरोध होतो. जसे प्रकाशाने अंधकाराचा निरोध होतो.
= राजवार्षिक ९/२७/१२

◎ अग्र=आत्मा. एक=निजध्रुव, एकाग्र=निज-ध्रुवात्मा. निजध्रुवात्म्याचे ध्यान ते एकाग्रध्यान.
= राजवार्तिक अध्याय ९ सूत्र २७ वार्तिक २१

◎ एकाग्रध्यान म्हणजे फार वेळ स्थिर रहाणे अशी व्याख्या समजणे चुकीचे आहे. —प.पू. वीरसागरजी

◎ आता विद्यमान सकल निरावरण शुद्ध पारमाणिकभाव लक्षणवाला मी आहे.
=. समयसार आ.ख्या.गाथा ३२० ता.वृ गाथा ३४१ ची टीका

◎ शुद्धोपयोगाने धर्म्यध्यान होते. ते संवरचे कारण आहे. तेच निर्जराचे कारण आहे.
= द्वादशानुप्रेक्षा श्लोक ६४ व ६६ कुंदकुंद भारती ३१९

◎ सर्व आगमाचा धारक असला तरी शुद्धबुद्ध एक स्वभावी आत्म्याचे ज्ञान नसेल तर तो वीतरागी नाही.
= समयसार गाथा २०१ व टीका

◎ अंतर्मुहुर्तात लीन असलेले ज्ञान हे ध्यान आहे. म्हणजेच जे जे विचार ते ते ध्यान
= कार्तिकियानुप्रेक्षा गाथा ४७०

◎ निर्विकल्पध्यान म्हणजे निर्विचार नव्हे. —प.पू.वीरसागरजी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

◎ ध्यान ही केवळ चारित्रगुणाची पर्याय समजणे चुकीचे आहे.

– प.पू.वीरसागरजी

◎ पर्यायनामान्तराने शुद्धभावना, शुद्धोपयोगभावना, शुद्धोपयोग, निर्विकल्पसमाधि, शुद्धात्मानुभव, अभेदरत्नत्रय आदि एक होय.
= द्रव्य संग्रह – अधिकार २ ची पातनिका

◎ अर्हत चैत्यालयादिच्या भक्तीने पुण्य होते. पण कर्मक्षय होत नाही.
= पंचास्तिकाय गाथा १६६

◎ गुणवान वस्तूस्वरुपाचे ध्यान (ज्ञान–विचार) म्हणजे धर्म्यध्यान.
= कार्तिकियानुप्रेक्षा गाथा ४७१ व ४७२ ची टीका

◎ स्वात्मानुभूति हे ज्ञानच आहे, कारण ती ज्ञानाची पर्याय आहे. ज्ञान ध्यान हे एकार्थ वाचक आहे.
= पंचाध्यायी अध्याय २ श्लोक ३८७

◎ निजध्रुवात्मा या पदार्थाच्या अभिसंधानाचे ध्यान हेच सत्‌ध्यान/शुद्धात्मानुभव होय.
= महापुराण पर्व २१ श्लोक ११

◎ शुद्धास्वभावोत्पन्न सुखस्वादाने समस्तशुभ अशुभ रागादि विकल्पाचा नाश हेच व्रत होय.
= वहद्द्रव्यसंग्रह गाथा ३५ ची टीका

◎ शुभचारित्रवान जर दर्शनचारित्र मोहादि सोडत नसेल तर तो शुद्धात्मा होत नाही.
= प्रवचनसार गाथा ७९

◎ अर्हन्ताचे द्रव्यगुणपर्याय जाणल्याने (ज्ञानपर्यायाने) (श्रद्धा ठेवल्याने नव्हे बाह्य संयमाने नव्हे) दर्शन मोहाचा क्षय होतो. प्रवचनसार गाथा ८०

◎ गृहस्थीच काय मातंग देहात ही जन्मलेली सम्यक्‌त्वाची ठिणगी खरी तेजस्वीच आहे.
= रत्नकंरडक श्रावकाचार २८

◎ खऱ्याखोट्याच्या निर्णयासाठी तत्त्वज्ञानास शरण जावे –
= अष्टसहस्त्री कारिका ८७

◎ मुद्याचा विचार संपल्यावर ज्याप्रमाणे गुद्यावर येतो. त्याप्रमाणे ज्ञानतत्त्वाचा विचार संपल्यावर ज्ञान अपूर्ण राहिल्याने बाह्य संयमावर येतो.

–प.पू. वीरसागरजी

◎ चतुर्थपंचमगुणस्थानवाले वीतरागी कसे? अनतानुबंधि मिथ्यात्वादि सात राग प्रकृतीचा अभाव असल्यामुळे – समयसार.ता. वृ गाथा २९५–२९६ टीका.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

◎ स्वद्रव्यात रत होणे हीच परद्रव्यातील विरति (त्याग) होय.
= मोक्षप्राभृत गाथा १६

◎ गुरु उपदेश, अभ्यास, स्वपरभेद स्वात्मानुभूतीने जाणारा मोक्ष सुखच अनुभवतो.
= इष्टोपदेश गाथा ३३

◎ अरिहंतादिच्या भक्तीने खूप पुण्यवंध होतो. ते मोक्षमार्गत्व नाही, तो परसमयरत आहे.
= पंचास्तिकाय गाथा १६६ टीका

◎ विशुद्धज्ञानदर्शनस्वभाव शुद्धात्म तत्त्वाचे मतिज्ञान व श्रुतज्ञान हे निश्चयाने उपादेय आहेत.
= पंचरस्तिकाय गाथा ४३

◎ शाश्वत स्वभावरूप आत्म्याच्या चिंतवनाने (ध्यानाने) चिंतेचा निरोध व अभाव होतो.
= तत्वानुशासन श्लोक ६५

◎ स्थिर वा अधिशय्येवरील कोणतीही देहाची अवस्था ध्यानाची उपरोधिनी नाही. अर्थात कोणत्याही आसनामध्ये धर्म्यध्यान होते.
= महापुराण पर्व २१ श्लो. ७५

◎ केवल एक आत्म्याच्या ध्यानी असलेली अंतःकरण प्रवृत्ति मोहराग द्वेष चिंतेचे नियंत्रण करते.
= तत्त्वानुशासन श्लोक ६३

◎ आत्मोपलब्धिशिवाय सम्यकत्वाची सिद्धी नाही, शुद्धात्मज्ञानाशिवाय आत्मोपलब्धि नाही. = गोम्मटसार = कर्णाटवृत्ती जीवतत्त्वप्रदीपिका टीका गाथा पान ३० भाग १.

◎ जीवस्वभाव व अजीव स्वभाव न जाणणारा पुरुष समग्यदृष्टी कसा होईल?
= समयसार गाथा २०२

◎ परवश राहून शुभभावाने जे संयमी आचरण आहे ते मोक्षमार्गस्थाचे आवश्यक लक्षण नाही.
= निथमसार गाथा १४४

◎ वाह्यसंयमावरून मोह राग द्वेष कमी करण्याची क्रिया हे परावलंवन होय. स्ववस्तूचे (सगदव्वं) स्वावलंवन हेच परम मंगल व परम त्याग आहे.
= प.पु. वीरसागरजी

◎ मतिश्रुतज्ञान हेच साधन एक अखंड आत्मसन्मुख केल्यास ते अतींद्रिय अविकल्प आहे. हेच सम्यग्दर्शन, सम्यग्यज्ञान व समयसार
= समयसार गाथा १४४ टीका

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

◎ मोक्षाच्या उपायासाठी सम्यग्दर्शन प्राप्तीसाठी ज्ञानाशिवाय दुसरा उपाय (श्रद्धा संयम वा अन्य उपायसाधन म्हणून) नाही. सम्यग्ज्ञाशिवाय कैवल्य नाही.
= न्यायदीपिका पान ४ ओळ ६

◎ अरहंत, सिद्ध, चैतालय, मुनिसमुह, प्रवचन यांच्या भक्तीने खूप पुण्य बांधले जाते. पण त्यांच्याने कर्मक्षय (निजशुद्धात्मानुभव) होत नाही.
= पंचास्तिकाय गाथा १६६ टीका आणि चारित्र चक्रवर्ती आचार्य शांतिसागर

◎ निजपरमात्म्यात जो स्थिर नाही त्याचे तप व व्रत, हे बालतप व बाल व्रत आहे. म्हणून मोक्ष मार्गाचे कारण नाही.
= समयसार १५२

◎ आरंभसहित परिग्रहवाला शुद्धानुभवी गृहस्थी हा सामायिकाच्या वेळी सवस्त्र मुनीप्रमाणेच यतीभाववाला (निजशुद्धात्मानुभूतीवाला ।) आहे.
= रत्नकरंड श्रावकाचार श्लोक १०२

◎ शुद्धात्म्याची सुखानुभूतीरुप स्व-संवेदनज्ञान हे वीतराग आहे. हाच वीतराग होण्याचा अर्थात मोह राग द्वेष सोडण्याचा उपाय आहे.
= समयसार गाथा ९६

◎ विश्वातील अव्रती गृहस्थीमानव सम्यग्दृष्टीची संख्या ७०० कोटी आणि व्रतीची (अणुव्रती) संख्या १३ कोटी आहे. तर १७२ च्या हिशोवाने भारतात जास्तीत जास्त सम्यग्दृष्टी अव्रतीची संख्या दोन ते तीन कोटी आणि व्रती गृहस्थी ६ वा ७ लाख असण्यास हरकत नाही. अणुव्रती गृहस्थी १३ कोटी पेक्षा पशु अणुव्रतीची संख्या जास्त आहे.
= (धवलापुस्तक ३ पान २५२ श्लोक ६८ वगैरे)

◎ सतत स्वाध्याय तत्त्वनिर्णय करीत राहिल्यास जास्तीत जास्त सहा महीन्यात निजध्रुवशुद्धात्मानुभूतिपूर्वक सम्यग्दर्शन प्राप्ती निश्चितपणे होते.
= करणानुयोग

◎ सम्यकत्वाशिवाय संयमाची उत्पत्ति नाही. (निजशुद्धात्मानुभूतिशिवाय संयमाची उत्पत्ति नाही)
= धवला १/३८०/७-८

◎ अव्रति सम्यग्दृष्टीचे बाह्य व्रताचरण नसल्याने सम्यक्त्वास बाधा येत नाही. कदाचित दृष्टीभ्रमतेमुळे तो मिथ्यात्वीही होऊ शकेल. पण यामुळे सम्यग्दर्शनाची उत्पत्ति पूर्वी खरीच झाली होती आणि सम्यग्दर्शन उत्पत्तिच्या तत्त्वसिद्धान्तास बाधा येत नाही.
= प.पु.वीरसागरजी

◎ ज्ञान आणि ध्यान एकार्थ वाचक आहेत. 'सर्वस्य ध्यास्य ज्ञानात्मकत्व प्रसिद्धेः ।
= श्लोकवर्तिक अध्याय ९ सूत्र २७ श्लोक ४ गद्य संस्कृत टीका पान ४९८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

◎ ध्यान ही ज्ञानपर्याय आहे. ...

= राजवार्षिक अध्याय ९ सूत्र २७ वार्तिक ८.

◎ तत्त्वार्थामध्ये रुचि, प्रत्यय, श्रद्धा आणि चारित्र स्पर्शन करणे हे ज्ञानाचे कार्य आहे.
= धवला पु. १ सूत्र ११५ टीकापान ३४४ ओळ ९,२४ ते २७.

◎ नियमसल्लेखना बारा वर्षासाठी नियम सल्लेखना घेतलेल्या मुनिवर यांना इतरत्र विहार करणे आवश्यक नाही. एकाच स्थानी तपश्चर्येसाठी राहता येते. अशा आचार्यांची अनेक उदाहरणे आहेत.

◎ प्रमाण–नय–निक्षेप यांच्या सुमेळपूर्वक समीक्षणानेच खरा तत्त्वनिर्णय होतो.
= धवला पु.१ पान १७ श्लोक १०

◎ तत्त्वार्थाचा निश्चयनिर्णय करण्यासाठी निजध्रुवाचा निक्षेप समजणे जरुर आहे.
= धवला पुस्तक १ पान ३२ श्लोक १५

◎ दररोज एक तरी सिद्धान्त अनुभवावा. कारण सिद्धान्त समजणे (प्रत्यक्ष भावभासना होणे) हा अज्ञान विनाशाचा व सम्यग्ज्ञान उत्पत्तिचा व गुणश्रेणीने होणाऱ्या निर्जरेचा हेतु (फळाचे कारण) आहे.
= धवला पु. १ पान ५७ ओळ १, २, ३.

◎ जैन धर्मने ध्यानको सर्वोच्च महत्व दियागया है, जो कि सिद्धान्त (essentially spiritaulistic in theary) और अभ्यास दोनों मे ही (as well as in practiec) अध्यात्मिकतावादी है ।
अर्थात ध्यान हे केवळ आदर्शवाद तत्त्व नसून ते आचारणात/चारित्रात/कृत्रिममध्ये आणण्यायोग्य आहे, म्हणजेच मोक्षमार्गातील चारित्र आहे. आचार्य भास्करनान्दि रचित 'ध्यानस्तव' चे संपादकीय पान ५, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन १९७३ प्रधान सम्पादक डॉ. हीरालाल जैन. डॉ. ए.एन. उपाध्ये.

◎ रहस्यचा अभाव ज्यांचा झाला आहे ते अरिहंत होय.
= धवला पु. १ पान ४५ ओळ १७.

◎ केवल देवता नमस्कार मध्ये (णमोकार पंचपरमेठीमध्ये) सूत्रकथित विषयाच्या परिज्ञानाशिवाय कर्मक्षयाचे सामर्थ्य नाही.
= धवला पु. १ पान ४३ ओळ २७ ते २९.
परिज्ञान = प्रत्याभि–तर्क–अनुमान सहित द्रव्य–गुण– पर्याय यांचे प्रक्रिया ज्ञान. (प्रचनसार गाथा ८०)

◎ १) अपनी आत्माको जानकर (ज्ञानपर्याय) उसका २) श्रद्धान करके जो परभावको छोडता है ।। ३) वह निजात्माका शुद्धभाव चारित्र है । परमात्मप्रकाश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अध्याय २ गाथा ३० जै.सि. कोश २/२८४ अ.

◎ आत्माद्वारा संवेद्य जो निराकुलताजनक सुख सहजही आता है वह निश्चयात्मक चारित्र है ।= मोक्षपंचाशिका श्लोक ४५. जै.सि.को. २/२८४ अ.

◎ जो आत्म स्वभावसे विपरित बाह्य बहुत शास्त्रोंको पढेगा और बहुत प्रकारके चारित्रको आचरेगा तो वह सव वालश्रुत व बालचारित्र होगा ।
= मोक्ष पाहुड गाथा १००. जै.सि. को. २/२८८ अ.

◎ संयमादि समस्त गुण एक शुद्धोपयोग में प्राप्त होते हैं ।
= परमात्माप्रकाश टीका २/६७

◎ अहो ! पंच महाव्रत चारित्राचार ! मैं वह निश्चयसे जानता हूं कि तू शुद्धात्माका नही है ।
= प्रवचनसार त.प्र. २०२

◎ ज्ञान आत्माका स्वभाव हे और वह उसका लक्षण भी है। उसके पांच भेद हैं। उनमें केवलज्ञान और श्रुतज्ञान ये दो ज्ञान मुख्य हैं । सर्व तत्त्वों के प्रकाशन में केवलज्ञान को जो स्थान प्राप्त है, छदमस्थ के जीवन में वही स्थान श्रुतज्ञान का है । यह आत्मप्राप्ति का प्रधान साधन है। यह श्रुतज्ञान ही है जिसके माध्यमसे संसारी प्राणी अवद्ध-अस्पृष्ट, आनंद, नियत, अविशेष और असंयुक्त आत्मा को स्वसंवदेन प्रत्यक्षसे जानकर स्वावलम्बन द्वारा जीवनमें व्यक्ति स्वातंत्र्य की प्रतिष्ठा करने में समर्थ होता है । जहां तक द्रव्य श्रुत का प्रश्न है, उसके अभ्यास से ही विशेष श्रुतज्ञान की प्राप्ति होती है, इसलिये आगम में श्रुतज्ञान की प्राप्ति होती है, इसलिये आगम में श्रुतज्ञान का प्रतिपादन द्रव्यश्रुत के रूप में भी किया गया है । = सिद्धान्ताचार्य पं. फूलचंद्र शास्त्री - 'सन्मतिवाणी' जून १९८३ पान १३.

ध्यान रखना मंदा !

मंदा :- बहन तुम्हारी आत्मा मेरी आत्मासे इतनी सफेद यांनी अविकारी कैसे? कौनसा साबून लगाती हो?
कुंदा :- यह शुद्धोपयोग का साबुन है । शुभोपयोग के / पुण्य के भी मैली दाग शुद्धोपयोग का साबून निकालता है ।
मंदा :- क्या यह संभव है? तो मैं भी यही साबून लगाऊंगी ।
कुंदा :- सुन री सखी ! यदि शुद्धोपयोग का साबून लगाया तो आत्माके पुण्य व पाप के दाग ढुंढते रह जाओगे ।
मंदा :- मै तो आजतक शुभोपयोग का ही साबून लगाती आयी हूं ।
कुंदा :- हर पीली चीज सोना नही होती, वैसे ही शुभोपयोग का साबून एक स्वयं दाग है, यह हर ध्यान शुद्धोपयोग नही होता । निजशुद्धात्मा से ही वनाया हुआ याने निजशुद्धात्मा का ही अवलम्बन लिया तो ही शुद्धोपयोग का साबून काम करता है । यह धर्म्यध्यान की रीत विधि का ध्यानरखना बहन !

- कु. अर्चना अशोककुमार व्होरा नातेपुते

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चार्ट नं. ५

◎ ज्ञान के प्रामाण्य की ज्ञप्ति ◎

अभ्यस्त मे स्वतः (अर्थात् उस ही क्षणमें) होती हैं ।
अनभ्यस्त मे परतः (अर्थात् उस क्षण से अन्य क्षण में) होती है ।



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



परम आत्मान्यायाचार्य परमअध्यात्मयोगी

प.पू. १०८ श्री वीरसागरजी महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानसाधना हीच मोक्षसाधना

	आकृति क्र.		पान क्र.
	१	आकृति परिचय	१
	२	क्षायोपशमिक लब्धिवाला जीव	२
	३	विशुध्दिलब्धिवाला जीव	४
	४	अदेशनावाला जीव कमी ज्ञान प्रगट	५
	५	अदेशनावाला जीव विशेष ज्ञान प्रगट	६
	६	अदेशनावाला जीव ज्ञानाचा बहुविषयी क्षयोपशम	६
	७	अदेशनावाला जीव बहुविषयी क्षयोपशम ज्ञानात आगमज्ञानाची विपरितता	७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानसाधना हीच मोक्षसाधना

	आकृति क्र.		पान क्र.
	८	देशनालब्धिवाला जीव	८
	९	प्रायोग्यलब्धिवाला जीव प्रत्यभिज्ञान	१४
	१०	प्रायोग्यलाब्धिवाला जीव तर्कज्ञान	१४
	११	प्रायोग्यलाब्धिवाला जीव अनुमान ज्ञान	१५
	१२	करणलब्धिवाला जीव	१५
	१३	आत्मोपलब्धि ; निजध्रुवशुध्दात्मानुभव	१७
	१४	अविरतसम्यक्त्वी	१९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानसाधना हीच मोक्षसाधना

	आकृति क्र.		पान क्र.
	१५	देशव्रती	२२
	१५ अ	शुध्दात्मानुभव ; देशव्रती	२३
	१६	भावलिंगी मुनि ; प्रचुर स्वानुभव	२३
	१७	शुक्लध्यान ; क्षपकश्रेणी	२५
	१८	बारावे गुणस्थान	२६
	१९	बारावे गुणस्थान	२७
	२०	ध्रुवात्मसमानपूर्णशुध्दपर्याय केवलिभगवान	२९

SURA'S GRAPHICS ✆ : 0217 - 629501

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानसाधना हीच मोक्षसाधना



आकृति क्र. १) आकृति परिचय

आधुनिक सायन्सचा सिध्दान्त आहे किं, प्रत्येक वस्तूला अनादिअनंत काल अस्तित्व आहे. प्रत्येक वस्तूला अनेक गुणधर्म कायम असतात. जेथे एक गुणधर्म आहे तेथे अनेक गुणधर्मवाली वस्तु आहे, ती वस्तु नित्यरुपांतररित होत असते. पण कधीही नष्ट होत नाही.

जैन सिध्दान्त सांगतो किं, विश्वात अनंतवस्तु आहेत. ते सहा प्रकारच्या जातीमध्ये आहेत. ते जीव (आत्मा) पुद्गल,धर्म,अधर्म, आकाश, व काल असे आहेत. त्यापैकी प्रत्येकी प्रत्येकाचा आत्मा एकाच जातीच्या प्रकारचा असून ती स्वतंत्र वस्तु आहे. या प्रत्येक वस्तुसही अनादि अनंत अस्तित्व आहे. जाणण्याची क्रिया सतत करणारा ज्ञान हा त्याचा एक गुणधर्म /गुण /शक्ति / वस्तुधर्म आहे. या ज्ञान शक्तिनें जाणत असताना त्यामध्येच स्व-संवेदन ही आहे. त्यामुळे सुखदु:खाचे संवेदन प्रत्यक्ष आहे. हा आत्मा / निजात्मासुध्दा एक घनीभूत घनाकार आहे. हा घनीभूत घनाकार पर्वताप्रमाणे स्थूल आहे किं लेसर क्ष-किरण आदिपेक्षाही अतिसूक्ष्म घनाकार आहे, त्याचे विशेषगुणधर्म काय आहेत वगैरेची माहीती, निरीक्षण, परीक्षण आगमशास्त्रातून मिळते. ती मिळविणे निजहीताचेच आहे.

या संसार अवस्थेत हा प्रत्येकाचा आत्मा त्याच्या संकोच विस्तार शक्तीमुळे ज्या त्या शरीराच्या आकाराचा असून शरीर आत्मा आदि केवळ एक क्षेत्रावगाही संयोग संबंध आहे. या ठीकाणी केवळ आत्मा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घनीभूत चेंडूसारखा असल्याचे उदाहरण घेतले आहे. वर्तुळाकार म्हटले कि त्यास केंद्र बिंदु, मध्यभाग आणि परीघाचा भाग स्वाभाविकपणे आलेच. केंद्रबिन्दूचे आस्तित्व जर मानले नाही तर वस्तुचाच नाश संभवतो. त्याप्रमाणे अनादिकाळापासून शाश्वत अस्तित्व असणारा आत्म्याच्या ध्रुव अस्तित्वाचे प्रगट अस्तित्व मानले नाही तर आत्म्याचे अस्तित्वच धोक्यात आहे.

आकृति क्र. २ क्षायोपशमिकलब्धिवाला जीव



मनसहित पंचेन्द्रिय जीवाच्या ज्ञानगुणपर्यायावर असलेल्या ज्ञानावरणकर्माचा /पुद्गलद्रव्यकर्माचा क्षयोपशम (काही आवरणाचा क्षय व काही उपशम) अवस्थेमध्ये पदार्थाचे ज्ञानग्रहणाची शक्ति प्राप्त होणे यास क्षायोपशमिकलब्धि म्हणतात. यासच ज्ञानाचा उघाड / बुध्दी / प्रकाश म्हणतात. ती येथे आहे. मन हे विशेष इन्द्रिय असल्यामुळे विशेष विचार करु शकतो. परंतु अनादि काळापासून हे आत्मद्रव्य ज्ञानगुणाच्या पर्यायाव्दारे / परिणमनाने स्व आणि पर जाणीत असताना सुध्दा निजात्म्याची स्वाभाविक वस्तुरचना व प्रत्येक गुणधर्माचे कार्य याची माहीती करुन घेतली नसल्यामुळे परद्रव्यातच हीत व अहीत समजून मोहराग व्देष सह परद्रव्याच्या संगतीत विभाव परिणतिने स्वत:च अज्ञानरुप परिणमत आहे. त्यामुळे स्वाभाविक वस्तुरचनाच्या दृष्टीने आत्मद्रव्याच्या केन्द्रबिन्दुविषयी /निजध्रुव स्वभावाविषयी अनादिकाळापासूनच अज्ञान आहे/ अंध:कार आहे / ज्ञान प्रकाशित नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यावरुन आकृतिमध्ये आत्मकेन्द्रामध्ये या अज्ञानी जीवाच्या मनातील हा काळोख दाखविला आहे. हा काळोख या सृष्टीच्या वास्तवरचनेविषयी / निजात्म्याविषयी तसेच बाहेरच्या जगताविषयी चुकीच्या कल्पना करतो, चुकीची खोटी श्रध्दा म्हणजे मिथ्याश्रध्दा करतो आणि फलस्वरुप म्हणून चुकीची वर्तणूक म्हणजे मिथ्याचारित्र करतो . हे अनादिकाळापासून असल्यामुळे यास अगृहीत मिथ्यात्व म्हणतात. यामध्ये एकेन्द्रिय निगोदापासून संज्ञीपंचेन्द्रिय नारकी देव मानवापर्यंतचे सर्व मिथ्यात्वी जीव येतात. या मानव जन्मात आल्यानंतर दु:खमुक्तीच्या उपायासाठी विपरीत असलेल्या सरागी देवदेवता विषयी कल्पना / मान्यता करुन अधिकच मिथ्यात्वी म्हणजे गृहीत मिथ्यात्वी बनून सर्वत्र मिथ्या वर्तन करीत आहे. पक्का बहिरात्मा झाला आहे. म्हणजे पर्यायातील परिणतीदृष्ट्या अर्थात पर्यायर्थिक दृष्ट्या पूर्णपणे अशुध्द आहे. क्रोध मान माया लोभ या कषायांच्या चारही चौकडी तीव्र आहेत. यामध्ये लेश्या कोणत्याही प्रकारची असू शकते. बुध्दीमात्र सामान्यजनाप्रमाणे आहे. तरीपण प्रयत्नांती पाप-पुण्यांचा, शुभ-अशुभाचा, अशुध्द आणि शुध्दतेचा (ध्रुवशुध्दात्म्याचा) विचार करु शकण्याची पात्रता कमवू शकतो. कारण ज्या पध्दतीमळे अज्ञानी व दु:खी झालेला आहे ते कारण समजून त्याच्या उलट उपाय केला तर तोच उपाय सुलट म्हणजे ज्ञानी व सुखी होण्याचा उपाय ठरतो. असे सर्वत्र दिसून येते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. ३ विशुध्दिलब्धिवाला जीव

आत्मकेन्द्राविषयी / निजध्रुव स्वभावाविषयी या जीवास अज्ञान आहे म्हणून केन्द्रामध्ये उपचाराने आत्मस्वरुपाविषयी काळोख / अन्धकार आहे. त्यामुळे उत्पन्न होत असलेल्या कषायी विकारी वृत्तीमुळे केन्द्राव्यतिरिक्त आत्मभागातही अन्धकार अर्थात मिथ्यात्वी आहे. किंचित तर्क व तरतमतेच्या विचाराने सरागी देवदेवताविषयीची श्रध्दा ढासळू शकते. वास्तविक खऱ्या तत्वज्ञानाच्या श्रध्दानानेच गृहीत व अगृहीत मिथ्याश्रध्दान नाश पावू शकते. या जीवास दर्शन-मोह / मिथ्याश्रध्दा असून पाषाणावरील रेखासमान प्रदीर्घकाळासाठी कठोर संस्काराचे आत्म्यास कठोरतेने कासत राहणारे अनंतानुबन्धि कषाय आणि त्याचे बन्धु अप्रत्याख्यान, प्रत्याख्यान, संज्वलन हे कषाय तीव्ररुपाने उपास्थित आहेत. अर्थात त्या क्रोध मान माया लोभांचे चारीही चौकडी विद्यमान आहेत. सहालेश्यापैकी कोणतीही लेश्या असू शकते. संज्ञीपंचेद्रिंय असल्यामुळे ज्ञानावरणीय कर्माचा क्षयोपशम सामान्यपणे बरा असतो. म्हणून पापपुण्य शुभअशुभ शुध्द अशुध्द याबाबत तत्त्व विचाररुप भाव करतो. यास विशुध्दिलब्धि म्हणतात. तरीही अद्याप निजध्रुवशुध्दज्ञानदर्शन आनंद स्वरुपी आत्म्याविषयीची जिनवाणी उपदेश तत्त्वधारणा होण्याइतपत अर्थात देशना नाही. म्हणून बहिरात्मा आहे, स्थूलमिथ्यादृष्टी आहे, स्थूलपरसमय आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. ४ अदेशनावाला जीव (कमी ज्ञानप्रगट)

उपरोक्त विशुध्दिलब्धिच्या बहिरात्माच्या सर्व अवस्था गृहीत धरुनच आणखी विशेषता समजून घेण्यासारखी आहे.

याजीवाच्या संज्ञीपंचेद्रिंयाच्या ज्ञानाचा उघाड सर्वसाधारणपणे आहे. खास विशेषबुध्दी नाही. म्हणून आकृतीत केन्द्रभाग सोडून इतर आत्मभागातील काही अल्प भागात ज्ञानाचा उघाड दाखवीला आहे. बाकीच्या आत्मभागा मध्ये ज्ञानावरणीय कर्माचा अंमल चालू आहे. एवढ्या अल्पबुध्दीवर घरसंसार परिग्रह चालवीत आहे. तरीही एवढ्याच बुध्दीने जिनेन्द्राचा उपदेश / देशनाचा तत्त्वविचार करुन तत्त्वधारणा करु शकतो. ऐकलेल्या तत्त्वज्ञानाच्या योग्य बोधाचेच ग्रहण केलेतर ऐकलेल्या देशनाचा सदुपयोग होय. जीव अजीव आदिचे नांव माहीत असो वा नसो अथवा अन्यथा ज्ञान असो. मात्र निजवस्तुस्वरुपाची यथार्थ ओळख / ज्ञान करुन घेतो. निजात्मद्रव्यातच मोहराग व्देष असले तरी ते अहीतकारक आहेत, म्हणून हे मोहरागव्देष शरीरादि परवस्तुच्या संगतीमधीलच असल्यामुळे मोहरागव्देषसुध्दा आत्मद्रव्यामध्ये / शुध्दात्मद्रव्यामध्ये समाविष्ट न होणारे परद्रव्य आहेत. आणि मी निजध्रुवात्मा एकटा स्वतंत्र व सार्वभौम आहे असा बोध घेऊन सम्यग्दृष्टी / मोक्षमार्गस्थ होऊ शकतो. खरे तर तुच्छ ज्ञानी तिर्यंचादि (पशुपक्षी) एवढी आत्मप्रगति करुन सम्यग्दृष्टी होउ शकतात. अशा बुध्दीवादीस भद्र परिणामी म्हणताल. पण आकृतिमधील उदाहरणा मध्ये ही प्रगति अद्याप नसल्यामुळे आत्मकेन्द्रामध्ये अन्धकारच आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. ५ अदेशनावाला जीव (विशेष ज्ञानप्रगट)



येथील जीवाच्या ज्ञानाचा उघाड भरपूर भागात झालेला आहे. प्रतिभाची विशेष प्रगल्भता आहे. त्यामुळे पदवीधर अदि वा शास्त्रज्ञ अदि वा उद्योगपती वा विशेष पुढारी इत्यादीप्रकारे यशमिळवितो . विषयात जेवढा तल्लीन होतो तेवढी बुध्दी वृध्दिंगत होते. परंतु निज ध्रुवस्वभावविषयी अज्ञानी आहे. म्हणून आत्मकेन्द्रामध्ये अंधारच आहे.

आकृति क्र. ६ ज्ञानाचा बहुविषयी विशेष ज्ञान

येथे एकाच विषयात प्रगल्भता आहे असे नसून अनेक विषयात प्राविण्य आहे याप्रमाणे बुध्दीचा विकास किती ही झाला तरी तो सर्वज्ञ होणे शक्यच नाही. कारण आत्म वस्तूच्या केन्द्राच्या ज्ञानाविषयी अज्ञानांधकारच या जीवाने ठेवला आहे. त्याचा विचार करण्यास तयारच नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. ७ बहुविषयी ज्ञानात आगमज्ञानाची विपरीतता



येथिल जीवाची बुध्दी विशेषच आहे. भद्र परिणामी आहे. म्हणून दांभिकपणा नाही. शांतस्वभावी व समजूतदार समजली जाणारी व्यक्ति असे ही असू शकते. देशना केवळ ध्वनिमात्र ऐकण्यास मिळालेली असली तरी सुध्दा त्याचा तत्त्वविचार / तत्त्वनिर्णय योग्य म्हणजे आगमानुकूल नसतो. जिनसिध्दान्तानुसार अर्थात सृष्टीच्या स्वाभाविकरचनानुसार म्हणजेच वस्तुव्यवस्था विज्ञानानुसार योग्य हीतकारी ज्ञानधारणा नाही. पूर्वीच्याच काही पूर्वग्रहानुसार / पूर्वसंस्कारनुसार असलेली मिथ्याकल्पना - अज्ञानानुसार असलेली मिथ्याधारणा सु-तर्क अनुमान व्दारा सुध्दा सोडण्यास तयार नसतो. घनीभूत वस्तूचा आधार असलेल्या घनाकार अनादिअनंत (नित्यवर्तमानसह) शुध्द केन्द्राचे नित्य प्रगट अस्तित्वच मानण्यास तयार होत नाही. त्याच्या आश्रयानेच सम्पूर्ण शुध्दता प्रगटणार हे त्यास पटत नाही. शाश्वत शुध्द असा केन्द्र बिन्दुच न मानलयमुळे सम्पूर्ण वस्तूचेच अर्थात स्वत:चे आस्तित्वच धोक्यात आल्याचे भान नाही. याप्रकारे नाना प्रकारे विपरीत कल्पना विद्यमान असतात. म्हणून येथे देशना केवळ ध्वनिमात्र ऐकण्यास मिळूनही न मिळाल्याप्रमाणेच आहे. कदाचित असा जीव अणुव्रती वा महाव्रती असू शकेल आणि सर्व शास्त्र पारंगत ही असू शकेल. अकरा अंग नउ पूर्वशास्त्राचा पाठीसुध्दा असू शकेल.(सव्वगमाधरोवि) परंतु आत्मोपलब्धिसाठी योग्य ज्ञान नसल्यामुळे पुरुषार्थप्रवृत्त होऊ शकत नाही. अशा वेळी देशनालब्धि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कार्यकारी होण्यासाठी पून्हा देशनाचा खरा तर्कनिष्ठ अर्थ समजून घ्यावा लागणार आहे. म्हणून येथे अदेशनाच आहे असे समजावे.

देशनालब्धि

आकृति क्र. ८ देशनालब्धिवालाजीव

सर्वज्ञ वाणीने सांगीतलेली वस्तु व्यवस्था आणि दु:खमुक्तीचा समीचीन उपाय आत्मसात करणे यास देशना म्हणतात. या वस्तुविज्ञानानुसार प्रत्येक द्रव्यास त्याच्या अनंत गुणासह शाश्वत अस्तित्व आहे. हे शाश्वत अस्तित्व राहणाऱ्या अंशाला / ध्रुवपिण्डचे ध्रौव्यत्व कायम ठेवून द्रव्याचे परिणमन चालू ठेवणेचे कार्य द्रव्यत्वगुण काम करते. याचा अर्थ असा कि , द्रव्याने प्रत्येक समयासमयाला परिणमत राहणे हा सुध्दा स्वभावच आहे. अनंत गुणापैकी असे सहा सामान्य गुण आणि श्रध्दा ज्ञान चारित्र इत्यादि विशेष गुण आहेत. हीच खरी स्वत:ची संपत्ति (इस्टेट) होय. आता थोडक्यात पण नेमकी प्रयोजनभूत माहीती असणे आवश्यक आहे कि, निजध्रुवात्म्यातील ज्ञानगुण नित्य परिणमत असताना / जाणण्याचे कार्य होत असताना त्यामध्ये प्रत्येक वेळी पूढील प्रमाणे प्रक्रिया होत असते. १) दर्शनोपयोग (स्वात्मग्राहकं दर्शनं) (स्वसंवेदक) २) ३)४) अवग्रह ईहा अवाय (स्व-पर संवेदक ज्ञान) ५) धारणा (स्मृतिसंस्कार). याप्रमाणे ज्ञानाच्या सकलादेशी (पुरेशा ताकदीची) प्रक्रिया सहजपणे / नैसर्गिकपणे होत असतात. यासच मति-श्रुत ज्ञान म्हणतात. ज्ञानाची ही सूक्ष्म प्रक्रिया सांगणारे सर्वज्ञशिवाय दुसरे कोण असू शकणार आहेत? त्यांचे हे महान उपकार आहेत. तर्क दृष्ट्या यांची सिध्दी करता आली तरी ही याचे खरे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रेय सर्वज्ञवाणीसच !

या ज्ञानप्रक्रियेने स्वसंवेदनसह (पर्यायात्मक) स्वत: जाणत असल्याची जाण आणि काय जाणतो ती परवस्तु असे 'स्व-पर' ज्ञान होत असताना हा जीव स्वत:चे आणि स्वत:च्या अमूर्त सुखदु:ख भावनाचे वेदन करतो. या मोहकषायरुप अमूर्त भावनासच मान अपमान आदिरुप स्वप्रतिष्ठेचा आदि प्रश्न उभा करुन जीवन पणास लावून अधिकच मोही होतो. यासच दर्शनमोह वा मिथ्याश्रध्दा अर्थात खोटी श्रध्दा म्हणतात. याचे सहभावीच क्रोध मान माया लोभ हे चारित्र मोहनीयची उत्पत्ति करतात. या उत्पत्तिमुळे कर्मांचा आस्रवबंध होऊन आणि शरीररचना होऊन जणूं सर्व विश्वसंयोगसंबंधच निर्माण होतो आणि अनंतकालासाठी संसार परिभ्रमण चालू रहाते.

या बन्धामध्ये दर्शनमोह प्रमुख आहे. म्हणून त्याच्या केवळ ओळखीसाठी आकृतिमध्ये काळा रंग दाखविण्यात येत आहे. याच्या प्रमुखते मुळेच आत्मकेन्द्रामध्ये काळारंग / काळोख दाखविण्यात आला आहे. चारित्र मोह पैकी अनन्तानुबन्धी क्रोधमानमायालोभ यासाठी गडद निळा, वा काळा रंग आणि अप्रत्याख्यान क्रोधमानमायालोभसाठी हिरवा रंग आणि प्रत्याख्यान क्रोधमानमायालोभसाठी लाल (फिका गुलाबी) रंग आणि संज्वलन क्रोधमानमायालोभसाठी पिवळा रंग दाखविण्यात येत आहे.

केवळ भावपरिणामातील फरक / तरतमता ओळखण्यासाठी हे रंग दाखविले आहेत. लेश्यासंबंधी मधील रंगाची साम्य वाटत असले तरी याचा संबंध नाही. या पैकी अनंतानुबंधि कषाय हे अनंत काल संसारबंधनासाठी असणारे अर्थात पाषाणावरील रेषेप्रमाणे आत्म्यावर कठोर कसणारे संस्कार आहेत. अप्रत्याख्यानकषाय हे त्या पेक्षा थोडेसे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मृदु संस्कार असणारे भूमीवर रेषा उमटविल्याप्रमाणे आहेत. यामुळे व्रते घेण्याचे मनात असूनही व्रताचरण होऊ देत नाही. प्रत्याख्यान हे आणखी मृदु संस्कार म्हणजे वाळूवरील रेषेप्रमाणे आहेत. थोड्याशा विवेक विचार वावटळीने या रेषा नाहीशा होतात. यामुळे गृहस्थास अणुव्रतादि पालन शक्य होते. संज्वलन हे मुनिप्रभुतीस असणारे कषाय पाण्यावरील रेषेप्रमाणे उत्पत्ति होताच नाहीसे होणारे / संपणारे आहेत. यातील दर्शन मोह आणि अनंतानुबंधिची दु:खपरंपरा नष्ट करण्याची बुध्दी आणि त्याच्या योग्य उपायाचा शोध घेण्याची वृत्ती या वस्तूव्यवस्थेच्या देशनामधून होते. हा दु:खमय संसार आत्म्याविषयीच्या अज्ञानामुळेच असल्याने याचा उपाय आत्म्याचे यथार्थ ज्ञान करुन घेणे हाच उपाय एकमेव आहे.

प्रायोग्यलब्धि

शब्दरुप देशना अनेक प्रकारे असू शकते. तरीही त्यासर्व प्रकाराना देशना ऐकण्याचा अनुभव, स्मृति, प्रत्यभि , तर्क अनुमान या परीक्षा प्रधानी प्रक्रियेतून जावे लागते. त्यापैकी सुख वा दु:खाचे प्रत्यक्ष संवेदनाच्या अनुभवाचे उदाहरण येथे घेऊ. उपरोक्त पाहीलेले अनंतानुबन्धि आदि क्रोध मान माया लोभ हर्ष शोक भय आदि सांसारिक सुखदु:खाचे वेदन ते अमूर्त असले तरी आपण अनुभवू शकतो, त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. कोणत्याही इंन्द्रियाव्दारे ज्याचा अनुभव झालेला असेल तरच त्याचीच स्मृति होऊ शकते. अनुभव नसलेल्याची स्मृति होऊ शकत नाही. त्या सांसारिक सुखाचा वा दु:खाच्या अनुभवाचा विचार एका दृष्टीने अवश्य करावा. तो असा कि त्या सुखदु:खाना त्या कषायाना वजन नाही,आकार नाही, जाडी रुंदी खोली नाही, रंग नाही,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रुप नाही, रसना नाही वा वास नाही, याचा अर्थच ही अमूर्त आहे, अवस्तु ही आहे. तरीही या कषायास आपल्या जीवन प्रवाहाचा / जीवन प्रेरणाचा स्त्रोत समजतो. इतका कि त्याच्या पूर्वीच्या अनुभूतिच्या स्मृतिने रोमांच सुध्दा येऊ शकतात. ही स्मृति होय. स्मृति नंतर प्रत्यभिज्ञान. पूर्वीची ती स्मृति आणि आता वर्तमानातील त्याच्याशी एकत्व दाखविणारा एखादा साक्षात प्रसंग हा अशा संवेदनाने जाणला जाणारा प्रसंग अशी मिश्रण असलेले ज्ञान यास प्रत्यभिज्ञान म्हणतात. हे प्रत्यभिज्ञान सादृश्य आणि वैसादृश्यही असू शकते. हे मिश्रणरुप ज्ञान केवळ स्मृति पेक्षा अधिक सुखदु:ख संस्कार करणारे आहे. असे पूर्वीच्या स्मृतिस एकत्व दाखविणारे वा साम्यता दाखविणारे सादृश्य प्रत्यभिज्ञानाचे वा समानता नसलेले वैसादृश्य प्रत्यभिज्ञानाचे अनेक प्रसंग बनतात. असे विशेष प्रसंगानी विशेष परिचीत झाल्याने कांही विशेष व्यापक नियम असल्याचे ज्ञान होऊ शकते. यास तर्क म्हणतात. या तर्कामध्ये नियम बांधला जात असल्याचे उदाहरण जेथे जेथे सुखदु:खाचे वेदन जाणले जाते तेथे तेथे आहे आणि जेथे जेथे ज्ञान आहे तेथे तेथे जीव / आत्मा आहे. जेथे जेथे जाणणारी ज्ञानपर्यायवाला आत्मा आहे तेथे तेथे शाश्वत ध्रुवात्मा आहे. यास व्याप्तीची प्रतीति अथवा व्याप्तीज्ञान म्हणतात. अशा व्याप्तीज्ञानासच तर्क म्हणतात. हे तर्काचे व्याप्तीज्ञान संपूर्ण विश्व आणि तिन्ही काळासाठी खरेच असते. या खऱ्या तर्कानूसार इष्ट भासणाऱ्या वस्तूच्या प्राप्तीचे प्रयत्न आणि अनिष्ट भासणाऱ्या वस्तू टाळण्याची प्रवृत्ति करतो. असे इष्ट वा अनिष्ट भासणाऱ्या वस्तूच्या ज्ञानास अनुमान म्हणतात. हेच अनुमान देशनाचा खरा खुरा विकास आहे, थोडक्यात म्हणजे विषयासक्त अशा अमूर्त पण अजीव भावनास सत्य समजून त्या उराशी बाळगून मूर्त जगतात सुखाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शोध घेतो. हीच सुख शोधण्याची रीत, जर निजात्माविषयी अवलंबिली तर खऱ्या सुखाचा मार्ग समोर प्रगट होतो/ प्राप्त होतो आता त्याविषयी थोडेसे ---

जिन उपदेश म्हणजेच देशना ऐकली होती (ऐकल्याचा 'अनुभव' घेतला होता) त्याच्या अनुषंगिक पुढील ही माहीती / देशना मिळते. आत्मा ही वास्तवातील वस्तु आहे, आत्म्याला अनंत गुण आहेत, ते सर्व गुण शाश्वत आणि सहभावी आहेत, त्यालाच ध्रुव म्हणतात, त्या पैकीच एक चित्स्वरुप म्हणजे नित्य जाणत राहणारा आहे, तसेच आनंद हा सुध्दा शाश्वत गुण आहे, आनंद गुणाच्या स्वाभाविक परिणतीने खरा आनंद जीवनात येतो, हा आनंद आभासमयी नाही,याच्या विभाव परिणतीने आभासमयी सांसारिक परवस्तुनिमित्तक सुखदु:ख उत्पत्ति होते, अशा तऱ्हेचा उपदेशिला गेलेला आणि त्यावेळी तसा अर्थभासित झालेला

'तो' मी ध्रुवचिदानंदात्मा होतो.

अशी स्मृति आहे. तशी वारंवार स्मृति होत असताना अधून मधून अशी ही भावभासना होते कि, तो उपदेशिला गेलेला आणि आत्ता घटित प्रसंगावरुन वा तत्सम मिळालेल्या माहीतीवरुन प्रतिभासीत होत असलेला

'जो'मीपूर्वी ध्रुवचिदानंदात्मा होतो 'तोच हा' मी ध्रुवचिदानंदात्मा आहे.

याप्रमाणे स्मृतिसह आत्ताच्या वेदनाची जोडमिश्रणरुप प्रत्यक्ष भावना झाली ती 'प्रत्यभिज्ञानाची' अनुभूति आहे. ही 'तो' + 'हा' असे (इदन्ताभाव व तत्ताभावचे) 'मिश्रण' आहे, ज्याप्रमाणे तांदूळ व दाळ यांची खिचडी आहे, भात अणि वरण नव्हे. याप्रमाणे प्रत्यभिज्ञानाने सुध्दा वारंवार निजध्रुवात्म्याचा परिचय झाल्यानंतर याची व्याप्ती वाढून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संपूर्ण विश्वव्यापक आणि तिन्हीकाळ व्यापक नियम प्रतिभासित होतो

'जो जो' जीव आहे ' तो तो' ध्रुवचिदानंदात्मा आहे.

यामधून जो जो + तो तो अशी व्याप्तीरुप प्रतीति आहे. यास 'तर्कज्ञान' म्हणतात. हा प्रतिभास इतका महत्वाचा आहे कि जणु काही हा या विषयाचा सर्वज्ञच. हा सर्व जीवाविषयीचा समताभावच आहे. ही पोपटपंची नसून तर्कव्याप्तीची प्रत्यक्ष भावभासनाच आहे. प्रत्यक्ष प्रामाण्य सहित शुध्दात्मानुभूतिच्या मानाने परोक्ष असला तरी प्रत्यक्ष शुध्दात्मानुभूतिच्या वेळी याच तर्कज्ञानाचा खरेपणा अनुभवात येणार आहे.या तर्कज्ञानाच्या बळावर जो जीव समोर येईल त्यास म्हणतो कि

तू हा ध्रुवचिदानंदात्मा आहेस, कारण तुझ्यामध्ये ज्ञान आदिची पर्याय आहे.
<------ साध्य-----> <-----------साधन--------->

याप्रमाणे <u>साधनावरून साध्याची</u> प्रतीती होणे यास अनुमान म्हणतात. अगदी अशीच प्रथम पुरुषी स्वत:विषयी

मी हा ध्रुवचिदानंदात्मा आहे, कारण माझ्यामध्ये निर्णय झालेली ज्ञानपर्याय आहे.
<------साध्य-----> <------------साधन----------->

अशी भाव भासना आहे.

याप्रमाणे <u>साधनावरून साध्याची</u> सुनिश्चित प्रतीति स्वत: विषयीची येते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रायोग्यलब्धिमुळे येणारी स्वच्छता

आकृति क्र. ९ ते ११

आकृति क्र. ९



याप्रमाणे प्रायोग्यलब्धि प्रत्याभिज्ञान तर्कज्ञान व अनुमान ज्ञान अशा तीन टप्प्यामध्ये पूर्ण होते. वास्तविक तेव्हाच पूर्ण म्हणता येईल ज्यावेळी या जीवाने (मी) अतीन्द्रिय निर्विकल्प स्वसंवेदन/ निजध्रुवशुध्दात्मानुभव प्रत्यक्षप्रामाण्यसहित करुनच राहील. अन्यथा अशी प्रायोग्यलब्धि अनेकदा प्राप्त करुनही पून्हा पून्हा त्याचे विस्मरण होऊन संसार अनंत तो अनंतच राहीला, जर अतिमंद शक्तिनिशी अत्यल्पकाळ जरी निजध्रुवशुध्दात्मानुभव केला तरी अनंतपुद्गल परावर्तनाचे भव नष्ट होऊन फक्त उपार्ध (अर्धे) पुद्गलपरावर्तन भव शिल्लक राहतात. ही मोक्षमार्गाप्रति प्रगति अन्य कोणत्याही उपायाने / ज्ञान सोडून अन्य कोणत्याही गुणास साधन करु गेल्यास (श्रध्दा वा संयम चारित्र शाश्वत आस्तित्व आदि) एकही भव कमी होत नाही. जरी ज्ञानपर्यायास साधन केले तरी ही प्रत्यभि-तर्क-अनुमान या माध्यमातून प्रायोग्यलब्धि पूर्ण करुन प्रकृष्ट विशुध्द मतिश्रुत-ज्ञानोपयोगनिशी पाचव्या करणलब्धिमध्ये शिरल्याशिवाय आत्मोपलब्धि होत नाही.

आकृति क्र. १०

यावरुन लक्षात आले असेल कि आत्मवस्तूमधील केन्द्रबिन्दु निजध्रुवात्माविषयी जो गडद अन्धकार होता तोच या प्रायोग्यलब्धिच्या प्रत्यभि-तर्क-अनुमान या क्रमवार अवयवानी क्रमशः

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. ११

अंधुकपणा नष्ट करुन उज्वल उज्वलतेने प्रकाशीत केले आहे. कठीण पाषाणमयी मिथ्याश्रध्दा ठिसूळ होउन ढासळण्या योग्य झाली आहे. आणि मिथ्याचारित्र अति रुक्षता सोडून शुध्दात्मानुभवनच्या स्वरुपाचरण चारित्ररुप (अंतरंग चारित्र गुणाची सम्यक् चारित्ररुप पर्याय) होण्यासाठी स्निग्ध सुगंधाने उन्मिलीत झाले आहे. केन्द्रबिन्दुनिजध्रुवात्मा आता दृष्टीपथात ज्ञान किरणाने स्पष्ट झालेला आहे. निजध्रुवशुध्दज्ञानदर्शनानंदात्म्याकडे सरळपणे उपयोग लावण्याची पात्रता / क्षमता आली आहे. हेच आकृति क्र. ९ प्रत्यभिज्ञान, क्र १० तर्कज्ञान, क्र ११ अनुमानज्ञान यामध्ये क्रमश: उत्तरोत्तर अन्धकार कमी कमी होउन प्रखर ज्ञानकिरणानी हा ध्रुवात्मा स्वच्छ स्वच्छ प्रकाशीत होत गेला आहे.

करणलब्धि / सविकल्प स्वसंवेदन

आकृति क्र. १२



आणखी एक जणूंकांही जाड पडदा अडसर म्हणून उभा आहे. त्यामधून एक ज्ञानोपयोग सरळ रीतीने ध्रुवात्म्याला जाणू शकतो, असे जाणत असताना तो तेथे पडदा असल्याचे लक्षातही येत नाही. जणूकाही जाडथरातून सूईसरळ छेद करीत करीत अलिकडून पलिकडे आरपार घुसते आणि बाहेर पडते. अथवा क्ष-किरण वा लेसर किरणादि मधल्या थरातून आरपार बाहेर जातो. हे आकृति क्र १२ मध्ये दाखविले आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मधल्या थराच्या प्रत्येक अंशाला छेदितछेदित निजध्रुवाचे लक्ष्यकरुन सविकल्पस्वसंवेदन करीत करीत सकलादेशी (प्रकृष्ट विशुध्द) मतिश्रुत ज्ञानोपयोग शिरत आहे. हे शिरणारे साधन अतिबलिष्ठ आहे.

थरातून बाहेर पडते वेळी असलेले सूक्ष्मछिद्र कल्पनेत फार लहान वाटते. तर ही प्रथमोपशम सम्यक्त्वाची क्रिया असल्यामुळे क्षायोपशमिक परंतु अल्प शक्तीचीच परंतु सकलादेशी शक्ती आहे. पूढे वारंवार शुध्दोपयोग केल्याने हे छिद्र मोठे होत जाणारच आहे. पण तेथे अवश्य समजावे कि अत्यल्प लहान छिद्र असले तरी त्या छिद्रतून दिसणारा ध्रुवात्मा स्वच्छ पूर्ण व प्रत्यक्षच आहे. मध्यंतरी कसलाही अडथळा नाही किंवा अस्पष्टताही नाही. जणू काही लहान वा मोठ्या छिद्रातून संपूर्ण सूर्यास पहावे.तसे तर केवलज्ञानानेच तो परिपूर्ण दिसतो. म्हणून आत्ताचे कर्तव्य सकलादेशी मतिश्रुतज्ञानोपयोगाने ध्रुवशुध्दात्म्यास जाणणे एवढेच आहे. हाच शुध्दोपयोग होय. हेच धर्म्यध्यान होय. हेच शुध्दध्यान सबकुछ है ॥ झाणं हवे सव्व ॥ शुध्दात्मध्यान समस्त विभाव भावोंका / कर्मो का निराकरण करनेवाला और स्वभाव प्राप्ती करनेवाला सबकुछ है। कुन्दकुन्द भारती - नियमसार गाथा ११९॥ ही जाणण्याची क्रिया होत असताना दर्शनमोहाचा आणि अनंतानुबंधि कषायाचा उपशम वगैरे द्रव्यकर्माची पळापळ आपली जागा सोडून चारही दिशास सहजपणे होत असते, ते आपल्या ज्ञानोपयोगात येत नाहीत. यासच करणलब्धि म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्मोपलब्धि ; निजध्रुवशुध्दात्मानुभव

आकृति क्र. १३



प्रायोग्यलब्धिमधील तत्त्वाचा निर्णय हा संपूर्ण विश्वातील सर्व वस्तूविषयीचा आपल्या निजात्म्याच्या संबंधात हीत अहीतचा विचार-परीक्षा-सांव्यवहारीक प्रत्यक्ष अनुभव घेऊन म्हणजे हेय - ज्ञेय - उपादेय पूर्णपणे जाणून शाश्वत आत्मभूत असलेला नित्यपरमात्माच हीतकारक असल्याचे स्वत: जाणले. त्यास सर्वज्ञाचे अनुमोदन घेतले. हे सर्व करीत असताना यातील पारिभाषिक शब्दांचे वा अवजड विधीचे ज्ञान नसले तरी सुध्दा भोळाभावडा जीव / तिर्यंच पशुपक्षी सुध्दा पारिभाषिकमधील योग्य प्रयोजन भूत / परिज्ञान/ सार भाषाभाव/ शब्दशिवाय असलेले आत्मस्वरुप यथार्थ ओळखून घेऊन भावभासना करीत करीत भगवान निज - परम - आत्मा सरळ सरळ जाणून एकरुप -लीन-निमग्न - परमअव्दैत होतात, ध्यानमग्न होतात. आपण ही हाच सरळ सरळ भाव घेऊन भगवान निजपरमात्म्यास उपयोग लावून परमात्मलीन व्हावे . हा सरळ सरळ लागलेला ज्ञानोपयोग हा प्रमाण मतिश्रुतज्ञानोपयोग आहे. यामध्ये स्वच्छ शुध्द परिपूर्ण परमपारिणामिक असलेला परमात्मा प्रत्यक्ष जाणतो, प्रत्यक्ष अनुभवतो. प्रत्यक्ष जाणत असलेले प्रत्यक्षच दिसते, प्रत्यक्ष अनुभवन आहे. म्हणजेच प्रत्यक्षतेचे प्रामाण्य त्याच वेळी आहे. म्हणून स्वसापेक्ष परनिरपेक्ष , खरा, स्वाभाविक निर्मळ आनंद स्वत: स्वयंअनुभवत आहे. इन्द्रियाचे माध्यम सुटलेले आहे कि नाही , सरागता गेली आहे कि नाही, विकल्प गेले आहेत कि नाही वगैरे पर्याय विकल्पाच्या अतीत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झालेला आहे. अर्थात अतीन्द्रिय आहे, निरागी आहे, वीतरागी आहे, निर्विकल्प स्वसंवेदन चालू आहे. परमानंद आहे. परम आनंद रसलीन आहे. वस्तुस्वभावाप्रमाणे स्वभावलीन आहे. सहज आनंद आहे. सहज परिणति आहे. समाधि आहे. आत्मसाक्षात्कार आहे. परमात्मा साक्षात्कार आहे. ज्याचे धर्म आहेत अशा धर्मीचे हे ध्यान अर्थात धर्म्यध्यान आहे. मंगल पवित्र शुध्द पर्याय प्रगट आहे तरीही ध्याना मध्ये याप्रगटपणाचा विकल्प नाही.

हा निजध्रुवशुध्दानंदात्मानुभव आहे. हा शुध्दात्मानुभव झाल्यामुळेच सम्यग्दर्शन प्राप्ती झाली आहे. मिथ्यात्व गेले म्हणायचे. याचा काल केवळ एक अंतर्मुहूर्त आहे. हा अंतर्मुहूर्त लहानच असो वा मोठा असो, गुणस्थान जघन्य असो वा उत्कृष्ट असो यामधील आनंद एकच सिध्दासारखा आहे. येथे स्वत:च्या रुपाचे आचरण म्हणजे स्वरुपाचरण चारित्र आहे. बाह्य जगतातील सर्व वस्तूंचा, वस्तूंच्या पर्यायांचा, त्यांच्या संयोग भावाचा- भावकर्माचा या अनुभवनमध्ये निजध्रुवात्म्यामध्ये अभाव आहे. द्रव्यकर्माच्या प्रभावाचा अभाव या ध्रुवात्म्यामध्ये असल्याची जाण आहे. म्हणून कशाचाही अणुमात्र ही राग नाही. अनुभवनमध्ये चारही चौकडीच्या कषायाचा एकही अणुमात्र येथे नाही. (परंतु ज्ञानमात्र क्षायोपक्षमिक आहे) म्हणून येथे सर्व त्याग आहे. त्याग केलेल्या भावनेचा दर्प अथवा त्यागाचा विषय विचारात असणे हा आस्त्रवभाव असतो. येथे तर संयम त्याग झालेला असूनही त्या त्यागभावनेचा ही त्याग आहे. म्हणून निर्मल आनंद भोग अर्थात निजस्वभावाचा सम्यग्भोग चालू आहे. म्हणून अणुव्रताचरण महाव्रताचरण पालनाच्या अपेक्षित परिणाम स्वरुप बाह्य त्यागाची परिणति आहे. हेच वीतरागत्व होय. म्हणून सम्यग्चारित्र आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्रिभुवनात श्रेष्ट अशा सम्यक् ध्रुवात्म्याची परमश्रध्दा चालू आहे म्हणून सम्यग्दर्शन आहे. निजशुध्दात्म्याचे प्रत्यक्ष प्रामाण्यसहित जाणणे / स्वानुभवन आहे म्हणून सम्यग्ज्ञान आहे. दर्शनज्ञान चारित्र एवढ्याच गुणांची नव्हे तर पूर्वी विभाव परिणति रुप झालेल्या सर्व गुणांची आता स्वभावरुप परिणती झाली आहे. आत्मा एकत्व कसा आहे व विभक्त कसा आहे याचे भान आहे. भाव अभावचे यथार्थ ज्ञान आहे. हे आर्तध्यान नव्हे, रौद्रध्यान नव्हे, शुक्लध्यान नव्हे तर धर्म्यध्यान आहे. वास्तवीकतर निजध्रुवशुध्दज्ञानदर्शनानंदात्म्याचे शुध्दध्यान आहे.

ज्ञानसाधना = आत्मसाधना

आकृति क्र १४

अविरतिसम्यक्त्वीच्या निर्मल ज्ञानाचा उघाड



वर आत्मोपलब्धिचे प्रकरण झाले आहे. ते अव्रतिच्या ध्यानावस्थेचे होते. चौथ्या गुणस्थानापासून चौदाव्यागुणस्थानाचे आणि गुणस्थानातीत पंधरावे स्थान या सर्व स्थानामधील शुध्दात्मानुभवाच्या आनंदाची जात / प्रकार /रीत / विधि एकच. फक्त कमीजास्त प्रमाणाचा (मोजमाप) फरक आहे. हे ध्रुवात्म्याच्या अनुभवाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत असल्याने त्याचे निदर्शक म्हणून पूढील आकृत्यामध्ये केन्द्रबिन्दु ध्रुवात्म्याचा भाग वृध्दिंगत झालेला दाखविला आहे. परंतु चतुर्थगुणस्थातील कोणतेही व्रत नसलेल्या गृहस्थाच्या अशा ध्यानाबद्दल फार संशय सामान्यत: घेतला जातो. ज्यांना ही रीत माहीत नाही अशाना संशय असणे साहजिकच आहे. पण संशयग्रस्तानी विचार करणे आवश्यक आहे कि याबद्दल जे वर्णन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ऐकवले जाते त्याबाबत आपल्या समजूतीमध्ये, कथन चर्चेमध्ये , विचारामध्ये कोठे घोटाळा होत आहे. अधिकांश हा घोटाळा शुध्दोपयोगाची रीत, शुध्दोपयोगी ध्यानावस्थामधील वीतरागी गृहस्थी (आकृति क्र. १३) आणि शुभाअशुभ उपयोग सराग सम्यक्त्वी (आकृति क्र. १४) यांच्या मधील फरक / कथनातील अभिप्राय लक्षात न घेतल्यामुळे असतो. अगोदरच अव्रति आणि त्यासोबतच त्याच्या सरागतेचे दर्शन घडत असताना संशयग्रस्ताचे समाधान कसे होणार ? म्हणून फार सावधगिरीने समजून घेणे आवश्यक आहे. यासाठी योग्यपध्दतीचा आगमाभ्यासच आवश्यक आहे. आगम हेच चक्षु आहेत. कारण ज्यांच्यामध्ये गृहस्थीचे दोष वा अपूर्ण प्रगतिच्या मुनिचे दोष नाहीत अशा अर्हन्त सिध्द यांच्या इतिहासाचे वर्णन आणि त्यासोबत असणाऱ्या तत्त्वदर्शनाचे वर्णन आगम शास्त्रात असते. गृहस्थीच्या दोषामुळे ज्याना ध्यान समजत नाही त्यांच्यासाठी हे उदाहरण आहे. गृहस्थाच्या उपयोगी आगमआधारासाठी परम अध्यात्मयोगी वीरसागरजी संकलित 'सम्यक्दर्शन के निर्णय में शुध्दात्मानुभूतिका संबंध - अपरनाम अविरति सम्यक्त्वीके शुध्दात्मानुभूति की सप्रमाण सिध्दि' अर्थात 'निजध्रुवशुध्दात्मानुभव' हा ग्रन्थ अवश्य पहावा. तसेच प.पु. महाराजींचा 'अध्यात्मन्यायदीपिका' हा अनमोल ग्रन्थ अवश्य पहावा. यामधून सर्व काही जरुर मिळेल.

या अव्रतिसम्यक्त्वी गृहस्थाने संपूर्ण विश्वाचा संयोग - संपर्क - जिज्ञासा कुतुहूल आणि त्यांच्याविषयीचा रागअनुराग अहितकारक असल्याचे शुध्दात्मानुभूतिच्या वेळी प्रत्यक्ष अनुभवले असल्यामुळे तेच आता बाहेर ही दिसत आहे. कारण आता कठीण अनंतानुबंधिचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कषायाच्या अभावात असलेल्या मृदुभावात/ शान्ततेत / वीतरागभावपूर्वक निर्मलज्ञानाने चारित्रगुणाच्या विकासाचा विधी आता त्याने जाणलेला आहे. त्यास लागणारे बल तो शुध्दात्मानुभवाने मिळवीत आहे. अशा सम्यक्दृष्टीस श्रुतकेवलि असे समयसार मध्ये म्हटले आहे. व्रत नियम संयम विषयी त्यास आदर आहे. ते धारण करण्यास लागणारे वीर्यबल तो स्वरुपाचरणातून घेण्यात रत आहे. व्रताचरणची महत्ता वेगळीच आहे. प्रथम शुध्दात्मानुभवच्या अगोदर जर अणुव्रती असेल तर स्वरुपाचरणांने एकदम पांचवे गुणस्थान होते. तसेच जर तो अगोदर दिगंबर दीक्षेसह महाव्रती असेल तर स्वरुपाचरणाने एकदम सातवे गुणस्थान प्राप्त होते. अशी गुणस्थानाची बढती निर्दोष व्रताचरणानेंच होते. विशेष म्हणजे ध्यानावस्थेचे हे विशेष बल असेल तर सातवे गुणस्थानही ओलांडून शुक्लध्यानाची प्रवृत्ती बळावू शकते आणि केवलज्ञानही प्राप्त करुशकेल. हे पहाता अव्रतिगृहस्थी सम्यक्त्वीस अद्याप फार फार कष्टदायक तप करावे लागणार आहे. पण हे बालतप नव्हे असे जाणून असल्यामुळे कधीना कधी निश्चितच प्रगति करणारच.

विश्वातील एकशेसत्तर ठिकाणामधून अशा अव्रती सम्यक्त्वी केवळ मानवाची संख्या कायमच सातशे कोटी असल्याचे आगमात सांगितले आहे. या स्थळांचे आणि सम्यक्त्वीच्या संख्याचे प्रमाण पहाता या भारतात दोन तीन कोटी सम्यक्त्वी असण्यास हरकत नाही. निदान दोन तीन लाख अथवा अगदीच निदान दोन तीन हजारामध्ये आपला क्रमांक कां नसावा ? अर्थात असलाच पाहीजे असा आपण प्रयत्न करावा. अशी ही अपूर्व आत्म प्रगति आहे./ आजच्या युगात होऊ शकते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. १५



देशव्रतीच्या ज्ञानाचा विशेष उघाड

सम्यक्‌दृष्टी अव्रति असताना त्याचे कषाय भूमिवरील रेखा प्रमाणे मृदु असणारे अप्रत्याख्यान जातीचे आहेत. भावीकाळात अनंतानंतभव फिरवू शकणाऱ्या कठोर अनंतानुबंधि कषायाचा नाश शुध्दात्मानुभवाने/ स्वरुपाचरणाने केलेला आहे. तर आता तोच उपाय वारंवार करुन अप्रत्याख्यान कषायासही या सम्यक्त्वीने आता घालविले आहे. स्वरुपाचरणाच्या बळाने कांही व्रत संयम घेत आहे. हा विकल्प ज्ञानानेच करुन लहानात लहान व्रत नियम घेऊन शुध्दात्मानुभव केला असता त्यास देशव्रती पांचवे गुणस्थान प्राप्त होते. हीच ताकद वारंवार स्वरुपाचरणाने वाढून पंचाणुव्रत , अठ्ठावीस मूलगुण, अकरा प्रतिमा आदिने जगताचा संपर्क कमी करतो. प्रथम संकल्पी हिंसा टाळतो . प्रत्याख्यानकषाय उदयात असल्यामुळे अर्थात शुध्दात्मानुभवाने मिळणारे स्वरुपाचरणाचे बल अद्याप कमी असल्यामुळे इतर आरंभी उद्यमी विरोधी हिंसा टाळू शकत नाही. स्वत:च्या बचावाची वा न्यायपक्षाचा अभिनिवेश घेऊन वीरत्वाने उफाळून विरोधीहिंसेस सामोरे जातो. वास्तवीक तर स्वात्मानंदामुळे जगातील सर्व सुखास त्याने तुच्छच केलेले आहे. याच सबळ भावनेचे पाठबळ वारंवार शुध्दात्मानुभवाने वाढवीत वाढवीत सर्व संगपरित्याग करण्यांची योग्यताही प्राप्त करतो. या वेळेपावेतो प्रत्याखानावरणीय क्रोध मान माया लोभ चा अम्मल आहे. या कषायाच्या योग्यतेचीच कृति त्याच्याकडून होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. १५ अ



अशा देशव्रती मानवाची संख्या या विश्वात तेराकोटी असल्याचे आगमात सांगितले आहे. या सोबतच आणखी एक प्रेरणात्मक माहीती आगमातच आहे कि, या विश्वात तिर्यंच म्हणजे पंचेद्रिय पशुपक्षी देशव्रती पांचव्या गुणस्थानवाल्यांची संख्या मानवापेक्षा जास्त आहे. विचारविकल्प असा कि , यांत्रिकी युगामुळे उपलब्ध झालेल्या सुखसोयीनी दिपून जाऊन मोहीत होतो. आणि स्वत:च्या आत्मप्रगतीस स्वत:च अडथळा होऊन बसतो. योग्य बोध घेणारा या पशुपक्षीपेक्षा स्वत:स सबल समजतो. शुध्दात्मानुभवाने सर्वांगीण प्रबल होतो, ज्ञान वृध्दी होते, तो शुध्दात्मानुभव बुध्दीचे खरेखुरे टॉनिक आहे.

आकृति क्र. १६ भावलिंगी महाव्रती सम्यक्त्वीचा प्रचूर स्वानुभव

चतुर्थ वा पंचम गुणस्थानवर्ती मानवाने महाव्रत पालनार्थ दिगंबर दीक्षा घेतल्यानंतर प्रथमच जो शुध्दात्मानुभव (शुध्दध्यान) करील त्यावेळी त्या भावलिंगी संताचे सातवे गुणस्थान असते. पूर्वीपेक्षा आत्ताचा हा स्वानुभव आस्वाद प्रचुर असतो. यामध्ये गाढत्व अधिक आहे आणि पूर्वीपेक्षा वारंवार आहे. पूर्वी दिवसातून कांही वेळा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असते. आता नियमाने एक अंतर्मुहूर्त ध्यान दुसरा बाह्योपयोग / शुभभाव / शुभध्यान तर पून्हा लागलीच अंतर्मुहुर्त शुध्दध्यान. याप्रमाणे निरंतर एकएक अंर्मुहूर्तानंतर शुध्दध्यान / धर्म्यध्यान असते. असे वाटते कि जणू अचल ध्रुवात्माच वृध्दिंगत झाला आहे. म्हणून आकृति क्र. १६ मध्ये पूर्वीपेक्षा केन्द्रबिन्दु ध्रुवात्मा मोठा दाखविला आहे. या दशेमध्ये ज्ञानवृध्दी विशेष विशेष झालेली असून निर्मल निर्मल झालेली आहे. प्रत्येक गुणाची अभिव्यक्ति मंगलमय होत आहे. त्या सर्वांना जाणणारा ज्ञानच आहे आणि स्वत:च जाणणारा ही ज्ञानच आहे. म्हणून केवळ ज्ञानाचीच महिमा समयसार मध्ये आहे. त्यामुळे अनेक विषयशास्त्रात पारंगत होत आहे. म्हणून आकृतीत पर्यायामध्ये वीतरागपूर्वक / फक्त संज्वलन कषाय युक्त अनेक विषयातील ज्ञानाचा उघाड आहे. कांही जीवामध्ये यावेळी व्दादशांगवाणी दैदीप्यमान - प्रगट होते. संज्वलन कषायाचा प्रभाव अगदी पाण्यावरील रेषेप्रमाणे तात्काळ मिटणारा आहे. चतुर्थ गुणस्थानापासून सातव्या गुणस्थानापर्यंतच्या निजध्रुव शुध्दात्म्याच्या शुध्दध्यानास धर्म्यधान म्हणतात. धर्म्यध्यान असणारे गृहस्थी आणि भावलिंगी संतमुनि यांचे आस्तित्व या भरतखंडात पंचमकाळाच्या अखेर पर्यंत आहे. त्यांचे अस्तित्व पंचम काळात नाही असे समजणाऱ्यास आगमात मिथ्यात्वी म्हटले आहे. चारित्र मोहनीयचा येथे जवळजवळ अभावच आहे. प्रगाढतेच्या अपेक्षेने प्रखर असलेल्या शुक्लध्यानामध्ये चारित्रमोहनीयचा पूर्ण अभाव होतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकृति क्र. १७ प्रखर स्वानुभव शुक्लध्यान



याभरत क्षेत्रात आता पंचम काळात शुक्लध्यान नाही हा ऋतुमान प्रकृतिचा नियम आहे. याचा अर्थ विश्वात कोठेच शुक्लध्यान नाही असे नसून ते निरंतर चालू आहे. याची माहीती असणे स्वत:चीच प्रगति होय. यामुळे निजध्रुवशुध्दज्ञानदर्शनानन्दानुभव करण्यास प्रेरणा मिळो. एकंदरीत निजध्रुवशुध्दात्याच्या ध्यानाने होणाऱ्या शुध्दध्यानासच धर्म्यध्यान म्हणतात आणि प्रखरतेच्या वृध्दीच्या अपेक्षेने शुक्लध्यान म्हणतात. हे शुक्लध्यान आठव्या गुणस्थानापासून बाराव्या गुणस्थानापर्यंत असते. शुक्लध्यानाच्या प्रखरतेने अक्षरश: कर्माचे प्रखर दहन होते. धावपळीच्या युगात स्वाध्यायास वेळ मिळत नाही असे ज्याना वाटते त्यानी बोध घ्यावा कि त्या अडचणीच्या कर्मोदयास ध्यानाग्निनें दहन करावयाचे असते. शुक्लध्यानात ध्यानाची मग्नता स्थिरता विशेष असते. म्हणून क्रोधकषायांचे दहन करुन आठवे गुणस्थान प्रगट होते. मानकषायाचे दहन होऊन नववे गुणस्थान, मायाचे दहन होऊन दहावे गुणस्थान प्रगट होते. सर्वच कषायांचे मूळ असलेले आणि चारित्रमोहनीयाचे अंतिम जहर असलेल्या लोभकषयाचे दहन होऊन बारावे गुणस्थान अर्थातच पूर्ण शुध्दता प्रगट होते . हे पूर्ण निर्मोही आहे. ही क्षपक श्रेणी आहे.

ज्याना असे वाटत असेल किं शुभभावाने, इंद्रिय दमनाने, संयमाने चारित्रमोहनीय नष्ट होते आणि चारित्रमोहनीय नष्ट झाल्यामुळे सम्यग्ज्ञान आणि केवलज्ञान प्रगटते. तर या गुणस्थानाचे उदाहरण आहे किं चारित्रमोहनीय येथे पूर्ण नष्ट होऊनही अद्याप केवलज्ञान प्रगटलेले

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाही. किंवा ते याचे कारणही नाही. सारभूत एवढेच किं शुध्दोपयोगाने निजशुध्दात्म्याचे शुध्दध्यान करणे एवढा एकच एक उपाय सर्वत्र म्हणजे सर्व गुणस्थाना मध्ये आहे.

आकृति क्र. १८ बारावे गुणस्थान



सहाव्या गुणस्थानामध्ये सर्व आगमाचा पाठी असो वा नसो, खऱ्या अर्थाने व्दादशांगजिनवाणी या बाराव्या गुणस्थानात प्राप्त आहे. सर्वांगीण प्रगतिची / शुध्दतेची अर्थात छद्मस्थ अवस्थेची ही चरमसीमा आहे. याच्या अंतिम समयानंतर नियमाने अर्हन्त अवस्था प्रगटणार आहे.

मुनि शिवभूति यांचे उदाहरण पाहाण्यासारखे आहे. ते इष्ट ती भावना करणारे भद्र परिणामी होते. बऱ्याच कालापूर्वीपासून मुनिदीक्षा घेऊन महाव्रताचे निर्दोष परिपालन करीत आचार्यसंघात रहात होते. संघामध्ये इतर मुनिसाधूबरोबर विद्याभ्यास होतच होता. परंतु त्यामधून कांहीच ग्रहण होत नसे. णमोकार मंत्रही येत नव्हता असे म्हटले जात असे. संघात राहूनही णमोकार मंत्र मुखोद्गत नव्हता असे म्हणता येणार नाही. तर णमोकार मंत्राचे परिज्ञान नव्हते असा अर्थ घेता येईल. परिज्ञान असल्याशिवाय णमोकार मंत्र कार्यकारी नाही असे धवला मध्ये प्रथमसूत्र णमोकार मंत्राच्या अर्थाच्या टीकेमध्ये आहे.

गृहस्थाच्या घरी आहारासाठी गेले असता गृहीणी सुपाने तुष आणि मास(साळ व तांदुळ) भिन्न करण्याचे काम करीत होती. त्यावेळी ते पाहून 'तुष - मास प्रमाणे शरीर व आत्मा भिन्न आहे' या ऐकलेल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उपदेशाचे देशनाचे स्मरण झाले. स्मरण होते म्हणूनच प्रत्यभिज्ञान ही झाले. देशनालब्धि कार्यरत झाली. अल्पबुध्दी असताना सुध्दा त्या गृहीणीच्या घरापासून संघस्थ होईपर्यंतच्या काळात तर्क व अनुमानची प्रक्रिया होत राहीली. महाव्रताचे निर्दोष परिपालन तर होतेच. नंतर आसनस्थ होऊन प्रायोग्यलब्धिच्या अल्पज्ञानासह ध्यान धारणा करताच केवळ अन्तर्मुहुर्तात क्षपक श्रेणीचे निर्दोष बारावे गुणस्थान पर्यंत आत्मप्रगति होऊन व्दादशंगजिनवाणीसागर ज्ञान प्रगटले. शुध्दध्यानाचा हा महिमा ! हे शुध्दध्यान म्हणजेच निजध्रुवशुध्दात्मानुभव, हेच धर्म्यध्यान, हेच शुक्लध्यान होय. पूर्वी अल्पमतिसह असलेले निजशुध्दात्मानुभव नसल्यामुळे बाह्य महाव्रताचरण केवळ बाल तप होते. तेच अन्तर्मुहुर्ताच्या प्रखर शुध्दध्यानाग्निनें एकदम पूर्ण वीतरागी यथाख्यात चारित्र आणि जिनवाणीसागर ज्ञान झाले. निजशुध्दात्म्याचे शुध्दोपयोगाने होणारे शुध्दध्यान (धर्म्यध्यान व शुक्लध्यान) हे ज्ञान वृध्दीचे खरे कारण आहे/ सर्वांगीण आत्मोन्नतिचे कारण आहे. ध्यान म्हणजेच ज्ञान. शुध्दात्म्याचे प्रत्यक्ष ज्ञान! साक्षात आत्मसाक्षात्कार !

आकृति क्र. १९
बारावे गुणस्थानाचे आणखी एक उदाहरण



मागील आणि या उदाहरणावरुन संपूर्ण जैन तत्त्वज्ञान सारभूतपणे प्रत्यक्ष उभे राहते. भरत चक्रवर्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये षटखंडराज्यावर अधिपत्य गाजविण्याचे ज्ञान आणि बल व्यक्त होते, क्षायिक सम्यक्त्वीही होते. पण कुठलेही व्रत नव्हते. संकल्पी हिंसा म्हणजे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

युध्द सहजपणे करीत. चक्रवर्ती पदासाठी दुसऱ्याच्या राज्यावर दरोडा घालण्याचा लोभ होता. तरी पण ती अनंतानुबंधिजनित हिंसा नव्हती. तेवढेच ज्ञान निर्मल होते. सहा महीन्याच्या दरम्यान किमान एकदा तरी निजध्रुवशुध्दात्मानुभव करीत होते. चक्रवर्तीच्या उत्तर काळात व्रताचरण आले. मुनीना शोभण्यासारखे कठोर व निर्दोष व्रताचरण उत्तर काळात दृढ झाले. प्रचुरतेने शुध्दात्मानुभवरत होते. मुनिदीक्षा घेण्याचे विकल्प पूर्ण केले नसले तरी अंतरंगी वीतरागता दृढ होती, उत्तरोत्तर दृढ होत गेली.

तो मुनिदीक्षेचा विकल्प प्रत्यक्षात पूर्ण करुन ध्यानास बसले असताना तात्काल शुध्दध्यानमग्न होउन क्षपक श्रेणीने यथाख्यात चारित्राचे बारावे गुणस्थान ओलांडून केवळ अंतर्मुहुर्तात केवलिभगवंत सर्वज्ञ अर्हन्त झाले. या प्रकरणात मुनिदीक्षेनंतरचे बाह्यतपाचरण करण्याची वेळच आली नाही. शिवभूति आणि भरत यांच्या उदाहरणावरुन निजध्रुवशुध्दात्मध्यानाचा अटळ नियम अटळ असल्याचे सुस्पष्ट आहे. नरकायुचा बंध पडलेला असताना सुध्दा राजा श्रेणिकने क्षायिक सम्यग्दर्शन निजशुध्दात्मध्यानानेच प्राप्त केले ! हा आहे शुध्दध्यानाचा महिमा !! ज्ञानसाधना हीच आत्मसाधना !!!

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानसाधना हीच मोक्षसाधना

आकृति क्र. २० ध्रुवात्मसमान केवलिची पूर्णशुध्दपर्याय



गुणस्थान म्हणजे आत्मप्रगति / आत्मोन्नति, गुणस्थानाची वृध्दी म्हणजे उत्तरोत्तर आत्मप्रगति. प्रत्येक गुणस्थान वृध्दी ही शुध्दात्मध्यानाने होत असते. जसे - प्रथमगुणस्थानातून चवथे. कांही आजन्मव्रतनियम घेउन नंतर शुध्दात्मानुभव केला असता पाचवे गुणस्थान होते. तसेच दिगंबर दीक्षा नंतर शुध्दात्मध्यान केले असता सातवे गुणस्थान होते. आठवे ते बारावेगुणस्थान आणि केवलिचे तेरावे व चौदावे आणि पूढे गुणस्थानातीत सिध्दावस्थेचे मोक्षस्थान हे सर्व ध्यानावस्थेतीलच आहेत. या ध्यानावस्थेनेच अनंतगुणापैकी प्रत्येक गुणाचा विकास म्हणजे स्वभाव परिणमन होते. हा अकाट्य नियम आहे. चवथ्या गुणस्थानानंतर पतनचे गुणस्थान तिसरे व नंतर दुसरे असते. सातव्यानंतर सविकल्पतेचे सहावे गुणस्थान येत असते.

नियमसार गाथा ११९ यात संपूर्ण विश्वभावनापासून परावृत्त होण्याच्या प्रायश्चित अधिकार मध्ये म्हटले आहे किं - औदयिकभाव (अशुभभाव), औपशामिकभाव, क्षायोपशमिकभाव तथा क्षायिकभाव (शुध्दपर्यायाविषयीचा भाव) यांचा परिहार ध्यानाने (धर्म्यध्यानाने) होतो. तसेच पांच महाव्रत, पांच समिती, तीन गुप्ति, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान, आलोचना, प्रायश्चित हे सर्व कांही केवळ ध्यानाने आपोआप घडले जाते. म्हणून भरत चक्रवर्तीस बाहयतपश्चरण करण्याची गरज राहीली नव्हती. 'झाणं हवे सव्वं। ध्यान (धर्म्यध्यान)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यही सब कुछ है। ध्यानानेच संसारभावनाचा नाश आणि शुध्दात्म सुखाची प्राप्ती अर्थात मोक्षप्राप्ती होते ! '

बाह्यसंयोग कांहीही असले तरी त्यामधून सुटकेचा विचार निर्णय ज्ञानानेच घेऊन निर्णयाच्या अम्मलबजावणीचा निर्णय व कृति ही ज्ञानपूर्वकच करावयाची असते आणि निजध्रुवशुध्दात्मध्यान ही ज्ञानानेच करावयाचें असते. वारंवार शुध्दध्यान ही (अनुप्रेक्षा) ज्ञानानेच करावयाचे असते. याचेच फल बाराव्यागुणस्थानानंतर केवलज्ञान, सर्वज्ञ भगवान, अर्हन्तदशा, स्वाभाविक अनंतआनंद प्राप्ती, सिध्दपर्याय होते.

घातिकर्माचे पूर्ण दहन झाले. अघातिकर्म सहजपणे दग्ध होऊन गेले. अनंतज्ञान अनंतदर्शन अनंतवीर्य अनंतसुखाची स्वाभाविक प्राप्ती झाली. या सर्व परिपूर्णतेचा निर्णय आगम अनुमान व प्रत्यक्षज्ञानानेही होतो. केवलिभगवंत सिध्दपरमात्मा तर अनंत द्रव्याच्या प्रत्येक गुणाचे भूत - वर्तमान - भविष्य प्रत्येक पर्यायाचे स्पष्ट त्या अविभागपरिच्छेदसह प्रत्यक्ष ज्ञान करतात. अर्हन्त आणि सिध्दपरमात्मा यांच्यामध्ये निजध्रुवशुध्दस्वभावानुसार परिपूर्ण स्वयंपूर्ण स्वभावपर्याय प्रगट झालेली आहे. जणु कांही ध्रुवकेन्द्र आणि पर्यायात्मा एकच एक अव्दैत झाले आहेत. म्हणून आकृति क्र. २० मध्ये केवळ ऐकेरी एकच वर्तूळ आहे. हाच दु:खमुक्तीचा मोक्ष. आणि स्वभावसुखाची परिपूर्ण प्राप्ती होय.

तरीही आत्ता आपणास ध्यानात घेण्यायोग्य ध्यान म्हणजे ज्ञानसाधना - ध्यानसाधना ! कारण सर्व सिध्दपरमात्मा सुध्दा प्रत्येक समयाला निजशुध्दात्मध्यानच करीत असतात !! निजशुध्दात्मध्यान हाच प्रत्येक जीवास - गृहस्थापासून सिध्दापर्यंत - एकमेव मोक्षमार्ग आहे, निजशुध्दात्मध्यान या शिवाय दुसरा पर्याय नाही !!!

सूचक : सौ. विद्युल्लता व्होरा, पुणे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुन्दकुन्दाचार्य द्वादशानुप्रेक्षा: चिंतएणिच्चं।।

अध्रुव- उत्तम भवन,वाहन,आसन, देव, कुटुंबी, सेवक, इंद्रिये, यौवन,सौभाग्यादि अध्रुव असून ते माझ्या ध्रुवात्म्यात नाहीत. सस्सदम् अप्पा। शाश्वत आत्म्याचे चिंतन नित्य करावे.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं।

अशरण- प्रत्येकसमयाच्या भावमरणाच्यावेळी कोणतेही धन, मंत्र, औषध, संरक्षक, इंद्र उपयोगी नाहीत. माझा ध्रुवशुद्धात्माच नित्यशरण आहे.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं।

एकत्व- पुण्यपापकर्म फिरवीतील तसे मी फिरलो. मी ममत्वरहित, शुद्धज्ञानमयी आहे .

शुद्धज्ञानदर्शनस्वरुपो ऽ हं ।

अन्यत्व- माता पिता बंधू पुत्र स्त्री मालक शरीर हे सर्व अन्य आहेत. ज्ञानदर्शनमयी ममात्माच अनन्य आहे.

शुद्धज्ञानदर्शनस्वरुपो ऽ हं ।

संसार- जन्म जरा मरण रोग भय आणि पंचपरावर्तन याने जीव आक्रांत होत आहे. अनादिवर्तमानअनंतकाळ अनाक्रांत असलेल्या जीवाचे ध्यान उपादेय आहे.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं।

लोक- या लोकामध्ये अशुभ उपयोगाने तिर्यंच व नरकबंधन होते. शुभोपयोगाने देव व मनुष्यगतिचे बंधन होते. तर शुद्धोपयोगाने सिध्द (मोक्ष) प्राप्त होते.

ध्रुवशुद्धस्वरुपोऽहं।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अशुचित्व- हे शरीर रुधिरमांस असे मलिन असून सडणे गळणे सतत चालू आहे. मी यापासून भिन्न श्रेष्ठ आनंदाचा भांडार आहे.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं ।

आस्त्रव- मिथ्यात्व अविरति कषाय योगाने शुभ व अशुभ आस्त्रवाचे बंधन आहे. मी अनास्त्रवस्वभावी आहे.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं ।

संवर- संवर हे जीवाचे नाहीत. मी संवरभावविमुक्त आहे. मी शुध्दभावसहित आहे. हेच माझे ध्यान नित्य असो.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं ।

निर्जरा- बाह्यव्रतसहित शुध्दोपयोग ही निर्जरा होय. मी निर्जराभावविमुक्त आहे.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं ।

धर्म- गृहस्थीधर्म व मुनिधर्म याहून शुद्धात्मा भिन्न आहे म्हणून निजध्रुवशुद्धात्म्यास (सुध्दप्पं) नित्य चिंतावे.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं ।

बोधी- असंख्यातलोकप्रमाणकर्मप्रकृति व भावकर्माच्या व्यवहाराचा व्यवहारनय आणि निरपेक्ष निजशुद्धात्म्याचा निश्चयनय यांचा अभिप्राय (निक्षेप) प्रत्येक अनुप्रेक्षाचेवेळी जाणून निजशुद्धात्म्यास भावले असता परमनिर्वाण होते.

ध्रुवशुद्धस्वरुपो ऽ हं ।

नारकर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भक्तामर-प्रणत-मौली-मणीप्रभाणाम्



परमपुज्य मानतुंगाचार्य
भक्तामर स्तोत्र लिहीत असताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ

जयउ सुय देवदा ।
श्रुतदेवता जयवन्त हो ॥

आचार्य मानतुंग विरचित

निजध्रुवात्मप्रभुचे
॥ भक्तामर स्तोत्र ॥

स्तोत्राचा मुलअर्थ अध्यात्मानुवाद (मराठी)
परमअध्यात्मयोगी मुनिवर श्री वीरसागरजी
(जन्म इ.स. १९४० दीक्षा १९७५ यमसल्लेखना १९९३)

भक्तामर-प्रणत-मौलि-मणि-प्रभाणा -
मुद्योतकं दलित-पाप-तमो वितानम् ।
सम्यक्प्रणम्य जिनपादयुगं युगादा -
वालम्बनं भव - जले पततां जनानाम् ॥१॥

अर्थ :- भक्तामरप्रणतमौलिप्रभांच्या उद्योतकाला दलित पापतमोवितानाला युगादिमध्ये आलम्बनरूप जिनपादयुगाला म्हणजे निजध्रुवात्म्याला सम्यक् नमस्कार करून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यः संस्तुतः सकल वाङ्ग्मय-तत्त्व-बोधा -
दुद्भूत-बुद्धि-पटुभिः सुर-लोक-नाथैः ।
स्तोत्रैर्जगत्त्रितय - चित्त - हरैरुदारैः
स्तोष्ये किलाहमपि तं प्रथमं जिनेन्द्रम् ॥२॥

अर्थ :- सकलवाङ्गमयतत्त्वबोधामुळे ज्यांची शुद्धात्मानुभववाली बुद्धि प्रकट झाली आहे अशा सुरलोकनाथांच्याद्वारे तिन्ही जगातील जीवांच्या चित्ताना हरणकरणाऱ्या उदार (गंभीर) स्तोत्रांनी जो स्तुती केला गेला आहे त्या प्रथम जिनेन्द्राला म्हणजे निजध्रुवात्म्याला (निश्चयनयाने) मी देखील आणखी स्तवनकरेन. म्हणजेच मी (देखील) वारंवार/सतत निजध्रुवात्मानुभव करेन.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बुध्या विनापि विबुधार्चित - पाद - पीठ
स्तोतुं समुद्यत-मतिर्विगत-त्रपोऽहम् ।
बालं विहाय जल-संस्थितमिन्दु-बिम्ब-
मन्यः क इच्छिति जनः सहसा ग्रहीतुम् ॥३॥

अर्थ :- भो विबुधार्चितपादपीठ म्हणजे भो निजध्रुवात्मन ! माझ्या ज्ञानपर्यायात विशेषबुद्धि नसताना देखील, मी म्हणजे आताचा माझा क्षयोपशमरुपसम्यग्ज्ञानपर्याय, तुझी म्हणजे निजध्रुवात्म्याची सम्यग्रीतीने स्तुति करण्यास तयार झालो आहे. म्हणून मी निर्लज्ज/उद्धट असणारा (मी सर्वज्ञपर्यायवाला नसणारा) असा आहे; कारण बालकाशिवाय दुसरा कोणता जीव पाण्यातील चंद्राचे प्रतिबिंब एकदम ग्रहण करण्याची इच्छा करील?

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वक्तुं गणान्गुण-समुद्र शशाङ्क-कान्तान्
कस्ते क्षमः सुरु-गुरु-प्रतिमोऽपि बुध्या ।
कल्पान्तकाल - पवनोद्धत - नक्र - चक्रं
को वा तरीतुमलमम्बुनिधिं भुजाभ्याम् ॥४॥

अर्थ :- हे निजध्रुवात्मन् ! बुद्धि द्वारे सुर गुरू सारखा देखील कोण पुरूष तुझ्या/निजध्रुवात्म्याच्या चंद्राच्या कांतिसमान/सुंदर/निर्मल गुणाचे कथन करण्यास/ वर्णन करण्यास समर्थ आहे?

ज्याप्रमाणे प्रलय काळाच्या वायुने ज्यात नक्रसमुदाय वर उसळला आहे अशा खवळलेल्या समुद्रास दोन बाहूनी तरून जाण्यास कोण समर्थ आहे? म्हणजे कोणी नाही. (वा) किंवा कोणी समर्थ आहे.

म्हणजे या जगात चित्रविचित्र अनंत वस्तु आहेत व विकाराने ग्रस्त झालेला जीव बहुधा मूळ वस्तुस्वरूप समजून घेण्यास स्वतःच्या अपराधाने/अनयज्ञ असल्याने समर्थ होत नाही. आणि कोणी अल्पज्ञ जीव अल्पसम्यकज्ञान असल्यामुळे समर्थ नाही. मी अल्पज्ञ सम्यक् ज्ञानी आहे. तुझे सम्पूर्ण वर्णन करण्यास केवलज्ञानीसारखा समर्थ नाही. तरी देखील आगमभाषेने निश्चयनयाद्वारे व व्यवहारनयाद्वारे (या दोन भुजाद्वारे) जाणून घेऊन निजध्रुवात्म्याचा शुद्धात्मानुभव करीत असल्यामुळे आश्रय केला असल्यामुळे कथंचित मी समर्थ आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सोऽहं तथापि तव भक्ति - वशान्मुनीश
कर्तुं स्तवं विगतशक्तिरपि प्रवृत्तः ।
प्रीत्यात्म - वीर्यविचार्य मृगो मृगेन्द्रं
नाभ्येति किं निज-शिशोः परिपालनार्थम् ॥५॥

अर्थ :- तथापि, विगतशक्ति/सामर्थ्यविहीन असा तो मी तुझ्या/निजध्रुवात्म्याच्या भक्तिवशामुळे/शुद्धात्मानुभूतीच्या ओढीमुळे स्तव / वस्तुस्वरूप ख्याति करण्यास प्रवृत्त झालो आहे.

जसे आपल्या शक्तिचा विचार न करता प्रितीने हरिण स्वतःच्या बालकाचे रक्षण करण्यासाठी सिंहासमोर जात नाही काय? अर्थात आपल्या शक्तिनुसार हरिण प्रयत्न करते.

म्हणून मी निजध्रुवात्म्याचा शुद्धानुभव करण्याचा वारंवार प्रयत्न करतो म्हणजेच वारंवार शुद्धानुभव करतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अल्पश्रुतं श्रुतवतां परिहास धाम
त्वभ्दक्तिरेव मुखरीकुरूते बलान्माम् ।
यत्कोकिलः किल मधौ मधुरं विरौति
तद्याम्र-चारू-कलिका-निकरैक-हेतुः ॥६॥

अर्थ :- भो निज ध्रुवात्मन !

मी चेतनोपयोगपर्याय आता अल्पश्रुतवाला म्हणजे अल्पज्ञानी आहे, सर्वज्ञपयार्यासारखा नाही किंवा (भावलिंगी) श्रुतकेवलिसारखा नाही. तेंव्हा केवालि-श्रुतकेवलिच्या अपेक्षेने मी आताचा चेतनोपयोग पर्याय परिहासधाम/ उपहासपात्र आहे. तरी देखील तुझी म्हणजे निजध्रुवात्म्याची भक्ति/ शुद्धात्मानुभूतिची ओढ मला तुझ्या/निजध्रुवात्म्याबद्दलचा शुद्धात्मानुभव करण्यास लावते. जसे-कोकिळपक्षी जो मधुर आवाज करतो, त्याला सुन्दर आम्रमोहोर एक मुख्य कारण आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्वत्संस्तवेन भवसन्ततिसन्निबद्धं
पापं क्षणात्क्षयमुपैति शरीरभाजाम् ।
आक्रान्तलोकमालि नीलमशेषमाशु
सुर्यांशु - भिन्नमिव शार्वरमन्धकारम्
॥७॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन !

निजध्रुवात्म्याच्या सम्यकस्तवनानें/शुद्धात्मानुभवानें/निर्विकल्पज्ञानानें संसारी जीवांचे भवसन्तति सन्निबद्ध पाप/मिथ्यात्वादि अशुद्धभाव क्षणात व्यय होतात. जसे-समस्त लोकामध्ये भ्रमरासारखा परिपूर्ण काळा असा रात्रीचा अंधकार तात्काल सूर्याच्या किरणाने तात्काल व्यय होत/नाश पावते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मत्त्वेतिनाथ तव संस्तवनं मयेद -
मारभ्यते तनु-धियापि तव प्रभावात् ।
चेतो हरिष्यतिसतां नलिनी - दलेषु
मुक्ता फलद्युतिमुपैति ननूद - बिन्दुः ॥८॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् ! भो नाथ !

निजध्रुवात्म्याच्या प्रामाण्यासहित प्रत्यक्ष ज्ञानानें जी पापे, दु:ख व मोहराग द्वेष नाश होतात म्हणजे सम्यक् आनंद मिळतो असे मानून मिथ्यादृष्टि जीव अथवा अल्पज्ञ असणारा सम्यग्ज्ञानी जीव निजध्रुवात्म्याचा प्रामाण्यसहित प्रत्यक्ष अनुभव करतो तेंव्हा मिथ्यादृष्टिला सम्यग्ज्ञान सम्यग्दर्शन समताभाव प्रगट होतो. अथवा अल्पज्ञानी अशा सम्यग्दृज्ञानीची शुद्धि वाढते तेंव्हा माझ्याद्वारे निजध्रुवात्म्याचे स्तवन/शुद्धात्मानुभवन केले जात आहे. (येथे कर्मणि प्रयोग करून शुद्धात्मानुभव सहज आहे हे दाखवून दिले आहे.)

खरोखर निजध्रुवाच्या प्रभावाने सज्जनाचे चित्त प्रमुदित/आकर्षित होईल/होतेच.

ज्याप्रमाणे जलबिन्दु कमळाच्या पानावार मोत्याच्या कांतिप्रमाणे तेजाला/सौंदर्याला प्राप्त होतो.

संदर्भ प्रवचनसार गाथा १८१ पहाणे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आस्तां तव स्तवनमस्त समस्त दोषं
त्वत्सङ्कथापि जगतां दुरितानि हन्ति !
दूरे सहस्त्रकिरण : कुरु ते प्रभैव
पद्माकरेषु जलजानि विकासभाञ्जि ॥९॥

अर्थ :- भो निजध्रुवानंदात्मन् ।

तुझे सर्वदोषरहित असा केवल ज्ञानपर्यायानी केलेले स्तवन/शुद्धात्मानुभव दूर राहो, तुझी/निजध्रुवात्म्याची कथा देखील/अल्पशुद्धात्मानुभव देखील अल्पज्ञानीनी केला असताना जगातील जीवांची अशुद्धपर्याय/सर्व दुःखे नष्ट होतात. ज्याप्रमाणे सूर्याची किरणे दूर राहो परंतु त्याची प्रभा सरोवरातील कमलांना प्रफुल्लित करते.

अल्पज्ञानी/थोडी माहिती असलेल्या जीवानी थोडी मूलभूत माहिती घेऊन निजध्रुवात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्षज्ञानाने अल्पकाळ जाणले तरी देखील त्याला शुद्धोपयोग प्राप्त होतो व शुद्धावस्था सुरु होते.

समयसार गाथा १५ पहाणे.
प्रवचनसार गाथा ३१ पहाणे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नात्यद्भुतं भुवनभूषण भूतनाथ
भूतैर्गुणैर्भुवि भवन्तमभिष्टुवन्तः ।
तुल्या भवन्ति भवतो ननु तेन किं वा
भूत्याश्रितंय इह नात्मसमं करोति ॥१०॥

अर्थ :- हे भुवनभूषण/भूतभूषण (जीव) हे निज ध्रुवात्मन् ! या लोकात आपल्या अनादिअनंत असणाऱ्या आत्ता सुद्धा अनंतध्रुवशुद्ध गुणांच्याद्वारे आपली स्तुति करणारे पर्याय अथवा पर्यायवाले आपल्यासारखे म्हणजे शुद्धअवस्थावाले होतात. त्यात कांही आश्चर्यच नाही. (जैसे चिंतन वैसी/तैशी पर्याय (समयसार गाथा १८६ व १७,१८ पहाणे) अथवा तसे न होईल तर त्याचे काय प्रयोजन?

या जगामध्ये जो मालक आपल्या आश्रिताला/सेवकाला/ शरणागताला विभूतीने/वैभवाने/ ऐश्वर्याने आपल्या समान सम्पन्न करीत नाही काय? अर्थात सम्पन्न करतोच.

म्हणजे निजध्रुवात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्षपणे जाणले असतानाच शुद्ध ध्रुवाप्रमाणे शुद्धावस्था प्रगट होतेच.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दृष्ट्वा भवन्तमनिमेष विलोकनीयं
नान्यत्र तोषमुपयाति जनस्य चक्षुः ।
पीत्वा पयः शशिकर द्युति दुग्ध सिन्धोः
क्षारं जलं जल निधेरसितुं क इच्छेत् ॥११॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

अनिमेषविलोकनीय तुझे/निजध्रुवात्म्याचे दर्शन/प्रामाण्यसहित प्रत्यक्षज्ञान केल्यानंतर/करून जीवाचे चक्षु/ज्ञान/भाव दुसऱ्या ठिकाणी संतोष पावत नाहीत. कारण शशिकरद्युति/चंद्रकिरणाप्रमाणे असणाऱ्या क्षीरसमुद्राचे दूध/जल प्राशन केल्यानंतर खारट समुद्राचे खारटजल पिण्याची कोण बरे इच्छा करेल? अर्थात कोणीही इच्छा करणार नाही.

अद्वैतनमस्कार (निर्विकल्प) वा अद्वैतभक्ति केल्यानंतर द्वैतनमस्कारात (विकल्पात्मक नमस्कार) अडकत नाही. शुद्धानंद मिळाला असताना/मिळत असताना मानस सुखाची, इन्द्रियसुखाची वा प्रशमसुखाची आणि दुःखाची इच्छा रहात नाही. निजात्म्यामध्येच स्वतःचाच अन्वयरूप राहणारा आनंदगुण आहे. असा निजध्रुवज्ञानान्दात्मा हाच खरा भोग्य विषय आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यैःशान्तरागरुचिभिः परमाणुभिस्त्वम्
निर्मापितस्त्रिभुवनैकललामभूत ।
तावन्त एव खलु तेऽप्यणवः पृथिव्यां
यत्ते समानमपरं न हि रूपमस्ति ॥१२॥

अर्थ :- भो त्रिभुवनैकललामभूत/निजध्रुवात्मन !

ज्या शान्तरागरुचि परमाणुद्वारे /चैतन्य अविभाग प्रतिच्छेदाद्वारे/अनेक अंशाद्वारे तूं म्हणजे निजध्रुवात्मा निर्मापित/निष्पन्ननिष्पत्तिमत् (प्रवचनसार गाथा ९६ची अमृतचन्द्रार्यटीका जयपुर प्रकाशन पान १८७ व गाथा ९८ पान १९२ ची टीका) असा आहे.

लघुततत्वस्फोट :- ते अंश (निजज्ञानगुण, आनंदगुण इत्यादि गुण) देखील वस्तुतः तेवढेच/तितकेच सुन्दर आहेत की यांच्या समान पृथ्वीवर अन्य कोणतेही असे सुन्दररूप नाहीच. (समयसार गाथा ३ पहाणे.)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वक्त्रं क्व ते सुर नरोरगनेत्रहारि
निःशेषनिर्जित जगत्त्रितयोपमानम् ।
बिम्बं कलङ्कमलिनं क्व निशाकरस्य
यद्वासरे भवति पाण्डु पलाश-कल्पम् ॥१३॥

अर्थ :- हे निजध्रुवात्मन् !

देव मनुष्य, तिर्यंच, नारकी यांच्या नेत्रांचे म्हणजे चित्ताचे/ज्ञानाचे हरण करणारे निःशेषनिर्जित जगत्त्रितयोपमानम्/संपूर्ण जगातील उपमेनेरहित, तुझे मुखमंडल/निजध्रुवात्म्याचे सुन्दर स्वरूप कोठे? अर्थात अतिशय सुन्दर आहे (समयसार गाथा३)

आणि कलंकमलिन चन्द्रबिंब कोठे किं जो दिवसा पळसाच्या वाळलेल्या पानाप्रमाणे पांढूरका/निस्तेज असतो.

निजध्रुवात्म्यासमोर सादिअनंतकार्यसिद्धपर्याय व सर्वज्ञपर्याय देखील फिक्या निस्तेज पडतात. म्हणून ते देखील अनुभवाचा/शुद्धात्मानुभूतिचा विषय होऊ शकत नाहीत. तसेच अशुद्धपर्याय देखील शुद्धात्मानुभूतिचा विषय होऊ शकत नाहीत. आणि परद्रव्यदेखील शुद्धात्मानुभूतिचा विषय होऊ शकत नाहीत.

प्रवचनसार गाथा १८१ चे दोन्ही टीका पहाणे

नियमसार गाथा ३८ पहाणे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सम्पूर्ण–मण्डल–शशाङ्क–कला–कलाप
शुभ्रा गुणास्त्रिभुवनं तवं लङ्घयन्ति ।
ये संश्रितास्त्रिजगदीश्वर ! नाथमेकं
कस्तान्निवारयति संचरतो यथेष्टम् ॥१४॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

पोर्णिमेच्या चन्द्राच्या कलेच्या शुभ्र समुहाप्रमाणे तुझे/निजात्म्याचे गुण त्रिभुवनात/असंख्यात आत्मप्रदेशात पसरतात आणि जे या निजध्रुवात्म्याला आश्रय करतात त्यांना किंवा सर्वज्ञपर्यायाच्या येथे संचारणाला कोण निवारण करू शकतो? अर्थात कोणीच नाही.

जो निजध्रुवात्म्याचा आश्रय करतो तो एके दिवशी सर्वत्र (संचारणारा) होतो, तो सर्वज्ञपर्याय सर्वद्रव्यगुणपर्यायाना प्रमाण्यसहित प्रत्यक्ष युगपत् एक समयात जाणतो त्याला कोणी अडवत नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चित्रं किमत्र यदि ते त्रिदशाङ्गनाभि-
र्नीतं मनागपि मनो न विकार-मार्गम् ।
कल्पान्तकालमरुता चलिताचलेन
किं मन्दराद्रिशिखरं चलितं कदाचित् ॥१५॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

निजध्रुवात्म्या जर तुझे चेतनस्वरूप त्रिदशादि पर्यायांच्या/अवस्थांच्या द्वारे थोडे देखील विकारमार्ग क्षणिक पर्यायरूप (ध्रुवच जर क्षणिकरूप) अवस्थेला प्राप्त होऊ शकत नाही, यात कांही आश्चर्य नाही.

जसे पर्वतास चलायमान/हालवणारे प्रलयकालाच्या वाऱ्याने सुमेरूपर्वताचे शिखर कदाचित/कधीतरी चलायमान होईलच काय? अर्थात/परंतु कधी देखील चलित होत नाहीत.

(तर) मग आम्ही कितीही अनादि अनंतपर्यायी (भव पर्यायात) भटकलो तरीही आमचे ध्रुवद्रव्य कधीही चलायमान झालेले नाही.

म्हणून हे जीवा, वस्तुस्वरूप समजून घेऊन निजध्रुवशुद्धात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्षज्ञानानें क्षणभर तरी जाण ! निजशुद्धात्मानुभव हीच खात्री होय !!

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निर्धूम - वर्तिरपवर्जित - तैल - पूर :
कृत्स्नं जगत्त्रयमिदं प्रकटीकरोषि ।
गम्यो न जातु मरुतां चलिता चलानां
दीपोऽपरस्त्वमसि नाथ ! जगत्प्रकाशः ॥१६॥

अर्थ :- भो नाथ निजध्रुवात्मन !

तू निर्धूमवर्ति/अशुद्धरहित/धूररहित वातरहित संपूर्णपणे तेलरहित/परावलंबनरहित स्वयंभू आहेस आणि तुझ्यात ज्ञानशक्ति महान् आहे.

कारण निजध्रुवात्म्याला जाणणाऱ्या पूर्णशुद्ध केवलज्ञान-पर्याय प्रगट झाली असताना सम्पूर्ण तिन्ही जगाला युगपत् / प्रत्यक्ष जाणते.

पर्वताला चलायमान करणाऱ्या वाऱ्याने देखील कधी प्रभावित न होणाऱ्या व जगाला प्रकाशित करणारा असा तूं दिवा/ज्योति आहेस.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नास्तं कदाचिदुपयासि न राहुगम्यः
स्पष्टीकरोषि सहसा युगपज्जगन्ति ।
नाम्भोधरोदर-निरुद्ध-महा-प्रभाव :
सूर्यातिशायि महिमासि मुनीन्द्र लोके ॥१७॥

अर्थ :- भो मुनीन्द्र/निजध्रुवात्मन् !

तू सूर्यातिशायि महिमा आहेस, (तू सूर्याहून महान आहेस.) कारण सूर्याप्रमाणे तूं कधीही अस्ताला/व्ययाला/नाशाला प्राप्त होत नाहीस आणि सूर्याला राहू ग्रासतो तसे निजध्रुवात्म्याला कोणताही मलिन पर्याय किंवा शुद्धपर्याय नष्ट करीत नाही/ ग्रासत नाही. तसेच युगपत् जगाला तुझ्या ज्ञानतेजाने तू स्पष्ट प्रकाशित करतोस अशी तुझी शक्ति आहे. तसेच ज्याप्रमाणे सूर्यासमोर ढग आले असताना सूर्य झाकला जातो. त्याप्रमाणे देखील निजध्रुवात्मा कधी कर्मांनी झाकला जात नाही.

म्हणजेच निजध्रुवात्मा अनादिअनंत निरावरण आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नित्योदयं दलित मोहमहान्धकारं
गम्यं न राहुवदनस्य न वारिदानाम् ।
विभ्राजते तव मुखाब्जमनल्पकान्ति
विद्योतयज्जगतपूर्व शशाङ्क बिम्बम् ॥१८॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

तुझे अनादिअनंतस्वरूप निर्मोह/निरावरण आणि राहूवदनाद्धारे न ग्रासला जाणारा म्हणजेच अशुद्धपर्यायाद्धारे किंवा शुद्धपर्यायाद्धारे ग्रासला न जाणारा आणि मेघाद्धारे/कर्माद्धारे न झाकला जाणारा म्हणजेच निरावरण असणारा अनंत चैतन्यशील आणि जगाला प्रकाशित करणारा तुझा ध्रुवस्वभाव अपूर्व चन्द्रबिम्बाप्रमाणे शोभीत आहे.

परंतु जगातील चन्द्र राहूने ग्रासला जातो व मेघानी झाकला जातो.

भो आत्मन् । पर्यायात मलिनपणा आहे म्हणून मी सर्वथा (ध्रुवदृष्टिने व पर्यायदृष्टिने) मलीन आहे असा न्यूनगंड तू बाळगू नकोस. कारण संसारावस्थेत पर्याय पर्यायदृष्टिने अशुद्ध आहे तरी देखील संसारावस्थेत (सुद्धा) असणाऱ्या जीवद्रव्यामध्ये ध्रुव दृष्टिने निजध्रुवात्मा अनादिअनंत शुद्ध आहे.

धवल पुस्तक १ पान ३७ पहाणे.

समयसार गाथा ६ व १४ यावरील दोन्ही टीका पहाणे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

किं शर्वरीषु शशिनाह्नि विवस्वता वा
युष्मन्मुखेन्दु दलितेषु तमःसु नाथ ।
निष्पन्नशालि वनशालिनि जीव लोके
कार्यं कियत्जलधरैर्जल भार नम्रैः ॥१९॥

अर्थ :- भो नाथ ! भो निजध्रुवात्मन् !
युष्मन् मुखेन्दु दलिततमः

निर्मोहस्वरूप/निजध्रुवस्वरूप असताना रात्रीमध्ये असणाऱ्या चन्द्राचा काय उपयोग? अथवा दिवसा सूर्याचा तरी काय उपयोग?

म्हणजे निर्मोहनिजध्रुवशुद्धात्मस्वरूपाला दुसऱ्या कोणाचीही जरुरी नाही.

ज्याप्रमाणे शेतामध्ये धान्यपूर्ण पक्व झाले असताना पृथ्वीतलावर पाण्याने भरलेल्या मेघांची काय गरज आहे?

अर्थात धान्य पिकून डोलत असताना त्यावेळी जलमेघांची कांही गरज नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानं यथा त्वयि विभाति कृतावकाशं
नैवं तथा हरिहरादिषु नायकेषु ।
तेजःस्फुरन्मणिषु याति यथा महत्वं
नैवं तु काच – शकले किरणाकुलेऽपि ॥२०॥

अर्थ :– भो निजध्रुवात्मन् !

निजध्रुवात्म्यामध्ये जसा निजज्ञानगुण सुशोभित आहे तसा हरिहरादिक नायकांच्यामध्ये/स्वतःच्या पर्यायामध्ये व परद्रव्यामध्ये माझा ज्ञानानन्द गुण नाही.

ज्याप्रमाणे तेजाने स्फुरत असणाऱ्या मण्यामध्ये/रत्नामध्ये त्यांचे स्वतःचे तेज आहे तसे किरणांच्या राशीनी व्याप्त असणाऱ्या कांचेच्या तुकड्यामध्ये तसे स्वतःचे तेज नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मन्येवरं हरिहरादय एव दृष्टा
दृष्टेषु येषु हृदयं त्वयि तोषमेति ।
किं वीक्षितेन भवता भुवि येन नान्यः
कश्चिन्मनो हरति नाथ भवान्तरेऽपि ॥२१॥

अन्वयार्थ :- (येषु दृष्टेषु हरिहरादयः एव द्रष्टाः वरं हृदयं त्वसि तोषमेति । एवं भवता वीक्षितेन किं)

अर्थ :- भो नाथ ! हे निजध्रुवात्मन् !

मी असा विचार करतो कि ज्या भोगासाठी/संतोषासाठी हरिहरादिक/माझे पर्याय आणि परद्रव्ये पाहिले. परंतु माझ्या श्रेष्ठ ज्ञानाने तुला म्हणजे निजध्रुवात्म्याला जाणले असताना संतोष/सम्यक् आनंद प्राप्त होतो.

तुला पाहिले असताना काय होते तर त्याने जगामध्ये व भवान्तरामध्ये देखील अन्य कोणतीही वस्तु चेतनेला/चित्ताला हरण/आकर्षित करीत नाही.

खरा आनंद मिळण्यासाठी निजध्रुवात्मा हाच सम्यग् भोग्य विषय आहे.

हे अव्रतिगृहस्थी अनुभवतो. म्हणून सम्यग्दर्शन होते त्यावेळी परपदार्थाची खरी रुचि रहात नाही.

परमात्मप्रकाश गाथा ४२,४३,४४,४५.

समयसार गाथा ४. श्रुतपरिचित अनुभूत कामभोगबंधकथा ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्त्रीणां शतानिशतशो जनयान्ति पुत्रान्
नान्या सुतं त्वदुपमं जननी प्रसूता ।
सर्व दिशो दधति भानि सहस्त्ररश्मिं
प्राच्येव दिग्जनयति स्फुरदंशुजालम् ॥२२॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् ! अनेक स्त्रिया/माता शेकडो पुत्राना जन्म देतात. परंतु निजध्रुवज्ञानानन्दात्म्यासमान प्रगट करणाऱ्या/असणाऱ्या निजद्रव्याशिवाय आनंद धारण करणारे दुसरे कोणतेही द्रव्य नाही. ज्याप्रमाणे सर्वदिशा अन्य नक्षत्रताऱ्यांना धारण करतात. पूर्व दिशाच स्फुरदंशुजाल सहस्त्ररश्मिवाल्या सूर्याला उदयाचेवेळी धारण करते.

द्रव्य हे ध्रुवपर्यायात्मक असते म्हणजे द्रव्यात गुणमय पिण्डवाला ध्रुव एक भाग आहे व पर्याय एक भाग आहे. द्रव्याच्या आश्रयाने गुण राहतात.

निजजीवद्रव्यात ज्ञानआनन्द आदि गुण आहेत. म्हणजेच माझे ज्ञानआनन्दादि गुण माझ्याच द्रव्याने धारण केले आहेत.

म्हणजे सम्यग्भोग्य विषय निजजीवद्रव्यानेंच धारण केला आहे.

आधार-आत्मख्याति गाथा ३२० त्यावरील जयसेन आचार्यांची टीका व त्यातील किंच विस्तार भाग व 'गुणवत् द्रव्यं, पर्यायवत् द्रव्यं, गुणपर्यायवत् द्रव्यं ।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्वामामनन्ति मुलयः परमं पुमांस-
मादित्य-वर्णममलं तमसः पुरस्तात् ।
त्वामेव सम्यगुपलभ्य जयन्ति मृत्युं
नान्यः शिवः शिवपदस्य मुनीन्द्र पन्थाः ॥२३॥

अर्थ :- भो मुनिन्द्र ! हे निजध्रुवात्मन् !

मुनिजन सूर्याच्या समान तेजस्वी अमल/निर्मल (अनादिअनंतशुद्ध) अंधकाराहून वेगळे असणाऱ्या परमपुरुष असणाऱ्या/श्रेष्ठ असणाऱ्या निजध्रुवस्वरूप तुला/निज-ध्रुवात्म्याला मानतात, म्हणजे शुद्धात्मानुभव करतात आणि निजध्रुवज्ञानानन्द/निजसदानन्दाला सम्यक्प्राप्त करून/जाणून मृत्यूला जिंकतात.

कारण मोक्षपद प्राप्त करण्याचा/खरा आनंद प्राप्त करण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही.

आधार - समयसार गाथा २७६, २७७

भावपाहूड गाथा ६४ 'आदा खुमज्झं णाणी'

नियमसार गाथा

प्रवचनसार गाथा ८२ ची जयसेनाचार्यांची टीका 'निश्चय रत्नत्रय हाच मार्ग आहे, अन्य नाही.'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्वामव्ययं विभुमचिन्त्यमसंख्यमाद्यं
ब्रम्हाणमीश्वरमनन्तमनङ्ग केतुम् ।
योगीश्वरं विदितयोगमनेकमेकं
ज्ञानस्वरूपममलं प्रवदन्ति सन्त : ॥२४॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् ।

सम्यग्ज्ञानी जीव त्वां म्हणजे निज ध्रुवात्मन्; अव्यय= शाश्वत; विभु, अचिन्त्य, असंख्य अद्य ब्रह्म म्हणजे महानब्रह्म (अद्य=महान्) ईश्वर, अन्तगुणयुक्त, अनङ्केतू/कामविषय/ निष्काम, योगीश्वर, विदित योग, एक अनेक ज्ञानस्वरूप/ अमल शुद्ध

इत्यादिरुपाने निजध्रुवात्म्याला जाणतात/शुद्धात्मानुभव करतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बुद्धस्त्वमेव विबुधार्चित-बुद्धि-बोधात्
त्वं शङ्करोऽसि भुवनत्रयशङ्करत्वात् ।
धातासि धीर शिवमार्ग विधेर्विधानाद्
व्यक्तं त्वमेव भगवन्पुरुषोत्तमोऽसि ॥२५॥

अर्थ :- हे निजध्रुवात्मप्रभो !

हे विबुधार्चित, बुद्धजनाकडून/सम्यज्ञानीजनाकडून पुजीला जात असलेला म्हणजेच स्वतःच्या स्वतःचा निजध्रुवात्मा म्हणजेच हे निजध्रुवात्मन् तूच बुद्ध/ज्ञानवान आहेस. कारण बुद्धिबोध आहेस.

तू शंकर/आनंदवाला आहेस. कारण भुवनत्रयामध्ये तूंच म्हणजे माझाच ध्रुव आनंद गुणवाला आहे. इतर कोणामध्ये ही माझा आनंदगुण नाही.

हे धीर/निजध्रुववान् आत्मन् ! कारण शिवमार्गविधीचा उपाय आहेस, म्हणजे सम्यग् आनंद मार्गाचा उपाय/इलाज आहेस. तूच निजध्रुवात्माच धाता आहेस.

तूच निजध्रुवात्माच प्रकट/स्पष्ट/प्रत्यक्ष/पुरुषोत्तम/उत्कृष्ट/आहेस.

(विधान=उपाय,इलाज/अनुभवाचा विषय/सम्यक्भोग्यवस्तु)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तुभ्यं नमस्त्रिभुवनार्तिहराय नाथ
तुभ्यं नमः क्षितितलामलभूषणाय ।
तुभ्यं नमस्त्रिगत : परमेश्वराय
तुभ्यं नमो जिन भवोदधिशोषणाय ॥२६॥

अर्थ :- भो नाथ, हे निजध्रुवात्मन् प्रभो !

त्रिभुवन अर्ति हर/जगातील सर्व पीडा वेदना हरण करणारा म्हणजेच सदानंदगुणवाला अशा तुला म्हणजेच निजध्रुवात्म्याला नमस्कार म्हणजेच मी निजध्रुवात्म्याला सामान्यसहित जाणतो.

क्षितितल अमलभूषण/जगातील निर्मलभूषण/ महान अशा तुला म्हणजेच निजध्रवात्म्याला नमस्कार म्हणजे मी निजध्रुवात्म्याला प्रामाण्य सहित प्रत्यक्ष जाणतो.

तिन्ही जगाचा परमेश्वर/तिन्ही जगामध्ये श्रेष्ठ असा माझा निजध्रुवात्मा आहे, त्याला नमस्कार म्हणजे मी निजध्रुवात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्ष जाणतो.

हे जिन / निज ध्रुवात्मन् / तू भवसागर शोषण करणारा म्हणजे निजध्रुवात्मा दुःखसागर नष्ट करण्याऱ्या अशा तुला/निजध्रुवात्म्याला नमस्कार म्हणजेच मी प्रत्यक्ष प्रामाण्यसहित जाणतो.

अर्थात ज्यावेळी निजध्रुवात्म्याला प्रत्यक्ष प्रामाण्यसहित जाणतो त्याच वेळी सर्व दुःख नष्ट होतात व त्याचवेळी सम्यक् आनंद पर्यायाचा उत्पाद होतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

को विस्मयोऽत्र यदि नाम गुणैरशेषै -
स्त्वं संश्रितो निरवकाशतया मुनीश ।
दोषैरुपात्तविविधाश्रय जातगर्वैः
स्वप्नान्तरेऽपि न कदाचिदपीक्षितोऽसि ॥२७॥

अर्थ :- हे मुनीश ! हे निजध्रुवात्मन !

आत्मद्रव्यातील असंख्यप्रदेशामधील एकही प्रदेश गुणानी रहित नसल्यामुळे (प्रत्येक गुण द्रव्याच्या सर्व भागात व्यापून रहात असल्यामुळे) अनंतगुणांनी तुझा सम्यक् आश्रय घेतला आहे असा जर तूं आहेस तर कदाचित देखील स्वप्नामध्येही उपात्तविविधाश्रयजातगर्व दोषांनी (निजध्रुवात्म्याला सोडून अन्य विषयाकडे चेतनोपयोग लावल्याने जे अशुद्ध पर्याय होतात त्याने) तुझा/निजध्रुवात्म्याचा आश्रय केलेला दिसून येत नाही.

म्हणजेच निजध्रुवआत्मा अनादि अनंत शुद्ध आहे यात कोणते आश्चर्य आहे? म्हणजेच यात कोणतेही आश्चर्य नाही.

मग अशा निजध्रुवशुद्ध आनंदी आत्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्ष मी जाणतो म्हणून माझ्या पर्यायात शुद्धी प्रगटते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उच्चैरशोक तरू संश्रितमुन्मयुख -
माभाति रूपममलं भवतो नितान्तम् ।
स्पष्टोल्लसत्किरणमस्त तमो वितानं
बिम्बं रवेरिव पयोधर पार्श्ववर्ति ॥२८॥

अर्थ :- हे निजात्मन् !

काळ्या ढगाच्या जवळ असणाऱ्या सूर्याचे बिम्ब संपूर्ण अन्धकाराचे ज्याप्रमाणे नाश करणारे आहेत त्याप्रमाणे भो निजध्रुवात्मन् । तुझे अशोक तरू संश्रित/ आनंद स्वरुपी आश्रित .

उन्मुख/उत्कृष्ट तेज

अमल/निर्मल

स्पष्ट उल्लसत किरण

रूप/शाश्वत स्वरूप

नितान्त/अत्यन्त

उच्चेः/उत्कृष्टपणे

शोभायमान होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सिंहासने मणिमयुख शिखा विचित्रे
विभ्राजते तव वपुः कनकावदातम् ।
बिम्बं वियद्विलसदंशुलता वितानं
तुङ्गोदयाद्रिशिरसीव सहस्त्र रश्मे ॥२९॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन !

ज्याप्रमाणे उंच अशा उदयाचल म्हणजे उदयपर्वताच्या शिखरावर आकाशात ज्याचे शोभणारे किरणजाल चोहोकडे पसरले आहेत अशा त्या सूर्याचे बिम्ब शोभायमान आहे.

त्याप्रमाणे मणिमयुखशिखाविचित्र/चित्रविचित्र नानागुणधर्मरुपरत्नानी

प्राप्त असलेले निजात्मद्रव्य हेच सिंहासन असून त्यावर कनकवदत/अतिशय सुन्दर तुझ्या म्हणजे निजध्रुवात्म्याचे स्वरूप शोभायमान आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुन्दावदातचल चामर चारु शोभं
विभ्राजते तव वपुः कलधौत कान्तम् ।
उद्यच्छशशाङ्क शुचिनिर्झर वारि धार
मुच्चैस्तटं सुरगिरेरिव शातकौम्भम् ॥३०॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

ज्याप्रमाणे उदयपावणाऱ्या चन्द्राप्रमाणे निर्मल स्वच्छशा जलप्रवाहाच्या धारा ज्यावर पडत आहेत असे मेरू पर्वताचे ऊंच सुवर्णमय शिखर शोभते. त्याप्रमाणे

कुन्दावदातचलचामर चारूशोभ/द्रव्यरुपी कुबेराच्या नाना निधीमध्ये चित्रविचित्र अक्रमक्रमविवर्त गुणपर्याय स्वरूप असे जे द्रव्य

(तव वपु) तुझे/निजध्रुवात्म्याचे स्वरूप कलधौकान्त म्हणजे सुन्दर चैतन्यतेजस्वरूप आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

छत्रत्रयं तव विभाति शशाङ्ककान्त-
मुच्चैःस्थितं स्थगितभानुकर प्रतापम् ।
मुक्ताफल प्रकर जाल विवृद्ध शोभं
प्रख्यापयत्त्रिजगतः परमेश्वरत्वम् ॥३१॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

शशाङ्ककान्त/चंद्राप्रमाणे सुन्दर/आल्हाददायक मुक्ताफल प्रकरजाल विवृद्ध शोभ/अनन्तमणि मुक्तरूप गुणासह शोभायमान आणि

स्थगित भानुकरप्रताप/अगुरूलघुत्वगुणाने अन्यवस्तूंचा निजध्रुवामध्ये प्रवेश रोकला आहे आणि

तिन्ही जगाचे परमेश्वरच/श्रेष्ठत्व म्हणजे जगातील सर्व वस्तूमध्ये उत्कृष्ट आनंदवाली भोग्यवस्तू आहेस अशा ख्यातिवाला निजध्रुवात्मा आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गम्भीर तार रव पूरित दिग्विभाग -
स्त्रैलोक्य लोक शुभ सङ्गम भूति दक्षः ।
सद्धर्मराज जय घोषण घोषकःसन्
खे दुन्दुभिर्नदति ते यशसः प्रवादी ॥३२॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मा !

गंभीरताररवपूरित दिग्विभाग/स्पष्ट व मधुरध्वनिद्वारे दिग्मंडळात निजध्रुवात्म्याचे कीर्तन केले जाते. म्हणून असा निजध्रुवात्मा महान आहे व

त्रैलोक्यलोकशुभ संगम भूतिदक्ष/त्रिलोकातील महान असा निजध्रुव जीव दक्ष आहे/ म्हणजे निजध्रुवात्मा तत्पर आहे आणि

सत्धर्मराज जय घोषण घोषक असणारा दुदुंभी तुझे निजध्रुवात्म्याच्या यशाचे प्रवादी/विशेष कथन करणारा

आकाशामध्ये ध्वनि होत असतो म्हणजे सम्यक्ज्ञानीजीव निजध्रुवात्म्याचा शुद्धात्मानुभव करीत असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मन्दार सुन्दर नमेरू सुपारिजात
सन्तानकादि कुसुमोत्कर वृष्टिरुद्धा ।
गन्धोद बिन्दु शुभमन्द मरूत्प्रयाता
दिव्या दिवः पतति ते वचसां ततिर्वा ॥३३॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन ! मन्दारसुन्दरनमेरू-सुपारिजातसन्तानकादि कुसुमोत्करवृष्टि/मन्दार सुन्दर नेमरू पारिजातसन्तानक वगैरे पुष्पांची वृष्टि व

गन्धोद बिन्दुशुभमन्दमरूत्प्रपाता/स्वर्गातून तुझ्यावर म्हणजे निजध्रुवात्म्यावर पडते किंवा वचनाची दिव्यमाला पडते अर्थात्

निजध्रुवआत्म्यामध्ये आनंद गुण आहेत व प्रत्येक गुणामध्ये पुष्कळ अविभागप्रतिच्छेद आहेत/द्रव्य हे सुन्दर गुणानी बनलेले आहे व अशा सुन्दर निजध्रुवात्म्याची अनुभूति पर्याय/अवस्था करते. सम्यग्ज्ञानीजीव वारंवार शुद्ध आत्मानुभव करतो. छद्मस्थ सम्यग्ज्ञानीजीव कमीत कमी एक अन्तर्मुहूर्त शुद्धात्मानुभव करतो. एका अन्तर्मुहूर्तामध्ये असंख्यात समय असतात. एकासमयात एक पर्याय असते व एका पर्यायात दिव्य शुद्धअनन्त अविभागप्रतिच्छेद असतात. एक एक अविभागपरिच्छेद म्हणजे जणु उत्कृष्ट सुगन्धाने भरलेले सुन्दरपुष्प आहे अशा अनन्त सुन्दर अविभाग प्रतिच्छेदरूप पुष्पे एका पर्यायात आहेत. म्हणून ती सुन्दर माला आहे, अशा असंख्यात शुद्धात्मानुभूतिपर्याय होतात. म्हणून ती जणू कांही निजध्रुवआत्म्यावर जणु वृष्टि आहे. कारण प्रत्येक शुद्ध पर्याय निजध्रुवआत्म्याचेच वेदन करते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुम्भत्प्रभा वलय भूरि विभा विभोस्ते
लोकत्रये द्युतिमतां द्युतिमाक्षिपन्ती ।
प्रोद्यद्दिवाकर निरन्तर भूरि संख्या
दीप्त्या जयत्यपि निशामपि सोमसौम्याम् ॥३४॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन ! भो विभो !

तुझी प्रोद्यत् दिवाकर निरन्तरभूरिसंख्या/प्रत्येक गुण म्हणजे एक सूर्य, अनन्तगुण म्हणजे अनंतसूर्य हे अनन्तगुण अनादि अनंत शुद्ध असणाऱ्यांची

शुम्भतप्रभावलयभूरिविभा/ त्यांची अति शोभायमान ज्योतिप्रभा

तिन्ही लोकाकातील द्युतिवाल्यांच्या / दैदिप्यमानवाल्याच्या द्युतीला/तेजाला तिरस्कृत करते/ लाजविते

आणखी चन्द्राच्या सौम्यतेला देखील / शुद्ध पर्यायाला देखील आणि रात्रीला देखील/ अंधकाराला देखील/अशुद्ध पर्यायाला देखील

निजध्रुवस्वतःच्या दीप्तीने/महानतेने जिंकतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वर्गापवर्ग गम मार्ग विमार्गणेष्टः
सद्धर्म तत्त्व कथनैक पटुस्त्रिलोक्याः ।
दिव्य ध्वनिर्भवति ते विशदार्थ सर्व –
भाषा स्वभाव परिणाम गुणैः प्रयोज्यः ॥३५॥

अर्थ :– हे निजध्रुवात्मन् !

त्रिलोकातील जीवाना सांगणारी विषद अर्थ सर्वभाषा स्वभाव परिणाम गुणानी सहित

स्वर्ग अपवर्ग गममार्ग विमार्गण इष्ट सत्धर्म तत्त्वकथन एक पटुः त्रिलोक्या

अशी दिव्यध्वनि तुझा प्रयोज्य सेवक आहे/म्हणजे दिव्यध्वनि तुझे म्हणजे निजध्रुवात्म्याचे गुणगान करते.

म्हणून निजध्रुवआत्माच महान आहे असे मानतुंगाचार्य सांगतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उन्निद्र हेम नव पङ्कज प्रञ्ज कान्ति
पर्युल्लसन्नखमयुख शिखाभिरामौ ।
पादौपदानि तब यत्र जिनेन्द्र ! धत्तः
पद्मानि तत्र विबुधाः परिकल्पयान्ति ॥३६॥

अर्थ :- भो जिनेन्द्र ! म्हणजे हे निजध्रुवात्मन !

तुझे चरण युगल/ चिदानंद युगल उमलेल्या नवीन सुवर्ण कामलांच्या समुहांच्याप्रमाणे कांतीमान

पयुल्लसत् नख (अंश-गुण) मयुखशिखाभिराम/ परिउल्हासतगुणांच्या तेजाने मनोहर असणारे आहेत.

त्या गुणांचा पिण्ड असणारा तूं जेथे जेथे पाऊल ठेवतो म्हणजे ज्यांच्या ज्यांच्या चित्तामध्ये तुझ्याबद्दल ध्रुवचिदानंदाबद्दलचा प्रामाण्यसहित प्रत्यक्ष विचार येतो तेथे तेथे सम्यग्ज्ञानी त्या चेतनपर्यायाला सम्यकचैतन्यकमल म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इत्थं यथा तव विभूतिरभूज्जिनेन्द्र !
धर्मोपदेशन विधौ न तथा परस्य ।
या दृकप्रभा दिनकृतः प्रहतान्धकारा
तादृक्कुतो ग्रह गणस्य विकासिनोऽपि ॥३७॥

अर्थ :- भो जिनेन्द्र म्हणजे निजध्रुवात्मन !

याप्रमाणे धर्मोपदेशनविधीमध्ये जशी निजध्रुव आत्म्याची विभूति अनुभवली गेली/सांगीतली गेली तशी निजध्रुवात्म्याहून दुसऱ्यांची विभूति नाही.

उदाहारणार्थ - जसे सूर्याची प्रभा अंधकाराचा नाशक आहे तसा ग्रहसमूह तेजस्वी आहे तरी देखील सूर्याच्या प्रभे इतके त्यांचे तेज कसे असणार? अर्थात तारांगणाचे तेज सूर्याहून अधिक नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्च्योतन्मदाविल विलोल कपोल मूल-
मत्त भ्रमद्भ्रमर नाद विवृद्ध कोपम् ।
ऐरावताभमिभमुद्धतमापतन्तं
दृष्ट्वा भयं भवति नो भवदाश्रितानाम् ॥३८॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् ।

स्त्रवत असलेल्या मदाच्या योगाने भरून गेले आहे गंडस्थळ ज्याचे आणि मदप्राशन करण्यास आलेल्या मत्त व भ्रमण करीत असलेल्या भुंग्याच्या शब्दनादाने अत्यन्त क्रोध आला आहे ज्याला असा ऐरावतसारखा भयंकर हत्ती अंगावर धावत आलेला पाहून देखील निजध्रुवात्म्याचा आश्रय/अनुभव करणाऱ्या पर्यायाना/जीवाना भय वाटत नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भिन्नेभ कुम्भ गलदुज्ज्वल शोर्णिताक्त
मुक्ताफल प्रकरभूषित भूमि भागः ।
बद्धक्रमः क्रमगतं हरिणाधिपोऽपि
नाक्रामति क्रमयुगाचल संश्रितं ते ॥३९॥

अर्थ :–हे निज ध्रुवात्मन् ।

ज्यानी हत्तीच्या गंडस्थळाचे विदारण केल्यामुळे त्यातून रक्तांकित उज्वलमोती भूमिवर विखरल्याने भूमीस शोभा आली आहे आणि जो मार्ग अडवून उभा आहे असा सिंहदेखील त्याच्या तावडीत सापडलेल्या

तुझ्या म्हणजे निजध्रुव आत्म्याच्या आश्रिताला म्हणजेच निजध्रुवात्म्याच्या अनुभव करणाऱ्या पर्यायावर/जीवावर आक्रमण/हल्ला करीत नाही. अर्थात शुद्धात्मानुभवीला दुःख होत नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कल्पान्त काल पवनोद्धत वन्हि कल्पं
दावानलं ज्वलितमुज्ज्वलमुत्स्फुलिङ्गम् ।
विश्वं जिघत्सुमिवसंमुखमापतन्तं
त्वन्नामकीर्तन जलं शमयत्यशेषम् ॥४०॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् ।

तुझे नामकीर्तनरूप जल/निजध्रुवात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्ष जाणणारे ज्ञानरूपी जल

प्रलयकाळाच्या महान वायूने उत्तेजित झालेला भडकलेला अग्निसारखा जाज्वल्यमान महान तेजस्वी उत्सफुल्लिंगित झालेला अग्नि विश्वाला जाळण्यासाठी उत्सुक असणारा असा दावानल समोर आला असताना त्याला संपूर्णपणे शान्त करते.

म्हणजे निजध्रुवात्म्याच्या अनुभवाने सर्व आग/संकटे नाहीशी होतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रक्तेक्षणं समदकोकिल कण्ठ नीलं
क्रोधोद्धतं फणिनमुत्फणमापतन्तम् ।
आक्रामति क्रमयुगेण निरस्तशङ्क
स्त्वन्नामनागदमनी हृदि यस्य पुंसः ॥४१॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

ज्या जीवाच्या चित्तामध्ये निजध्रुवात्म्याचा शुद्धात्मानुभव आहे तो निशङ्क आहे/शङ्का रहित आहे. कारण जो आरक्त/ लाल नेत्रानीयुक्त आहे आणि मदनमस्त अशा कोकिळ कंण्ठाप्रमाणे नीळ वर्णाचा आहे आणि अत्यंत क्रोधित होऊन फणा काढून चवताळून अंगावर येत असणाऱ्या सर्पाला/ विषधराला 'शुद्धात्मानुभव घेणारा' आपल्या दोन पायानी उल्लंघन करतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वल्गत्तुरङ्गगजगर्जित भीमनाद -
माजौ बलं बलवतामपिभूपतीनाम् ।
उद्यद्दिवाकर मयूरव शिखापविद्धं
त्वत्कीर्तनात्तम इवाशु भिदामुपैति ॥४२॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् ।

तुझ्या कीर्तनाने /निजध्रुवात्म्याच्या शुद्धानुभवाने, युद्धामध्ये धावत असलेले घोडे व गर्जना करीत असलेले हत्ती यांचा भयंकर आवाज होत आहे, ज्यामध्ये पराक्रमी शक्तीशाली देखील राजाचे सैन्यबल आहे अशा सर्वांचा शीघ्र नाश करतो/ म्हणजे निज ध्रुवशुद्धात्माचा शुद्धात्मानुभवन केले असताना बलवान मोहादि कर्मशत्रूंच्या नाशाला प्राप्त होतो.

जसे उदय होत असलेल्या सूर्याच्या किरण समुदायाच्या योगाने तत्काल अंधकार नाहीसा होतो. निजध्रुवात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्ष ज्ञानाने जाणले असताना सर्वदुःख नष्ट होते/नाहीसे होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुन्ताग्रभिन्नगजशोणितवारिवाह -
वेगावतार तरणातुर योधभीमे ।
युद्धे जयं विजितदुर्जयजेयपक्षा -
स्त्वत्पाद पङ्कजवनाश्रयिणो लभन्ते ॥४३॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

(त्वत्पाद पङ्कजवनाश्रयिणः विजित दुर्जय जेयपक्षाः कुन्ताग्र भिन्नगज शोणितवारिवाह वेगावतार तरणातुरयोधभीमे युद्धे जयं लभन्ते ।)

तुझ्या पादपङ्कजवनाश्रयि म्हणजे अनन्तगुणमयपिण्डरूप निजध्रुवात्म्याचा आश्रय करणारे पर्याय / जीव

विजित दुर्जयजेय पक्षवाले/कठीण असणाऱ्या शत्रुपक्षाला जिंकणारे/

भाल्याच्या टोकाने विदीर्ण झालेल्या हत्तीच्या रक्ताचे प्रवाह वेगाने वाहणाऱ्या भयंकर युद्धामध्ये/महान संकटामध्ये

जय प्राप्त करतात.

निजध्रुवात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्ष जाणणारा प्रत्येक पर्याय सम्यक् आनंद प्राप्त करतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अम्भोनिधौ क्षुभितभीषणनक्रचक्र-
पाठीनपीठभयदोल्वणवाडवाग्नौ ।
रङ्गत्तरङ्ग शिखर स्थित यान पात्रा-
स्त्रासं विहाय भवतः स्मरणाद् व्रजन्ति ॥४४॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !.

भयंकर मगरमत्स्यादि समूह ज्यात घाबरले आहेत व जो वडवाग्नीने अत्यंत प्रज्वलित झाला आहे अशा त्या समुद्रामध्ये मोठमोठ्या लाटा उसळत असतानाही नावेत बसलेले तुझ्या/निजध्रुवात्म्याच्या शुद्धात्मानुभवामुळे दुःखापासून मुक्त होऊन पुढे जातात. निजध्रुवाच्या शुद्धानुभवामुळे महान दुःखापासून मुक्त होतात. म्हणजेच सम्यक् आनंदी होतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उद्भूत भीषण जलोदर भार भुग्ना:
शोच्यां दशामुपगताश्च्युत जिविताशा: ।
त्वत्पाद पङ्कजरजोमृत दिग्ध देहा:
मर्त्या भवान्ति मकरध्वज तुल्यरुपा: ॥४५॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

भयंकर जलोदर झाल्यामुळे ज्याच्या भाराने जे भग्नवाले व शोचनीय अवस्थावाले जिवीताची/जगण्याची आशा सोडलेले हीनदीन जीव

जेंव्हा निजध्रुवात्म्याच्या शुद्धानुभवाने लिप्त होतात तेंव्हा मकर ध्वजतुल्य/अतिसुंदर सम्यक्ज्ञान आनंद पर्यायवाले होतात.

निजध्रुवात्म्याचा शुद्ध अनुभव घेतला असताना सम्यक्ज्ञान सम्यक् आनंद मिळतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपाद कण्ठमुरू श्रृङ्खल वेष्टिताङ्गाः
गाढं बृहन्निगड कोटि निघृष्ट जङ्घाः ।
त्वन्नाम मन्त्रमनिशं मनुजाः स्मरन्त :
सद्य स्वयं विगतबन्धभया भवान्ति ॥४६॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

पायापासून कण्ठापर्यंत मोठ्या शृङ्खलानी बांधलेले आहे व जाड बेड्यांच्या टोकानी ज्यांच्या जंधा घासलेल्या आहेत अशा माणसाना/म्हणजे कर्म बंधाने बांधले गेलेले जीव

तुझे म्हणजे निजध्रुवात्म्याचे शुद्धात्मानुभवन अनिश / एक अंतर्मुहूर्तामध्ये असंख्यात पर्याय होतात तेवढा काळ (तेवढ्या काळात)

शुद्धात्मानुभवन केला असताना तत्कालबंधमुक्त व भयरहित होतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मत्तद्विपेन्द्र मृगराज दवानलाहि-
सङ्ग्राम वारिधि महोदर बन्धनोत्थम् ।
तस्याशु नाशमुपयाति भयं भियेव
यस्तावकं स्तवमिमं मतिमानधीते ॥४७॥

अर्थ :- भो निजध्रुवात्मन् !

जो मतिमान जीव निजध्रुवात्म्याच्या या स्तवाला/स्वरूपाला अनुभवतो त्याचे मदोन्मत्त हत्ती, सिंह, दावनल, सर्प युद्ध, समुद्र, जलोदर व बंधन यानी उत्पन्न झालेले भय, जणु कांही भय स्वतःच भितीमुळे (भिऊन) तत्काळ नाशाला प्राप्त होते.

जो निजध्रुवात्म्याला प्रामाण्यसहित प्रत्यक्ष अनुभवतो/जाणतो त्याचे अशुद्धपर्याय/सर्व प्रकारचे दुःख/ सर्व प्रकारचे भय आपोआप तात्काळ नाश होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्तोत्रस्त्रजं तव जिनेन्द्र गुणैर्निबद्धां
भक्त्यामया विविधवर्ण विचित्र पुष्पाम् ।
धत्ते जनो य इह कण्ठगतामजस्त्रं
तं 'मानतुङ्ग' मवशा समुपैति लक्ष्मीः ॥४८॥

अर्थ :- भो जिनेन्द्र ! भो निजध्रुवात्मा !

(तव) तुझ्या (गुणे:) गुणानी सहित (स्तोत्रस्त्रजं) असणारी ही स्तोत्रमाला/ वस्तुस्वरूप रचनारूपमाला आहे ती भक्तिपूर्वक/ शुद्धात्मनुभवपूर्वक माझ्या द्वारे विविधवर्ण विचित्रपुष्पांनी निबब्द असलेली आहे.

येथे जो जीव (मानतुंगाचा जीव)

कण्ठगतमालेला/ निजध्रुवस्वुरुपाला (धत्ते) धारण करतो निजध्रुवत्मानुभव करतो (तं) त्या (मानतुंगम्) मानतुंगाला/सम्यग्ज्ञानीला/शुद्धात्मानुभववाल्याला (अवश लक्ष्मी:) अवश लक्ष्मी (समुपैति) सम्यक्रूप प्राप्त होते.

